जून २०२२/पाने ६०/किंमत ₹१०

लोकराज्य

समता,
न्याय,
एकात्मतेच्या
मार्गावर.....माझा
महाराष्ट्र

‘कृतज्ञता पर्व’चा समारोप

राज्यभरात राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी ‘कृतज्ञता पर्व’निमित्त १८ एप्रिल ते २२ मे २०२२ दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या पर्वाचा समारोप कोल्हापूर येथील केशवराव भोसले नाट्यगृह येथे झाला. या वेळी श्री शाहू महाराज छत्रपती, गृहराज्यमंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री सतेज पाटील, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, आमदार जयंत आसगावकर, आमदार ऋतुराज पाटील, आमदार जयश्री जाधव, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, महानगरपालिका आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. मनोज लोहिया, जिल्हा पोलीस अधीक्षक शैलेश बलकवडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजयसिंह चव्हाण तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर शाहूप्रेमी उपस्थित होते.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दीनिमित्त ६ मे २०२२ रोजी १०० सेकंद स्तब्धता पाळून लोकराजाला आदरांजली वाहण्यात आली. हा उपक्रम विश्वविक्रम झाल्याबद्दल ग्लोबल बुक ऑफ रेकॉर्ड्सच्या वतीने श्री शाहू महाराज छत्रपती यांच्या हस्ते प्रमाणपत्र स्वीकारताना कोल्हापूरचे जिल्हाधिकारी राहुल रेखावार.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना १२ राज्यांतील लोककलावंतांकडून लोकनृत्याद्वारे आदरांजली.

६ सामाजिक न्यायाच्या दिशेने...

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत राज्यातील अनुसूचित जातिजमाती, ज्येष्ठ नागरिक, निराधार, दिव्यांग या घटकांसाठी वैयक्तिक तसेच सामूहिक योजना राबवण्यात येत आहेत. तळागाळातील या समाजाचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकास करून या समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामाजिक न्याय विभाग प्रयत्नशील असून या विभागाच्या योजनांचे संगणकीयकरण, युवक-युवतींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे.

१० बहुजनांचा सर्वांगीण विकास

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग यांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी असलेल्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी ९ मार्च २०१७ रोजी इतर मागास बहुजन कल्याण या स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात आली आहे. गेल्या अडीच वर्षात विभागामार्फत या घटकातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.

१५ वंचितांसाठी योजना

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीने शैक्षणिक सवलतीसाठी आणि आर्थिक उन्नतीसाठी उपयोगी ठरणाऱ्या महत्त्वपूर्ण योजना राबवल्या जातात. अशा योजनांचा थोडक्यात आढावा..

२१ कल्याणकारी महामंडळे

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या अधीनस्थ असलेल्या महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ, लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, तर इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अधीनस्थ असलेल्या महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या माध्यमातून कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहेत.

२७ समताधिष्ठित समाजनिर्मिती

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांना समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत पोहोचवणे, जागृती निर्माण करणे आणि त्या माध्यमातून समाजातील प्रत्येक स्तरातील तरुणांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (बार्टी) गेली ४२ वर्षे करत आहे. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, समता दूत, युवा गट, कौशल्य विकास प्रशिक्षण आदी उपक्रमांच्या माध्यमातून समताधिष्ठित समाजाच्या दिशेने बार्टीची वाटचाल सुरू आहे.

२९ वंचितांना भक्कम साथ

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत विविध योजना व उपक्रम राबवण्यात येतात. या योजनांचा लाभ घेऊन अनेकांचे जगणे सुसह्य व सुकर झाले असून ते स्वावलंबी झाले आहेत. यात रमाई आवास योजना, स्वाधार योजना, छत्रपती शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनांचा प्रामुख्याने समावेश आहे. सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना व उपक्रमांचा लाभ घेतलेल्या लाभार्थींच्या या काही प्रातिनिधिक यशकथा...

सामाजिक न्यायाच्या दिशेने... ६
बहुजनांचा सर्वांगीण विकास १०
लोककल्याणाचे कार्य १२
वंचित घटकांना न्याय १३
प्रेरणादायी स्मारक १४
वंचितांसाठी योजना १५-२०
कल्याणकारी महामंडळे २१-२६
समताधिष्ठित समाजनिर्मिती २७
वंचितांना भक्कम साथ २९-३६
सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते :
राजर्षी छत्रपती शाहू महाराज ३७
शब्दांचा मनस्वी खेळिया ३९
प्रदूषणमुक्त वसुंधरा ४०
खरिपाची पूर्वतयारी ४२
पाऊल पडते पुढे ४४-५२
मंत्रिमंडळात ठरले ५३
शिशू रुग्णवाहिकेचे लोकार्पण ५५
नवी मुंबईत 'माहिती भवन' ५६
दावोस आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषद : राज्यात भक्कम गुंतवणूक ५७

वर्ष ७३ वे | अंक १० | जून २०२२

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — दीपक कपूर
- प्रबंध संपादक — गणेश रामदासी, दयानंद कांबळे
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — अतुल पांडे, गजानन पाटील, राजाराम देवकर
- वितरण — मीनल जोगळेकर
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. प्रिंट प्लस प्रा.लि., पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

विजेचा इशारा देणारे 'दामिनी ॲप'

वीज कोसळून होणारी जीवितहानी कमी करण्यासाठी किंबहुना टाळण्यासाठी काही ठोस उपाययोजना सुरू आहेत. यावरचा बचावात्मक उपाय म्हणून केंद्र सरकारच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाने वादळी पाऊस, विजांच्या कडकडाटाचा अचूक अंदाजाची पूर्वसूचना नागरिकांना मिळावी, याकरिता 'दामिनी' ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून वादळी पाऊस, विजांच्या कडकडाटाचे त्यांच्या परिसरातील अचूक अंदाज १५ मिनिटे ते अर्धा तास आधी नागरिकांना घरबसल्या मिळणार आहेत. त्यामुळे वादळी वाऱ्यांसह येणारा पाऊस आणि वीज पडल्यामुळे होणारी नागरिकांची जीवितहानी टाळणे शक्य होणार आहे.

मान्सूनपूर्व आणि मान्सूनच्या सुरुवातीच्या कालखंडात विशेषतः जून व जुलै तसेच मान्सून पश्चात साधारणतः माहे ऑक्टोबर या महिन्यात राज्यात अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पाऊस हजेरी लावतो. मान्सून दाखल झाल्यावर साधारणतः पहिल्या पावसात शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागात वीज कोसळून अनेक शेतकरी व नागरिकांना आपला जीव गमवावा लागतो.

पुण्यातील भारतीय उष्ण प्रदेशीय हवामान संशोधन संस्था (आयआयटीएम) या संस्थेने हे ॲप विकसित केले आहे. 'दामिनी' ॲपसाठी लाइटनिंग लोकेशन नेटवर्क हे मॉडेल विकसित करण्यात आले आहे. माहिती संकलनासाठी विविध भागात सेन्सर्स बसवण्यात आले आहेत. या ॲपमुळे शेतकरी तसेच नागरिकांना वादळी पाऊस, विजांच्या कडकडाटाचा १५ मिनिटे ते अर्धा तास आधी अचूक अंदाज मिळू शकतो. हे ॲप जीपीएस लोकेशनने काम करत असून वीज पडण्याच्या १५ मिनिटांपूर्वी या ॲपमध्ये प्रभावित होण्याची शक्यता असलेल्या क्षेत्राची दिशादर्शक स्थिती दर्शवण्यात येते. वीज पडण्याची शक्यता तसेच वीज म्हणजे नेमके काय, वीज कोसळण्याची शास्त्रीय माहिती आणि विजांपासून बचावासाठी नागरिकांनी काय करायला पाहिजे, याचीही सविस्तर सचित्र माहिती 'दामिनी' ॲपमध्ये देण्यात आली आहे. या ॲपवर लोकेशन टाकल्यानंतर संबंधित भागात वादळी वारे अथवा विजांच्या गडगडांची शक्यता असल्यास ती माहिती बघायला मिळते. त्यामुळे या माहितीच्या आधारावर शेतकरी व नागरिक वेळीच सावध होऊन त्यांचा जीव वाचवू शकतात. स्थानिक पातळीवर गावस्तरीय कर्मचारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहायक, शिक्षक, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सामान्य नागरिक तसेच शेतकऱ्यांना हे ॲप डाऊनलोड करण्यास प्रवृत्त करावे, असे आवाहन शासनातर्फे करण्यात आले आहे.

समता, न्याय आणि एकात्मता

समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व, आर्थिक, राजकीय, सामाजिक हक्क, स्त्री-पुरुष समानता, समाजातील सर्व व्यक्तींना शिक्षणाची, विकासाची संधी आदी मूल्ये आणि तत्त्वे ही सामाजिक न्यायाची उद्दिष्टे आहेत. २६ जून हा दिवस लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती राज्यात सामाजिक न्यायदिन म्हणून साजरा करण्यात येतो. महाराष्ट्र ही पंडिता रमाबाई, महर्षी धोंडो केशव कर्वे, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी समाजसुधारकांची भूमी आहे. या समाजसुधारकांनी त्यांच्या अनमोल कार्यातून राज्यात सामाजिक न्याय प्रस्थापित केला आहे.

स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांवर समाजाची उभारणी करण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ध्येय होते. त्यांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, असा स्फूर्तिदायक संदेश दिला. महाराष्ट्र राज्य सामाजिक न्यायाच्या दृष्टीने वाटचाल करत आले आहे. राज्यात समाज कल्याण विभागाची निर्मिती १९७२ मध्ये झाली. त्यात वेळोवेळी स्थित्यंतरे होऊन या विभागास सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग असे नाव देण्यात आले. या विभागाच्या वतीने दुर्बल घटकांतील अनुसूचित जाती, वृद्ध, निराधार, अपंग घटकांतील नागरिकांसाठी वैयक्तिक व समूह विकासाच्या योजना राबवण्यात येतात. या योजनांद्वारे त्यांचे शैक्षणिक व आर्थिक संवर्धन करणे व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा विभागाचा प्रमुख उद्देश आहे. याच पद्धतीने इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे कार्य सुरू असून विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग या घटकांतील नागरिकांसाठी विविध योजना राबवल्या जातात.

राज्यात सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीने अनुसूचित जाती व नवबौद्ध, वृद्ध, निराधार, अपंग, अनाथ, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक सवलती आणि आर्थिक उन्नतीसाठी उपयुक्त ठरणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जाते. यामध्ये प्रामुख्याने प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर, व्यावसायिक आणि परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. या अंकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना, मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती अशा विविध योजनांच्या माहितीचा समावेश करण्यात आला आहे.

शैक्षणिक सवलतीबरोबरच आर्थिक उन्नतीसाठी शासनाच्या अधीनस्थ असलेल्या महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ, लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) च्या कार्याची माहिती या अंकात देण्यात आली आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आरक्षणासह अस्पृश्यता निर्मूलनापासून आंतरजातीय विवाहापर्यंत घेतलेले निर्णय आजही समाजाला आणि राज्यकर्त्यांना दिशादर्शन करणारे आहे. त्यांच्या कार्याचा मागोवा घेणारा लेख समाविष्ट करण्यात आला आहे.

या अंकात विविध योजनांचा लाभ घेऊन आपली शैक्षणिक व आर्थिक उन्नती करणाऱ्या काही निवडक लाभार्थ्यांच्या यशोगाथा वाचकांना प्रेरणा देतील. राज्याच्या खरीपपूर्व हंगामाचा आढावा व दावोस, (स्वित्झर्लंड) येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेचा वृत्तान्त याबरोबरच वाचू आनंदे, महत्त्वाच्या घडामोडी, मंत्रिमंडळात ठरले ही नेहमीची सदरेही आहेत.

दीपक कपूर
(मुख्य संपादक)

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत राज्यातील अनुसूचित जातिजमाती, ज्येष्ठ नागरिक, निराधार, दिव्यांग या घटकांसाठी वैयक्तिक तसेच सामूहिक विकासाच्या योजना राबवण्यात येत आहेत. तळागाळातील या समाजाचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकास करून या समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामाजिक न्याय विभाग प्रयत्नशील असून या विभागाच्या योजनांचे संगणकीकरण, युवक-युवतींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे.

सामाजिक न्यायाच्या दिशेने...

राज्यातील वंचित व उपेक्षित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून गेल्या अडीच वर्षांत सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.

धनंजय मुंडे
सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री

आंतरराष्ट्रीय स्मारक

इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारक उभारणी कामाचे संनियंत्रण सामाजिक न्याय विभाग करत आहे. या स्मारकाची उंची १०० फुटांनी वाढवण्यात आली. हे स्मारक सर्वोत्कृष्ट व्हावे, तसेच याचे काम २०२४ पूर्वी पूर्ण व्हावे, यासाठी विभाग प्रयत्नशील आहे. इंदू मिल येथे बसवण्यात येणाऱ्या ३५० फुटी पुतळ्याची २५ फुटी प्रतिकृती शिल्पकार राम सुतार यांनी तयार केली आहे. आता मूळ पुतळ्याच्या निर्माणाचे काम हाती घेतले जाणार आहे.

रमाई आवास

अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबाचे राहणीमान उंचवावे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर २६९ चौरस फुटाचे घर बांधून देण्यासाठी रमाई आवास (घरकूल योजना) २००९-१० पासून सुरू आहे. महाआवास अभियान २०२०-२१ अंतर्गत दीड लाख घरकुलांना रमाई आवास योजनेचा प्रत्यक्ष निधी देऊन दोन वर्षांत ६८,५८५ घरकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

स्वाधार योजना

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी मोठ्या शहरापासून महाविद्यालयाचे अंतर ५ कि.मी.वरून वाढवून १० कि.मी.पर्यंत करण्याचा निर्णय प्रस्तावित आहे. त्याबरोबरच तालुकास्तरावर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनाही या योजनेचा लाभ घेता येणार आहे. या योजनेतील लाभार्थी विद्यार्थी संख्या २५ हजारांवरून वाढवून ३० हजार करण्यात आली आहे. योजनेतील २०१८-१९ पासून थकीत असलेली देयके पूर्ण अदा करण्यात आली आहेत.

परदेश शिष्यवृत्ती योजना

राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेच्या निकषात बदल करून आता वेटिंग लिस्टमधील विद्यार्थ्यांचाही विचार केला जात आहे. प्रथमच योजनेचा कोटा १०० टक्के पूर्ण झाला आहे. फाईन आर्ट्स, फिल्म मेकिंग या विषयांचा समावेश करून आणखी ५० जागा वाढवणे प्रस्तावित आहे. २०२०-२१ साठी पात्र विद्यार्थ्यांना लॉकडाऊन काळात देशात किंवा परदेशात अडचण येऊ नये, यासाठी ऑनलाईन शिक्षण ग्राह्य धरले आहे. या योजनेचा लाभ घेऊन परदेशात शिक्षण पूर्ण केल्यानंतर देशात परत येऊन काम करावे लागेल, ही अट रद्द करून विद्यार्थ्यांना परदेशात कामाचा अनुभव घेता यावा, यासाठी 'पोस्ट स्टडी वर्क व्हिसा' मिळवून देण्यासाठी राज्य सरकार ना-हरकत प्रमाणपत्र देणार आहे.

एका एसएमएसवर यादीतील विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवले जातात. परदेश शिष्यवृत्ती २०२०-२१ साठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना लॉकडाऊन काळात देशात किंवा परदेशात अडचण येऊ नये, यासाठी विद्यापीठे बंद असतानादेखील ऑनलाईन शिक्षण व उपस्थिती ग्राह्य धरून शिष्यवृत्ती देयकांचा लाभ देण्यात आला.

गाववाड्यांना समताधिष्ठित नावे

ग्रामीण व शहरी भागातील गाववाड्या-वस्त्यांची जातिवाचक नावे रद्द करून त्यांना समताधिष्ठित किंवा महापुरुषांची नावे देण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्रामविकास, नगरविकास, महसूल या विभागांशी समन्वय

साधून गाव-वस्त्यांची जातिवाचक नावे कायमची हद्दपार व्हावीत, या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे.

कोरेगाव-भिमा विजयस्तंभ सुशोभिकरण

पुणे जिल्ह्यातील कोरेगाव-भीमा येथील ऐतिहासिक विजयस्तंभ येथे दरवर्षी १ जानेवारीला शौर्यदिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन करण्याची जबाबदारी सामाजिक न्याय विभागाने घेतली आहे. त्याचबरोबर येथे आयोजित केल्या जाणाऱ्या सर्व अल्प व दीर्घकालीन उपक्रमांचे तसेच विजयस्तंभ परिसराचा विकास व सुशोभीकरण करण्याची जबाबदारीही या विभागाने घेतली आहे. या विकासकामांचा १०० कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीत एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे.

तृतीयपंथीयांसाठी महामंडळ

तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. विभागीय स्तरावर तृतीयपंथीयांसाठी काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांचा समावेश करून तृतीयपंथीयांची नोंदणी करणे सुरू आहे. तृतीयपंथीयांसाठी बीज भांडवल योजना, निवासी वसतिगृह सुरू करणे प्रस्तावित आहे.

दिव्यांगासाठी महत्त्वपूर्ण निर्णय

दिव्यांग व्यक्तींना राज्य व केंद्र सरकारच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली नोंदणी करून वैश्विक ओळखपत्र (युडीआयडी कार्ड) सहज रीतीने उपलब्ध व्हावे, यासाठी आरोग्य विभागाच्या समन्वयाने १२ डिसेंबर २०२१ पासून राज्यव्यापी मोहीम हाती घेतली, याद्वारे सुमारे एक लाख दिव्यांग व्यक्तींची नोंदणी पूर्ण झाली असून हे अभियान आणखी तीन महिन्यांसाठी सुरूच राहणार आहे. दिव्यांग व्यक्तींना विशेष साहाय्यक उपकरणे मोफत मिळावीत, यासाठी दानशूर व्यक्ती, संस्था व गरजू दिव्यांग यांची एकत्र सांगड घालणारे 'महाशरद' पोर्टल सुरू करण्यात आले. दिव्यांगांच्या विविध योजना एका क्लिकवर उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ॲपची निर्मिती करण्यात येणार आहे.

उद्धव ठाकरे
मुख्यमंत्री

सामाजिक न्यायासाठी कटिबद्ध

महाराष्ट्राने सामाजिक न्यायाच्या प्रगतिशील आणि समाजहित लक्षात घेऊन पावले उचलली आहेत. त्यातही गरीब, दुर्बल घटकांना केंद्रस्थानी ठेऊन निर्णय घेतल्याने राज्याने देशात एक उदाहरण निर्माण केले आहे.

समाजात प्रचलित असलेली अनिष्ट प्रथा बंद करण्यासाठीही ग्रामपंचायतींना आम्ही बळ देत आहोत. कोरोनामुळे अनाथ झालेल्या मुलामुलींना किंवा विधवा महिलांना साहाय्य करणे, तसेच त्यांच्या चांगल्या भविष्यासाठी पावले उचलून शासनाने सामाजिक जबाबदारीचे पालन केले आहे. रस्ते, वाड्या-वस्त्यांची जातिवाचक नावे बदलून महापुरुषांची आणि लोकशाही मूल्यांशी निगडित नावे देण्याबाबतचा वरकरणी साधा वाटणारा पण एक चांगला पायंडा पाडणारा महत्त्वाचा निर्णयदेखील राज्य शासनाची सामाजिक न्यायापोटी असलेली कटिबद्धता दाखवून देतो.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या शिकवणीनुसार वाटचाल करतो आहोत आणि पुढेदेखील करूयात.

बार्टीतर्फे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेतर्फे (बार्टी) यूपीएससी व एमपीएससी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना लॉकडाऊन काळात विशेष ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहेत. बार्टीमार्फत बँकिंग, रेल्वे, पोलीस भरती तसेच कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकऱ्यांच्या दृष्टीने राज्यातील ३० केंद्रांवर विशेष प्रशिक्षण कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अनुसूचित जातीतील आर्थिक दुर्बल कुटुंबातील दहावीच्या परीक्षेत ९०% पेक्षा अधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या पूर्वतयारीसाठी पुढील दोन वर्षात प्रत्येकी एक लाखप्रमाणे दोन लाख रुपये विशेष सानुग्रह अनुदान देण्यात येत आहेत. 'बार्टी' च्या सर्व योजना एका क्लिकवर मिळाव्यात, यासाठी ई-बार्टी हे मोबाईल ॲप सुरू केले आहे. एमफिल व पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिली जाणारी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन अधिछात्रवृत्ती) २०२०-२१ मध्ये अर्ज केलेल्या सर्व ४०८ विद्यार्थ्यांना देण्याचा निर्णय घेतला. दरवर्षी ही अधिछात्रवृत्ती १०५ विद्यार्थ्यांना दिली जाते. २०१९ व २०२० साठी प्रत्येकी २०० विद्यार्थ्यांना फेलोशिप मंजूर केली आहे.

जात प्रमाणपत्र पडताळणीची सर्व सुविधा ऑनलाईन आहे. तसेच जिल्हानिहाय जात पडताळणी समित्या स्थापन केल्या आहेत.

अभ्यास आयोगांची स्थापना

मातंग, कैकाडी तसेच मेहतर (भंगी) समाजाचा सामाजिक, आर्थिक तसेच शैक्षणिक विकास व्हावा, तसेच मागासलेपण दूर व्हावे, यासाठी या समाजाचा बारकाईने अभ्यास होऊन सद्य:स्थिती समोर यावी, यासाठी अभ्यास आयोग नेमण्यात आले आहेत.

संविधान सभागृह

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत ५०० पेक्षा अधिक अनुसूचित जातीतील लोकवस्ती असलेल्या ठिकाणी संविधान सभागृह बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये सभागृह,

अभ्यासिका, ग्रंथालय आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

सफाई कामगारांसाठी...

दूषित गटारांमध्ये काम करताना मृत्यू पावलेल्या, हाताने मैला उचलणाऱ्या कामगारांच्या कुटुंबांना नुकसान भरपाई देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. अशा कुटुंबांना नुकसान भरपाई देण्यासाठी सक्षम प्राधिकारी (जबाबदार अधिकारी) निश्चित केले आहेत. सफाई कामगारांचे प्रश्न प्राधान्याने सोडवण्यासाठी राज्य शासन स्तरावर स्वतंत्र कार्यासन निर्माण करण्यात आले आहे. नगरपालिका, महानगरपालिकांमध्ये कार्यरत सफाई कामगारांची जोखीम कमी करून त्यांना होणारे आजार टाळण्यासाठी तसेच त्यांच्या मनातील अप्रतिष्ठेच्या भावनेचे उच्चाटन करण्यासाठी यापुढे गटार सफाई यंत्रचलित पद्धतीने करण्यासाठी राज्य सरकारने ठरवले असून त्यासाठी आधुनिक गाड्या पुरवण्यात येणार आहेत.

ऊसतोड कामगारांसाठी...

ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे.

महामंडळाला इतर कोणत्याही योजनेचा निधी कपात न करता कायम निधी उपलब्ध व्हावा, यासाठी ऊस खरेदीवर प्रतिटन १० रुपये अधिभार लावण्यात येणार आहे व यातून जितकी रक्कम जमा होईल, तितकी रक्कम राज्य सरकारही देईल व याद्वारे महामंडळाचे कामकाज चालणार आहे. महामंडळाचे परळी व पुणे येथे कार्यालय होणार आहे.

महामंडळांतर्गत संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेला मंजुरी दिली आहे. राज्यातील १० जिल्ह्यांत मुलींसाठी ४१ व मुलांसाठी अशी एकूण ८२ वसतिगृहे उभारण्यात येणार आहेत. ऊसतोड कामगारांना ग्रामसेवक किंवा तत्सम यंत्रणेकडून ओळखपत्र देण्यासाठीची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी डिजिटल यंत्रणेचा वापर होणार आहे.

अजित पवार
उपमुख्यमंत्री

सामाजिक न्यायातही अग्रेसर

पुरोगामी महाराष्ट्राला लाभलेला सामाजिक न्यायाचा वारसा प्रत्यक्ष कृतीत उतरवण्याचे काम राज्यात महाविकास आघाडी सरकार निष्ठापूर्वक करत आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेबांचे भव्य आंतरराष्ट्रीय स्मारक, भीमा कोरेगाव विजयस्तंभ स्मारक व परिसराच्या विकासावर भर देण्यात आला आहे. वर्ष २०२२-२३ मध्ये सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाला सर्वसाधारण व अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाकरिता १५ हजार १०६ कोटी रुपयांचा निधी अर्थसंकल्पात मंजूर केला आहे. त्यातून अनेक विकासयोजना सुरू आहेत. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन महाराष्ट्राला विकासाच्या, सामाजिक न्यायाच्या वाटेवर अग्रेसर ठेवण्यात, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे सरकार यशस्वी ठरले आहे.

ज्येष्ठ नागरिकांसाठी...

राज्यातील ६५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांची वर्षातून किमान एकदा आरोग्य तपासणी तसेच चाचण्या करणे अशा स्वरूपाची 'शरद शतम आरोग्य कवच विमा योजना' लवकरच कार्यान्वित होणार आहे. मागील दोन वर्षांच्या काळात दोन्ही लॉकडाऊनमध्ये विभागाने संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना, विधवा निवृत्तिवेतन योजना व दिव्यांग निवृत्तिवेतन योजना या पाचही योजनांतील सुमारे ३५ लाख लाभार्थ्यांना तीन महिन्यांचे मानधन एकत्रित ॲडव्हान्स (आगाऊ) दिले.

चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळांतर्गत मेगा लेदर फूटवेअर ॲन्ड ॲक्सेसरीज क्लस्टर प्रकल्प राबवण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून ५० टक्के अनुदान मिळणार असून राज्यात उभारला जाणारा हा पहिला प्रकल्प आहे. पादत्राणे उत्पादन केंद्र कोल्हापूर येथे महामंडळाच्या उत्पादन केंद्राची इमारत असून, त्या ठिकाणी कोल्हापुरी चप्पल उत्पादनाचे काम सुरू आहे. तसेच तेथे ४० गुंठे मोकळी जागा असून तेथे सामाजिक सुविधा केंद्र व फूटवेअर प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याकरिता शासनाने मंजुरी दिली आहे.

महाप्रीत

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व महाप्रीत कंपनीच्या वतीने ग्रामीण भागात कृषी उत्पादने, सौर ऊर्जा आदी नावीन्यपूर्ण उद्योगांमधून रोजगार निर्मिती व्हावी, यासाठी महामंडळाच्या सर्व प्राधिकृत अधिकाऱ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मागासवर्ग विकास महामंडळाच्या माध्यमातून रोजगारासाठी संधी निर्माण करणे व अर्थसाहाय्य या बाबी हाती घेतल्या जात असून, महामंडळाचे भागभांडवलदेखील वाढवून १ हजार कोटी करण्यात आले आहे.

समता सप्ताह उत्साहात

सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी. तसेच त्याचे उद्देश साध्य व्हावेत, यासाठी ६ ते १६ एप्रिल २०२२ या कालावधीत 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रम' राज्यभर राबवण्यात आला. राज्यात विविध जिल्ह्यात जात पडताळणी प्रमाणपत्र वितरण, विभागाची सर्व महाविद्यालये, आश्रमशाळा, वसतिगृहे, निवासी शाळा या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आधारित वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, लघुनाट्य स्पर्धा पार पडल्या, स्वाधार शिष्यवृत्ती, मिनी टॅक्टर आदी लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात वितरण करण्यात आले.

महामंडळांच्या भागभांडवलात वाढ

सामाजिक न्याय विभागाच्या अधीनस्थ असलेल्या महामंडळाच्या भागभांडवलात भरीव वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या महामंडळाचे लाभार्थी असलेल्या विविध वंचित घटकांना व्यावसायिक कर्ज, शैक्षणिक कर्ज याचबरोबरच इतर विविध योजनांचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळू शकणार आहे.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ हे अनुसूचित जातीकरिता कार्यरत असून या महामंडळाची भागभांडवल मर्यादा ५०० कोटी रुपयांवरून १००० कोटी रुपये इतकी वाढवण्यात आली आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाची भागभांडवल मर्यादा ३०० वरून १०००, संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळाची ७३ वरून १००० तर महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाची भागभांडवल मर्यादा ५० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपये इतकी वाढवण्यात आली आहे.

मादक पदार्थ सेवक प्रतिबंधात्मक कृती योजना

केंद्राची मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक कृती योजना राज्यात राबवण्यात येणार आहे. अंमली पदार्थ तस्करी बंद व्हावी, या दृष्टीने मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृती योजना ही योजना राबवण्यासाठी १३ कोटी ७० लाख रुपये निधी खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

जादूटोणाविरोधी जनजागृती

भारतीय समाजात रूजलेल्या काही अनिष्ट व अघोरी अमानुष संस्कारातून रुजलेल्या अनेक प्रकारच्या गैरसमजुतीमुळे समाजाचे अतोनात नुकसान होते. त्यामुळे लाखो माणसांचे जीव वाचवण्यासाठी त्यांचे होणारे शोषण व छळ थांबवण्यासाठी व समाजाचे मानसिक स्वास्थ्य सुधारण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्यांचे समूळ उच्चाटन करण्याबाबत महाराष्ट्र अधिनियम २०१३ लागू करण्यात आला आहे. जादूटोणाविरोधी कायदा जनजागृती प्रचार आणि प्रसार कार्यक्रम अंमलबजावणी समिती (पीआयएमसी) सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागांतर्गत गठित झाली असून कायद्याचा प्रभावीपणे प्रचार आणि प्रसार करण्यासाठी विभागामार्फत कार्यक्रम सुरू आहेत.

अनुसूचित जाती, जमाती आयोग

अनुसूचित जाती, जमाती समाजाच्या मागण्यांच्या अनुषंगाने या समाजाच्या सध्याच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय सद्य:स्थितीचा अभ्यास करण्याच्या अनुषंगाने शासनास उपाययोजना सुचवण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती, जमाती आयोग' गठित करण्यात आला आहे.

विभागांतर्गत विविध पुरस्कार

- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार** : अनुसूचित जाती, विमूक्त जाती, भटक्या जमाती, दिव्यांग कल्याण क्षेत्रात उल्लेखनीय कार्याचा १५ वर्षांचा अनुभव असलेल्या व्यक्तींसाठी हा पुरस्कार दिला जातो. संस्थेसाठीही हा पुरस्कार दिला जातो. यासाठी संस्थेमध्ये कोणताही गैरव्यवहार नसावा, संस्थेचे समाज कल्याण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आवश्यक असून मागील ५ वर्षांचे लेखा परीक्षण अहवाल आवश्यक.
- **साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार** : मातंग समाजाकरिता कला, साहित्य शैक्षणिक 'क्षेत्रात कार्य करणारे नामवंत, कलावंत साहित्यिक व समाजसेवक यांना हा पुरस्कार दिला जातो, तर समाज कल्याण क्षेत्रात मातंग समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, अंधश्रद्धा निर्मूलन, जनजागृती इत्यादी क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांनाही हा पुरस्कार दिला जातो. मातंग समाजाच्या कल्याणासाठी १० वर्षांहून अधिक मौलिक काम, मातंग समाज सेवा व विकास या क्षेत्रातील काम पाहून पुरस्कारासाठी निवड केली जाते.
- **पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार** : अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील भूमिहीन, शेतमजूर व दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी झटणारे नामवंत समाज सेवकांना हा पुरस्कार दिला जातो. सामाजिक क्षेत्रात कमीत कमी १५ वर्षे कार्य आवश्यक, तर समाज कल्याण क्षेत्रात व अनु.जाती व नवबौद्ध समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, अन्याय निर्मूलन, अंधश्रद्धा रूढी निर्मूलन, जनजागृती, भूमिहीन शेतमजूर यांचे कल्याण इत्यादी क्षेत्रात कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांनाही हा पुरस्कार दिला जातो.
- **संत रविदास पुरस्कार** : चर्मकार समाजाच्या कल्याणासाठी झटणाऱ्या नामवंत समाजसेवकास हा पुरस्कार दिला जातो. सामाजिक क्षेत्रात किमान १५ वर्षे कार्य आवश्यक, तर समाज कल्याण क्षेत्रात चर्मकार समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण, आरोग्य, अन्याय निर्मूलन, अंधश्रद्धा रूढी निर्मूलन, जनजागृती इत्यादी क्षेत्रात कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थेस हा पुरस्कार दिला जातो.
- **शाहू, फुले, आंबेडकर पारितोषिक** : सहा महसूल विभागातील प्रत्येकी दोन याप्रमाणे एकूण १२ संस्थांना १२ पुरस्कार दिले जातात. यासाठी संस्थेने समाजातील अतिशय दुर्बल व मागासवर्गीय घटकातील व्यक्ती व समाजासाठी सेवा, शिक्षण, आरोग्य, पुनर्वसन, रोजगार अशा व यांसारख्या व्यक्तिगत व सामूहिक क्षेत्रामध्ये एकमेव अद्वितीय कार्य केलेले असले पाहिजे.
- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय 'प्रावीण्य'पुरस्कार** : राज्य स्तरावर ३ तर विभागीयस्तरावर (६ महसूल विभागात प्रत्येकी ३) १८ पुरस्कार दिले जातात. अनुसूचित जातीच्या मुलां-मुलींसाठी शासकीय वसतिगृहे, निवासी शाळा/ आश्रमशाळा, अनुदानित वसतिगृहांसाठी हा पुरस्कार दिला जातो. संस्थांची तपासणी करून समितीमार्फत अंतिम निर्णय घेण्यात येतो.

वरील सर्व पुरस्कारांची सविस्तर माहिती विभागाच्या https://sjsa.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

शब्दांकन : संध्या गरवारे,
विभागीय संपर्क अधिकारी

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग यांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी असलेल्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी ९ मार्च २०१७ रोजी इतर मागास बहुजन कल्याण या स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात आली आहे. गेल्या अडीच वर्षात विभागामार्फत या घटकातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.

बहुजनांचा सर्वांगीण विकास

विजय वडेट्टीवार
इतर मागास बहुजन कल्याण,
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री

महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) या संस्थेची स्थापना ८ ऑगस्ट २०१९ ला करण्यात आली आहे. संस्थेमार्फत महाराष्ट्रातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागासप्रवर्गासाठी या घटकांचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास, संशोधन, रोजगारभिमुखता वृद्धी, कौशल्य विकास, स्वयंरोजगार, ग्रामीण विकास, शेती विकास, व्यक्तिमत्त्व विकास, स्पर्धात्मकता विकास, सामाजिक ऐक्य व सलोखा आणि तत्सम क्षेत्रांमध्ये विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. तसेच विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबवण्यात येत आहेत. खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवती व इतर उमेदवारांसाठी विविध योजना राबवण्यासाठी महाराष्ट्र संशोधन उन्नत व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेची नाशिक येथे स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेसाठी एकूण २० पदांना उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिलेली आहे.

विद्यार्थ्यांना टॅबचे वाटप

मार्च-२०२० पासून राज्यात कोविड-१९ संसर्गाचा प्रादुर्भाव पाहायला मिळाल्याने राज्यातील शाळा तसेच आश्रमशाळांमध्ये ऑनलाईन पद्धतीने अभ्यासक्रम सुरू करण्यात आले होते. तथापि, ग्रामीण भागातील आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकडे संगणक व मोबाईल उपलब्ध नसल्याने विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणापासून वंचित राहत आहेत. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, याकरिता आमच्या विभागाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या आश्रमशाळांमधील इयत्ता नववी ते बारावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या एकूण ६५,००० विद्यार्थ्यांना शासनामार्फत टॅब पुरवण्यात आले आहेत. विजाभज प्रवर्गाच्या उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

परदेश शिष्यवृत्ती योजना

इतर मागासवर्ग प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेश शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. या योजनेंतर्गत २०१९-२० या वर्षाकरिता ३ कोटी ९५ लाख, २०२०-२१ या वर्षाकरिता ३ कोटी आणि २०२१-२२ या वर्षासाठी ३ कोटी रुपयांची निधी वितरित करण्यात आला आहे.

मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी २०२१-२२ या वर्षासाठी १४६४ कोटी रुपये इतक्या निधीची अर्थसंकल्पात तरतूद केली होती. त्यापैकी ऑक्टोबर २०२१ पर्यंत ५० टक्के निधी (७३२ कोटी रूपये) वितरित करण्यात आला होता. उर्वरित ७३२ कोटी रुपये निधी २४ नोव्हेंबर २०२१ रोजी वितरित करण्यात आला आहे. अशा प्रकारे अर्थसंकल्पातील मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठीचा २०२१-२२ या वर्षासाठीचा १४६४ कोटी रुपये निधी १०० टक्के वितरित करण्यात आला आहे.

महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

भरीव तरतूद

वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत विकासकामांना देण्यात येणारा निधी तांडा वस्तीच्या लोकसंख्येवर आधारित देण्यात येणार आहे. बंजारा समाजाची लोकसंख्या जास्त आहे, अशा बंजाराबहूल ११ जिल्ह्यांमध्ये बंजारा समाजातील व्यक्तींच्या अध्यक्षतेखाली अशासकीय समिती स्थापन

करण्यात येणार आहे. तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत आता १०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या तांडा वस्तीला १५ लाख रुपये, १०० ते १५० लोकसंख्या असलेल्या तांडा वस्तीला २० लाख रुपये, तर १५० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या तांडा वस्तीला २५ लाख रुपये निधीचे वितरण करण्यात येणार आहे. संतश्रेष्ठ रामराव महाराज सभागृहालादेखील याच धर्तीवर निधीची तरतूद करण्यात आली आहे.

ओबीसींना १९ टक्के आरक्षण

राज्य सरकारने अनुसूचित जमातीची लोकसंख्या अधिक असलेल्या ८ जिल्ह्यांतील आरक्षण पूर्ववत केले आहे. शासनाच्या या निर्णयामुळे तब्बल १९ वर्षानंतर ओबीसींना न्याय मिळाला आहे. त्याचा लाभ वर्ग ३ व वर्ग ४ च्या सरळसेवा भरतीत ओबीसींना याचा फायदा होणार आहे. शिक्षक, ग्रामसेवक, पटवारी, अंगणवाडी सेविका, कृषी साहाय्यक यासारख्या पदभरतीमध्ये ओबीसींना याचा फायदा होणार आहे.

जिल्हास्तरावर समिती

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना आणि वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार या दोन्ही योजनांतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची छाननी करण्याकरिता संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आलेली आहे. या समितीस प्रस्तावांची शिफारस करण्याकरीता लोकप्रतिनिधींच्या अध्यक्षतेखाली तालुका स्तरावर तसेच बंजाराबहुल जिल्ह्यांकरिता जिल्हास्तरावर समितीची स्थापना करण्यात आलेली आहे.

राज्य मागासवर्ग आयोगाची स्थापना

राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागासप्रवर्गात एखादी जात समाविष्ट करण्यासाठी किंवा त्या प्रवर्गातून एखादी जात वगळण्याबाबत आलेल्या मागण्या व तक्रारींची तपासणी करून अभ्यासपूर्ण शिफारस राज्य शासनास करण्याकरिता राज्य मागासवर्ग आयोगाची स्थापना करण्यात आली असून आयोगाचे कार्यक्षेत्र संपूर्ण राज्यभर आहे.

नवीन अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती सुरू

इतर मागास बहुजन कल्याण विभागातर्फे नुकतीच नवीन ६४ व्यावसायिक अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे रोजगार, स्वयंरोजगार, व्यावसायिक अभ्यासक्रमातून जीवनमान सुधारावे व रोजगारसंधी उपलब्ध व्हाव्यात, या हेतुने इतर मागास बहुजन कल्याण विभाग सतत प्रयत्नशील आहे. यापूर्वी शिष्यवृत्ती देण्यात येणारे संपूर्ण ६०५

अभ्यासक्रम होते. आता यामध्ये वाढ करत एकूण ७३६ कोर्सेस सुरू करण्यात आले आहेत. त्यात २०२०-२०२१ या वर्षापासून ४०, तर २०२१-२०२२ पासून २४ अभ्यासक्रम नव्याने सुरू करण्यात आले आहेत.

नवीन वेबपोर्टल

राज्यातील इतर मागास प्रवर्गातील युवक - युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याकरिता कौशल्य विकास विभागाच्या सहकार्याने नवीन वेबपोर्टल www.msobcfdc.org तयार करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत राज्यातील इतर मागासवर्ग प्रवर्गातील युवक-युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याकरिता ऑनलाईन पोर्टल कार्यान्वित करण्यात आले आहे.

महामंडळाचा नामविस्तार

राज्यातील इतर मागासप्रवर्गातील दुर्बल घटकांना स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांचा सामाजिक स्तर उंचावण्याकरिता महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. आजपर्यंत विविध योजनांच्या माध्यमातून इतर मागासवर्ग प्रवर्गातील पात्र व्यक्तींना अल्प व्याज दराने कर्ज देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासात महामंडळाचे बहुमूल्य योगदान आहे. त्यामुळे या महामंडळाला संत गाडगेबाबा यांचे नाव देण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावास महामंडळाच्या १५ मार्च २०२२ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले घरकूल योजना

विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्गाकरिता क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले घरकूल योजना राबवण्याबाबत २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय भाषणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घोषणा केली आहे. तसेच अन्न, नागरी पुरवठा मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले घरकूल योजना ही स्वतंत्र योजना राबवण्याची शिफारस केलेली आहे. सध्या विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाकरिता यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबवण्यात येत असल्याने विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्गाकरिता क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले घरकूल योजना राबवण्याचे प्रस्तावित आहे.

नवीन संकेतस्थळ

इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे नवीन संकेतस्थळ नुकतेच सुरू करण्यात आले आहे. या संकेतस्थळामुळे जनतेला घरबसल्या सर्व माहिती मिळण्यास मदत होणार आहे. हे संकेतस्थळ मराठी व इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये उपलब्ध आहे. https://obcbahujankalyan.maharashtra.gov.in/en असे हे संकेतस्थळ आहे. या संकेतस्थळावरील माहिती विद्यार्थी तसेच जनतेला अत्यंत उपयुक्त अशी आहे.

शब्दांकन : संध्या गरवारे,
विभागीय संपर्क अधिकारी

उपेक्षित, वंचित घटकांसाठी राजसत्ता वापरून आदर्श निर्माण करणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाची केवळ संकल्पना मांडली नाही, तर ती प्रत्यक्षात आणली आणि सामाजिक न्यायाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्याच कार्याला पुढे नेत असताना राज्य सरकारनेदेखील सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात विविध निर्णय घेतले आहेत.

लोककल्याणाचे कार्य

डॉ. विश्वजीत कदम
राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य

राज्यात नोव्हेंबर २०१९ मध्ये महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर सामाजिक न्यायाच्या योजना, निर्णय-उपक्रमांवर विशेष लक्ष दिले आहे. परदेश शिष्यवृत्ती योजना, स्वाधार, ज्येष्ठ नागरिक, ऊसतोड कामगार, सफाई कामगार, तृतीयपंथीयांसाठी महामंडळ, सामाजिक समता कार्यक्रमाबरोबर बार्टीच्या माध्यमातून विविध प्रशिक्षण, उपक्रम शासन राबवत आहे.

इंदू मिलमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारणीचे काम प्रगतिपथावर आहे, काम पूर्ण झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे राहणार आहे, स्मारक उभारणीच्या कामाचे संनियंत्रण सामाजिक न्याय विभाग करत आहे. स्वाधार योजनेच्या लाभासाठी शहर ते महाविद्यालयाच्या अंतराची मर्यादा ५ कि.मी. वरून १० कि.मी.पर्यंत करण्यात आली आहे. ग्रामीण व शहरी भागातील वाडी, गावे, वस्त्यांची जातिवाचक नावे रद्द करण्याचा निर्णय महत्त्वपूर्ण ठरतो आहे. 'ई-बार्टी' या मोबाईल ॲपच्या माध्यमातून 'बार्टी' च्या सर्व योजना एका क्लिकवर उपलब्ध झाल्या आहेत. 'बार्टी'च्या माध्यमातून संघ लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांना प्रशिक्षण दिले जात आहे. पाचशेपेक्षा अधिक अनुसूचित जातीची लोकवस्ती असलेल्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत संविधान सभागृह बांधण्याचा निर्णयदेखील महत्त्वाचा आहे. हे सभागृह बांधून तयार झाल्यावर त्या ठिकाणी सभागृह, अभ्यासिका, ग्रंथालय आदी सुविधांची उपलब्धता करून दिली जाणार आहे.

समाधिस्थळासाठी निधी

सामाजिक समतेचा संदेश देणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या समाधिस्थळासाठी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने ८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचे कोल्हापुरात जाहीर केले असून हा निधी टप्प्याटप्प्याने वितरित करण्यात येणार आहे. 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिशताब्दी कृतज्ञता पर्व'अंतर्गत विविध उपक्रमांसाठी ५ कोटी रुपयांचा निधी यापूर्वीच मंजूर करण्यात आला आहे.

ग्रामपंचायतींना निधी

विधवा प्रथाबंदीचा क्रांतिकारी निर्णय घेऊन कोल्हापूर जिल्ह्यातील हेरवाड आणि माणगाव या गावांनी राज्यासमोर आदर्श निर्माण केला आहे. हेरवाड आणि माणगाव ग्रामपंचायतीला सामाजिक विकासासाठी सामाजिक न्याय विभागाच्या वतीने प्रत्येकी १५ लाखांचा निधी मंजूर करण्यात येत आहे.

भारतरत्न पुरस्कारासाठी शिफारस

मातंग समाजबांधवांच्या उन्नतीच्या विविध शैक्षणिक आणि इतर योजना राबवण्यात येत आहेत. क्रांतिवीर लहुजी साळवे यांच्या स्मारकासाठी निधी उपलब्ध करून देण्यासह वाळवा तालुक्यातील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मगावी वाटेगाव येथे असलेल्या स्मारकाच्या विकासावर भर देण्यात येणार आहे. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचा मरणोत्तर 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मान व्हावा, यासाठी राज्य शासन केंद्र सरकारकडे शिफारस करणार आहे.

दिव्यांगांसाठी नावीन्यपूर्ण योजना

दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाने अर्थसंकल्पात सुमारे ५०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिव्यांगांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या ५ टक्के निधीचे योग्य नियोजन करून तो खर्च होईल, या दृष्टीने संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. दिव्यांगांच्या मागण्या आणि सूचना लक्षात घेऊन नावीन्यपूर्ण योजना राबवण्याचा शासनाचा मानस आहे.

जात प्रमाणपत्रांसाठी विशेष शिबिरे

राज्यातील काही भागात असलेल्या गोसावी समाजाच्या जुन्या नोंदी नसतील तरी इतर पुराव्यांच्या आधारावर जात प्रमाणपत्र देण्याविषयी पडताळणी करून जात प्रमाणपत्र देण्यासाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात यावे, असे निर्देश यापूर्वीच देण्यात आले आहेत. नंदीवाले समाजातील लोकांना जातींचे दाखले वितरित करण्यासाठी समतादूत तसेच महसूल विभाग यांच्या माध्यमातून राज्यात तालुका, गावनिहाय विशेष शिबिराचे आयोजन करून दाखले वितरित करण्यात येणार आहेत. तसेच या समाजबांधवांना घरकूल योजनेचा लाभ देण्यासाठी प्राधान्य देण्याचे निर्देश दिले असून नंदीवाले समाज हा भटक्या जमातीमधील असल्याने मानीव दिनांकापूर्वीचे जातीचे पुरावे उपलब्ध नाहीत, अशांसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत तपासणी करून जातीचे दाखले वितरित करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत.

शब्दांकन : किशोर गांगुर्डे,
विभागीय संपर्क अधिकारी

शासनाच्या अनेक योजना असून यासाठी समाजातील अनाथ, विधवा, दिव्यांग तसेच मागासवर्गीय यांसारख्या गरजू घटकांतील अनेक महिला, बालके, कष्टकरी, शेतकरी, नागरिक यासाठी पात्र असतात. या गरजूंना खऱ्या अर्थाने मदतीची आवश्यकता असते. या सर्वांचा योग्य त्या शासकीय योजनेत समावेश करून घेण्यासाठी संपूर्ण राज्यभर अभियान राबवून या वंचित घटकांना न्याय मिळावा, यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत.

वंचित घटकांना न्याय

ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू
राज्यमंत्री, इतर मागास बहुजन कल्याण

समाजात आजही कित्येक पात्र नागरिकांना शासनाच्या योजना माहिती नसल्याने ते या योजनांपासून दूर राहतात. शहरीकरण होत असले तरी आजही राज्यातील सुमारे ५३ टक्के नागरिक खेड्यात राहतात. शासकीय योजना सर्वांसाठी असल्या तरी त्याची माहिती दुर्गम भागात राहणाऱ्या जनतेला नसते. त्यामुळे या बहुजनांना त्यांचे न्याय्य हक्क मिळावे, यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करून शासकीय योजनांचा लाभ त्यांना मिळावा, यावर माझा विशेष भर राहणार आहे.

राज्यातील वंचित घटकांना न्याय मिळावा, त्यांना सुखी व समृद्ध जीवन जगता यावे यासाठी महामंडळे, मंडळे यांच्यामार्फत प्रत्येक तालुक्यातून दोन-तीन गटांचे उद्योग व्यवसाय वाढवण्याचे माझे नियोजन आहे. राज्यात प्रत्येक जिल्ह्याची एक स्वतंत्र ओळख आहे. गडचिरोली जिल्हा म्हटला तर तेथे मोहफुलांचे उत्पादन होते. या मोह प्रक्रियेवर उद्योग उभारणीला मोठा वाव आहे. ही उद्योग उभारणी झाली, तर रोजगारांच्या संधी निर्माण होतील.

एक सहज म्हणून अनुभव सांगतो, चंद्रपूर जिल्ह्याच्या जिवती या अतिदुर्गम गावास मी भेट दिली. तेथे राहणाऱ्या मागास व कोलामांच्या आयुष्यात सुवर्णक्षण आला पाहिजे. यासाठी तेथे विशेषकरून जनता दरबार घेतला. त्यामुळे मला त्यांच्या व्यथा, त्यांच्या गरजा जाणून घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे मी शासकीय यंत्रणेला निर्देश दिले. प्रत्येक वंचित घटकांना न्याय्य हक्क मिळण्यासाठी मायक्रो प्लॅनिंग करण्याचे माझे नियोजन आहे.

योजनांचा लाभ

माझ्याकडे इतर मागास बहुजन कल्याण विभागाबरोबरच कामगार विभागाचीही जबाबदारी आहे. त्यामुळे समाजातील वंचित घटकांना त्यांच्याकरिता असलेल्या योजनांसह हाताला काम देण्याचे भाग्य आहे. ९० दिवसांपेक्षा अधिक दिवस काम केल्यास त्या कामगारांना कामगार खात्यांशी जोडून विभागाच्या १९ योजनांचा लाभ देण्यात येतो. त्यामुळे बहुसंख्य नागरिकांना याबाबत माहिती देण्यासाठी मी वेळोवेळी निर्देश दिलेले आहे.

विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात

शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडे मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना, मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना, धनगर समाजाच्या विकासासाठीच्या विशेष योजना, आश्रमशाळा, वसतिगृहासंबंधी योजना, तांडा/वस्ती योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, वाहन चालक प्रशिक्षण योजना (विजाभज, इमाव व विमाप्र), कन्यादान योजनेंतर्गत नवविवाहित दाम्पत्यांना वित्तीय साहाय्य देण्याबाबत कार्यक्रम योजना, विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या लोकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना वित्तीय साहाय्य योजना अशा विविध योजना राबवल्या जातात. विविध प्रवर्गातील नागरिक, विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला पाहिजे. या विविध योजनांमुळे होतकरू विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात येण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही, याचा मला विश्वास आहे.

प्रशिक्षण देण्याची योजना

विमुक्त जाती, भटक्या जमाती व विमाप्र जातीतील अल्पशिक्षित उमेदवारांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या प्रशिक्षण सुविधांची व साधन सामग्रीचा यथायोग्य वापर करून अल्प कालावधीचे प्रशिक्षण देऊन या प्रशिक्षित उमेदवारांना स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी व सेवाविषयक कामे करण्याची संधी मिळावी, याकरिता विमाप्र व विजाभजच्या विद्यार्थ्यांना व्यवसायिक प्रशिक्षण देण्याची योजना आम्ही राबवत आहोत. याद्वारे राज्यातील एकंदर ३४७ कार्यरत औद्यागिक प्रशिक्षण संस्थेमधून प्रशिक्षण देण्याची योजना राबवण्यात येईल. हे प्रशिक्षण, संस्थेतील नियमित प्रशिक्षणाच्या वेळेनंतर दररोज ४ तास आयोजित केले जाते आणि स्थानिक गरजानुसार व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते.

माझे राज्यातील होतकरू विद्यार्थ्यांना, नागरिकांना आणि दिव्यांगांना आवाहन आहे की, शासन सर्व योजना या सर्व घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राबवत असते. समाजाची उन्नती ही राज्याची प्रगती आणि त्यातच देशाची प्रगती होते, हे नक्की.

शब्दांकन : संजय ओरके,
विभागीय संपर्क अधिकारी

नव्या पिढीपर्यंत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पोहोचावे, यासाठी शासन अनेक उपक्रम राबवत असते. अशाच एका उपक्रमांपैकी दादर येथील इंदू मिल परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचा उल्लेख करावा लागेल. इंदू मिल परिसरात उभारण्यात येणारे हे स्मारक राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरणार आहे. मार्च २०२४ पर्यंत या स्मारकाचे काम पूर्ण करण्याचा राज्य शासनाचा निर्धार आहे.

प्रेरणादायी स्मारक

इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारक उभारणी कामाचे संनियंत्रण सामाजिक न्याय विभागाने घेतले आहे. या स्मारकाच्या कामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे. या स्मारकाची उंची १०० फुटाने वाढवण्यात येणार आहे. हे स्मारक सर्वोत्कृष्ट व्हावे, तसेच या स्मारकाचे काम २०२४ पूर्वी पूर्ण व्हावे, यासाठी सामाजिक न्याय विभाग प्रयत्नशील आहे.

स्मारकाच्या कामाला गती

स्मारक उभारणीसाठी प्रगती तक्ता तयार करून दर १५ दिवसांनी या कामाच्या प्रगतीचा अहवाल घेण्यात येत आहे. या परिसरात करण्यात येणाऱ्या कामांची माहिती सादरीकरण तसेच प्रत्यक्ष भेट देऊन सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी घेतली. स्मारकाच्या प्रवेशद्वार, इमारतीमध्ये माहिती सेंटर, तिकिट घर, लॉकर रूम, प्रसाधनगृह, सुरक्षा काऊंटर, स्मरणिका कक्ष, उपहारगृह व नियंत्रण कक्ष याबाबींचा अंतर्भाव आहे.

प्रेक्षकगृह, संशोधन केंद्र, व्याख्यान वर्ग व ग्रंथालय, ध्यानकेंद्र, तळघर वाहनतळाचे काम गतीने सुरू आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिकृती धोरण निश्चितीसंदर्भातील सर्व कार्यवाहीची कामेही मार्गी लावण्यासाठी सामाजिक न्याय विभाग प्रयत्नशील आहे.

स्मारकासाठी उपसमिती

मंत्रिमंडळाने धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली स्मारकाचे सनियंत्रण व जलद गतीने पूर्ण करणे यासाठी एक उपसमिती नेमली आहे. या उपसमितीमध्ये श्री. मुंडे यांच्यासह नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांचा समावेश आहे. या स्मारकाचे काम शीघ्रगतीने पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

इंदूमिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकस्थळी उभारण्यात येणाऱ्या भव्य पुतळ्याची प्रतिकृती प्रसिद्ध शिल्पकार पद्मभूषण राम सुतार व त्यांच्या टीमने तयार केली आहे. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य मंत्री धनंजय मुंडे आणि शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी नुकतीच या प्रतिकृतीची गाझियाबाद (उत्तर प्रदेश) येथे जाऊन पाहणी केली.

मुंबईतील इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकस्थळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य १०० फूट पादपिठासह ३५० फूट असा एकूण ४५० फूट उंचीचा पुतळा बसवण्यात येणार आहे. या पुतळ्याची प्रतिकृती तयार करण्याचे काम उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथे शिल्पकार पद्मभूषण राम सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या ठिकाणी पुतळ्याची २५ फुटी प्रतिकृती तयार करण्यात आली असून सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे, शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, समाज कल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांच्यासह राज्य शासनाच्या समितीने गाझियाबाद येथे भेट देऊन या कामाची नुकतीच पाहणी केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल येथे बसवण्यात येणाऱ्या मुख्य पुतळ्याची निर्मिती, ही प्रतिकृती अंतिम झाल्यानंतरच सुरू करण्यात येईल. यासाठी प्रतिकृतीचे काम वेळेत पूर्ण केले जावे, अशा सूचना या वेळी मंत्रिमंडळ उपसमितीने शिल्पकार राम सुतार व त्यांच्या टीमला दिल्या आहेत. सुमारे ११०० कोटी रुपये खर्चून इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचे काम करण्यात येत आहे. इंदू मिल येथे ज्या १०० फुटी पिलरवर मुख्य पुतळा बसवण्यात येणार आहे, त्या पिलरचे ७५ टक्के काम पूर्ण झाले असून, लवकरच संपूर्ण काम होणार आहे. शासनाने हे काम गतीने व्हावे, यासाठी सर्व कार्यान्वयीन यंत्रणांना सूचित केले आहे. हे काम लवकरच पूर्ण होऊन राज्य शासनाची ही वास्तू एक आंतरराष्ट्रीय दर्जाचे अभ्यासकेंद्र म्हणून ख्याती मिळवेल व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार नक्कीच या ठिकाणी भेट देणाऱ्यांना मार्गदर्शक ठरतील.

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीने शैक्षणिक सवलतीसाठी आणि आर्थिक उन्नतीसाठी उपयोगी ठरणाऱ्या महत्त्वपूर्ण योजना राबवल्या जातात. अशा योजनांचा थोडक्यात आढावा..

वंचितांसाठी योजना

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती

इयत्ता दहावी विशेष प्रावीण्य मिळवणाऱ्या मागासवर्गीय मुलामुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. ७५ त्यापेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या मागासवर्गीय मुलामुलींना रुपये ३०० दरमहा १० महिने कालावधीसाठी ही शिष्यवृत्ती दिले जाते.

उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

राज्यातील १०० अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी ही शिष्यवृत्ती देण्यात येते. आयआयटी, आयआयएम व तत्सम पात्रतेच्या अभ्यासक्रमास आणि शासनाने विहित केलेल्या उच्च शिक्षण संस्थेमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थांना ही शिष्यवृती दिली जाते.

परदेशात शिक्षणासाठी

अनुसूचित जाती, नवबौद्ध प्रवर्गातील प्रवेश घेतलेल्या ७५ विद्यार्थ्यांना परदेशामध्ये विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. परदेशात पदव्युत्तर पदवी आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पीएच.डी) विशेष अध्ययन करण्यासाठी आर्थिक मदत देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश होय. प्रवेशित विद्यापीठाचे क्यूएसडब्ल्यूआर (QSWR) ३०० च्या आत असावे. क्यूएसडब्ल्यूआर १ ते १०० असल्यास उत्पन्न मर्यादा नाही व त्यापुढील विद्यापीठासाठी उत्पन्न मर्यादा ६०० रुपये आहे.

आश्रम शाळा

विमुक्त जाती भटक्या जमातीच्या आश्रम शाळांच्या धर्तीवर अनुसूचित मुला-मुलींसाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत आश्रम शाळा व माध्यमिक आश्रम शाळा सुरू करण्यात आल्या. या योजनेद्वारे प्रवेशीत विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन, शैक्षणिक सुविधा दिल्या जातात. राज्यात १९ आश्रमशाळा कार्यरत आहेत.

शासकीय निवासी शाळा

अनुसूचित जाती व नवोबौद्ध मुला-मुलींकरिता प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी १ शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत प्रवेश दिला जातो. सद्य:स्थितीत राज्यात एकूण ९० निवासी शाळा कार्यरत आहेत.

सावित्रीबाई फुले योजना

इयत्ता पाचवी ते दहावीमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी ही योजना मंजूर केली असून या योजनेद्वारे इयत्ता आठवी ते दहावीमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुलींना दरमहा रुपये १०० याप्रमाणे १० महिने शिष्यवृत्ती देण्यात येते. तसेच पाचवी ते सातवीमधील मुलींना दरमहा रुपये ६० असे दहा महिने ही शिष्यवृत्ती दिली जाते.

शिक्षण व परीक्षा शुल्क (मॅट्रिकोत्तर)

कुटुंबाचे उत्पन्न विचारात न घेता शासन निर्णयात नमूद शिक्षणक्रमासाठी मान्यताप्राप्त संस्थेत प्रवेशित अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थांना शिक्षण व परीक्षा शुल्क प्रदान करण्यात येते.

भारत सरकार मॅट्रिकोत्तर योजना

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षण घेण्यासाठी ही योजना आहे. दरमहा रुपये २३० ते ४५० या दराने निर्वाह भत्ता देण्यात येतो. तसेच वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निर्वाहाचे दरमहा रुपये ३८० ते १२०० दिले जातात.

मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती

ही योजना अस्वच्छ व्यवसायात काम करणारे, अस्वच्छ व्यवसायाशी परंपरेने संबंधित सफाईगार, कातडी कमावणे व सोलणे इत्यादी व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या मुलांना मॅट्रिकपूर्व शिक्षण घेता येण्याच्या उद्देशाने पहिली ते दहावीतील वसतिगृहात व वसतिगृहाबाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दहा महिन्यांसाठी दिली जाते. या योजनाच्या माध्यमातून शिष्यवृत्ती घेणाऱ्यास उत्पन्नाची अट नाही.

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील दारिद्र रेषेखालील भूमिहीन शेतमजूर कुटुंबांना उदरनिर्वाहाचे कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध होण्याकरिता त्यांना कसण्याकरिता २ एकर ओलिता खालील जमीन किंवा ४ एकर कोरडवाहू जमीन उपलब्ध करून देण्यात येते. ही योजना १०० टक्के अनुदान तत्त्वावर सुरू आहे.

स्वयंसाहाय्यता बचतगटांसाठी योजना

कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेचे लाभार्थी तसेच अनुसूचित प्रवर्गातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना महिला बचतगटांना मिनी ट्रक्टर व उपसाधने पुरवठा करण्यात येतो.

गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देणे

अनुसूचित जातीच्या गटई कामगारांना त्यांची आर्थिक व सामाजिक उन्नती

साधण्यासाठी १०० टक्के अनुदान तत्त्वावर लोखंडी पत्रे यांचे स्टॉल व ५०० रुपये इतके रोख अनुदान साहित्य खरेदी करण्यासाठी देण्यात येते.

सहकारी संस्थांना अर्थसाहाय्य योजना

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी ही योजना राबवली जाते. या योजनेंतर्गत सहकारी कायद्यानुसार स्थापन करण्यात आलेल्या अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थेत कर्ज व भाग भांडवल उपलब्ध करून देण्याची ही योजना आहे. या योजनेंतर्गत प्रकल्पाची मूल्यमर्यादा पाच ते सात कोटीपर्यंत आहे. या योजनेत प्रामुख्याने यंत्रमाग सोसायट्या, निटिंग गारमेंट, कापड प्रक्रिया उद्योग, शेतमाल प्रक्रिया उद्योग, साखर कारखाने खांडसरी कारखान्यात रूपांतरित करणे इत्यादी उद्योग अपेक्षित आहेत.

आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन

या योजनेंतर्गत आंतरजातीय विवाह करणाऱ्या विवाहित जोडप्यांना रुपये ५० हजार अर्थसाहाय्य देण्यात येते. यामध्ये विवाह करणाऱ्यांपैकी एक अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या व्यक्तीपैकी व दुसरी व्यक्ती सवर्ण समाजातील असावी.

प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाने २००९-१० या आर्थिक वर्षापासून प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना लागू केली आहे. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून निवड केलेल्या अनुसूचित जातीची ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावात मूलभूत सोयीसुविधांची कामे केली जातात.

तृतीयपंथीयांचे कल्याण व संरक्षण योजना

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने १३ डिसेंबर २०१८च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरावर मा. मंत्री सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली तसेच विभागीय स्तरावर मा. विभागीय आयुक्त (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाची स्थापना केली आहे. तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांमध्ये तृतीयपंथीयांच्या समस्यांच्या/ तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तक्रार निवारण समिती गठित करण्यात आली आहे. तृतीयपंथीय घटकांसाठी विभागामार्फत नावीन्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण योजना राबवण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच National portal for Transgender Persons पोर्टलद्वारे ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरू आहे.

शासकीय वसतिगृह

मागासवर्गीय मुलामुलींना निवास, भोजन इत्यादी सोयीसुविधा उपलब्ध केल्या जातात. या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. राज्यात शासकीय वसतिगृह यांची संख्या ४४९ आहे. विद्यार्थ्यांना मोफत निवास व भोजन, आंथरूण-पांघरूण, क्रमिक पाठ्यपुस्तके, वह्या स्टेशनरी व दैनंदिन खर्चासाठी निर्वाह भत्ता दिला जातो.

वसतिगृहांना साहाय्यक अनुदाने

मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व्हावा, या उद्देशाने स्वयंसेवी संस्थामार्फत चालवण्यात येणाऱ्या मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहांना साहाय्यक अनुदान देण्यात येते. या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास, भोजन, आंथरूण-पांघरूण, क्रीडा साहित्य आदी सोयीसुविधा मोफत देण्यात येतात. राज्यात सध्या २३८८ वसतिगृहे आहेत.

गुणवत्ता पुरस्कार

इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत विशेष उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील मुलामुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान केला जातो. सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रत्येक विभागीय बोर्डामधून प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास १ लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येते. तसेच जिल्हा, तालुका व शाळानिहायदेखील पुरस्कार देण्यात येतो.

सैनिक शाळेतील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता

नाशिक, पुणे व सातारा या सैनिक शाळांमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर शिक्षण व परीक्षा शुल्क, भोजन, निवास, कपडे घोडेस्वारी पॉकेटमनी इत्यादींवर होणाऱ्या खर्चाची पूर्ण प्रतिपूर्ती करण्यात येते. याशिवाय इतर मान्यताप्राप्त सैनिक शाळांतील प्रत्येक विद्यार्थ्याला प्रतिवर्षी १५ हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते.

सफाई कामगारांच्या मुलामुलींसाठी निवासी शाळा

सफाई काम करणाऱ्या पालकांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नये, त्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी पुणे व नागपूर येथे निवासी शाळा कार्यरत आहेत. निवासा बरोबरच भोजन, नाष्टा, शैक्षणिक साहित्य, आंथरूण-पांघरूण, गणवेश इत्यादी सर्व सोयीसुविधा शासनामार्फत विनामूल्य पुरवण्यात येतात.

रमाई आवास योजना

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील बेघर व्यक्तींना स्वतःच्या मालकीचे घर उपलब्ध व्हावे, या हेतूने सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग ९ मार्च २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार २००९-१० या वर्षापासून रमाई आवास योजना राबवण्यात येत आहे. ही योजना ग्रामीण व शहरी अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये राबवण्यात येते.

सहकारी सूत गिरण्यांना कर्ज

राज्यातील अनुसूचित जातीच्या सहकारी सूतगिरण्यांना वित्तीय साहाय्य करण्यासाठी ही योजना असून सूतगिरणीची प्रकल्प मूल्यमर्यादा रुपये ५३ कोटी आहे. प्रकल्प किमतीच्या पाच टक्के आणि कमीत कमी रुपये ८० लाख पर्यंत सभासद भागभांडवल गोळा केल्यास दीर्घ मुदतीचे साहाय्य

सामाजिक न्याय विभागाकडून दिले जाते.

कुटुंबातील सदस्यांना अर्थसाहाय्य

नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५ अन्वये अस्पृश्यता पाळणे व ती पाळण्यास उत्तेजन देणे हा गुन्हा समजण्यात आला असून त्यासाठी शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या व्यक्तींवर होणाऱ्या अत्याचारांना पायबंद घालण्यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम-१९८९ व सुधारित नियम, १९९५ हा कायदा लागू करण्यात आलेला आहे. या कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यांच्या स्वरूपानुसार ०.८५ लाख ते ८.२५ लाख रुपये इतके अर्थसाहाय्य २३ डिसेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार देण्यात येते.

कन्यादान योजना

विवाहप्रसंगी पालकांवरील आर्थिक भार कमी व्हावा, म्हणून या योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या व्यक्तींना आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. २० हजार रुपये इतकी रक्कम वधूचे वडील, आई किंवा पालक यांचे नांवे रेखांकित धनादेशाद्वारे विवाहाचे दिवशी देण्यात येते. तसेच सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजक संस्था वा संघटनांना प्रत्येक जोडप्यामागे ४ हजार रुपये असे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते.

वस्त्यांचा विकास

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचे राहणीमान सुसह्य व्हावे, राहणीमानात सुधारणा व्हावी, म्हणून त्यांचे वस्त्यांमध्ये पायाभूत सुविधा उदा. पाणीपुरवठा, मलनि:स्सारण, जोड रस्ते, अंतर्गत रस्ते, वीजपुरवठा व समाज मंदिर आदी सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून या योजनेंतर्गत प्राधान्यक्रमाने कामे जिल्हा परिषदेमार्फत घेण्यात येतात.

भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना

इयत्ता नववी व दहावीमध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना शासन मान्यताप्राप्त शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू आहे. या योजनेसाठी विद्यार्थ्यांनी अर्ज करणे आवश्यक आहे. अर्ज करण्यासाठी पालकांची उत्पन्न मर्यादा दोन लाख रुपयांपर्यंत असावी. वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दहा महिन्यांसाठी प्रतिमाह १५० रुपये व पुस्तके व तदर्थ अनुदान म्हणून ७५० रुपये अशी रक्कम मंजूर केली जाते, तर वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दहा महिन्यांसाठी प्रतिमाह ३५० रुपये व पुस्तके व तदर्थ अनुदान म्हणून १००० रुपये अशी रक्कम मंजूर केली जाते.

मार्जिन योजना

केंद्र शासनाने २०१५ मध्ये 'स्टँड अप इंडिया' ही योजना घोषित केली आहे. या योजनेत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या घटकांकरिता मार्जिन मनी उपलब्ध करून देण्यात येतो. शासन निर्णयान्वये केंद्र शासनाच्या स्टँड अप योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यात सवलती घेण्यास पात्र असलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील नवउद्योजक लाभार्थ्यांना मार्जिन मनी भरण्याची क्षमता नसल्यामुळे या नवउद्योजक लाभार्थ्यांना एकूण प्रकल्प किमतीच्या लाभार्थी यांच्या हिश्श्यामधील २५% मधील जास्तीत जास्त १५% मार्जिन मनी उपलब्ध करून देण्यात येते.

स्वाधार योजना

राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसुचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबवण्यात येते. ११ वी, १२ वी व १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. या योजनेत भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा या विद्यार्थ्यांना स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम या योजनेद्वारे जमा केली जाते.

सामाजिक विकास योजना

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमध्ये पाणीपुरवठा, मलनि:स्सारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते, सार्वजनिक शौचालये, गटारे, समाज मंदिरे, वाचनालये, स्मशानभूमीचा विकास, व्यायामशाळा, पर्जन्य पाण्याचा निचरा, वाचनालय, अभ्यासिका, धम्म केंद्र, विपश्यना केंद्र आदी कामे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत करण्यात येतात.

ज्येष्ठ नागरिक धोरण

ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता त्यांना वृद्धापकाळ चांगल्या तऱ्हेने घालवता यावा, समाजामध्ये त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, शारीरिक व मानसिक आरोग्य सुस्थितीत राहावे, वृद्धापकाळामध्ये त्यांच्या आर्थिक क्षमता, कामाचा हक्क, शिक्षणाचा हक्क व सार्वजनिक मदत मिळवण्यासाठी राज्य शासनाने राज्याचे ज्येष्ठ नागरिक धोरण जाहीर केले आहे. ९ जुलै २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्य शासनाच्या सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिकांच्या धोरण अंमलबजावणी संबंधित प्रशासकीय विभागाकडून राबवण्याची कार्यवाही करण्यात येते.

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या शिष्यवृत्ती योजना

भारत सरकारच्या डॉ. आंबेडकर मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमाती (डी.एन.टी.) प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती (केंद्र ७५% व राज्य हिस्सा २५%) : ही केंद्र शासनाची योजना आहे. विजाभजमधील पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना प्रतिमहा १०० रुपये प्रमाणे १० महिन्यांसाठी १००० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. तसेच नववी ते दहावीमधील विद्यार्थ्यांना प्रतिमहा १५० रुपये प्रमाणे १० महिन्यांसाठी १५०० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी वर्ग-२,

बृहन्मुंबई, संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्याशी संपर्क साधावा.

भारत सरकारच्या डॉ. आंबेडकर मॅट्रिकपूर्व व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमाती (डी.एन.टी.) प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती (केंद्र ७५% व राज्य हिस्सा २५%) : ही केंद्र शासनाची योजना असून या योजनेत वसतिगृहात राहणारे तसेच न राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दहा महिन्यांकरिता ही योजना अनुज्ञेय असेल. गट-१ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १२०० रुपये, तर वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यासाठी ५५० रुपये, गट-२ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ८२० रुपये, तर वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ५३० रुपये, गट-३ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ५७० रुपये, तर वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यासाठी ३००० रुपये, गट-४ मधील अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ३८० रुपये, तर वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २३० रुपये या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी वर्ग-२, बृहन्मुंबई, संबंधित विद्यालयाचे प्राचार्य यांच्याशी संपर्क साधावा.

भारत सरकारची इतर मागास प्रवर्गासाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना (केंद्र ५०% व राज्य हिस्सा ५०%) : या योजनेत दरमहा शिष्यवृत्ती १० महिन्यांकरिता देण्यात येते.

अनिवासी इयत्ती पहिली ते दहावीसाठी १०० रुपये तसेच निवासी इयत्ता तिसरी ते दहावीसाठी ५०० रुपये देण्यात येतात. तदर्थ अनुदान वर्षाकरिता देण्यात येते. अनिवासी इयत्ता पहिली ते दहावीसाठी ५०० रुपये तसेच निवासी इयत्ता तिसरी ते दहावीसाठी ५०० रुपये देण्यात येतात. या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी वर्ग-२, बृहन्मुंबई, संबंधित विद्यालयाचे प्राचार्य यांच्याशी संपर्क साधावा.

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेंतर्गत इतर मागास प्रवर्गातील इयत्ता पाचवी व सातवीमध्ये शिकणाऱ्या मुलींना शिष्यवृत्ती: या योजनेत इयत्ता पाचवी ते सातवीमधील इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थीनींना प्रतिमहा ६० रुपयेप्रमाणे १० महिन्यांसाठी ६०० रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते. योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी वर्ग-२, बृहन्मुंबई, संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्याशी संपर्क साधावा.

सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विजाभज, विमाप्र प्रवर्गातील इयत्ता आठवी ते दहावीमध्ये शिकणाऱ्या मुलींना शिष्यवृत्ती : या योजनेत इयत्ता आठवी ते दहावीमधील विजाभज/विमाप्र/इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थीनींना प्रतिमहा १०० रुपयेप्रमाणे १० महिन्यांसाठी १००० रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते. योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी वर्ग-२, बृहन्मुंबई, संबंधित विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्याशी संपर्क साधावा.

सैनिक शाळेत शिकणाऱ्या विजाभज, विमाप्र विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याबाबत योजना : या योजनेत राज्यातील शासन मान्य सैनिक शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विजाभज/विमाप्र विद्यार्थ्यांना प्रतिविद्यार्थी १५ हजार रुपयेप्रमाणे निर्वाह भत्ता देण्यात येतो. योजनेच्या अधिक माहितीकरिता संबंधित जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी, संबधित विद्यालयाचे मुख्याध्यापक यांच्याशी संपर्क साधावा.

स्व.वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार योजना : या योजनेत राज्यातून माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत विमुक्त जाती/भटक्या जमाती प्रवर्गातून तसेचे इतर मागासवर्ग प्रवर्गातून सर्वप्रथम आलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनीला प्रत्येकी रुपये १ लाख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येते. विभागातून माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातून सर्वप्रथम आलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनीला प्रत्येकी ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येते. अधिक माहितीकरिता संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याशी संपर्क साधावा.

परदेशात शिष्यवृत्ती योजना : विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थी/विद्यार्थीनी आर्थिक परिस्थितीमुळे परदेशातील नामांकित शिक्षण विद्यापीठामध्ये उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये, म्हणून गुणवंत मुलामुलींची शैक्षणिक प्रगती करणे व उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी ही योजना राबवण्यात येते.

विद्यार्थी/विद्यार्थीनी हा विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील प्रवर्गातील असावा, विद्यार्थ्याला परदेशातील THE/QS अद्ययावत वर्ल्ड रँकिंगमध्ये २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश मिळालेला असावा. विद्यार्थी हा पूर्णवेळ अभ्यास क्रमासाठी प्रवेशित असावा, विद्यार्थ्यांच्या पालकांचे/कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखांपेक्षा जास्त नसावे. परदेशातील पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून किमान ६०% गुणांसहित पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी अशा या शिष्यवृत्तीसाठी अटी आहेत.

राज्यातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील निवड झालेल्या १० गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणासाठी खालील लाभ दिले जातात. परदेशातील शैक्षणिक संस्थेने शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी, प्रवेश घेतलेल्या संबंधित शैक्षणिक संस्थेने ठरवून दिलेल्या अथवा भारत सरकारच्या DOPT विभागाने विदेशी शिष्यवृत्तीसाठी ठरवून दिलेल्या दराप्रमाणे येणारा खर्च अथवा महाराष्ट्र शासन वेळोवेळी या प्रयोजनासाठी जाहीर करेल ती रक्कम निर्वाह भत्ता, विद्यार्थ्यास परदेशातील विद्यापीठामध्ये प्रवेश

घेण्यासाठी व अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर भारतात परत येण्यासाठी भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे जवळच्या मार्गाचा (shortest route) दराचा इकॉनॉमी क्लासचा विमान प्रवासाचा दराप्रमाणे देण्यात येते. या योजनेच्या अधिक माहितीसाठी संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याशी संपर्क साधावा. वरील सर्व योजनांच्या सविस्तर माहितीसाठी obcbahujankalyan.maharashtra.gov.in संपर्क साधावा.

मॅट्रिकोत्तर योजना (शिक्षण)

राज्य सरकारची शालांत परीक्षोत्तर योजना, विमाप्र विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व इतर शैक्षणिक सवलत योजना, शिक्षण व परीक्षा शुल्क प्रदाने योजना (विजाभज)/ (इमाव), इयत्ता १० वी च्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच इ.१२ वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज/ विमाप्र वर्गाच्या मुला-मुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना असून विमुक्त जाती/भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्ग विजाभज/विमाप्र प्रवर्गाच्या मुलामुलींचा शैक्षणिक दर्जा सुधारावा, त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी, या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे. केंद्र पुरस्कृत इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनाचे संगणकीकरण झालेले असून www//mahadbtmahait.gov.in ऑनलाईन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या योजनेच्या अधिक माहितीसाठी संबधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त समाज कल्याण तसेच संबधित शाळा महाविद्यालयाचे प्राचार्यांशी संपर्क साधावा.

विद्यावेतन योजना

व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असलेल्या वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन तसेच व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या वसतिगृहाच्या व शासकीय वसतिगृहाच्या बाहेर राहणाऱ्या परंतु वसतिगृहात प्रवेश मिळण्यासाठी पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विद्यावेतन ही राज्यस्तरीय योजना आहे. विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग यांच्यासाठी ही योजना आहे.या योजनेचे संगणकीकरण झालेले असून ऑनलाईन फॉर्म भरण्याची सुविधा www//mahadbtmahait.gov.in उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. संबंधित लाभार्थ्यांनी या योजनेचा अर्ज भरून महाविद्यालयास सादर करावा. संबंधित महाविद्यालयाने सर्व कागदपत्रांची छाननी करून पात्र लाभार्थ्यांचे अर्ज संबंधित साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे मंजुरीसाठी फॉरवर्ड करावे. अधिक माहितीकरिता संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त समाज कल्याण व संबधित शाळा व महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्याशी संपर्क साधावा.

व्यावसायिक प्रशिक्षण योजना

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून विजाभज व विमाप्र प्रवर्गातील उमेदवारांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची योजना (मागेल त्याला प्रशिक्षण) ही राज्यस्तरीय योजना आहे. विमुक्त जाती/भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्गासाठी ही योजना लागू आहे. संबंधित संस्थांच्या प्राचार्यांनी पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव तयार करून संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे अधिक माहितीकरिता संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई, संबंधित शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था., संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याशी संपर्क साधावा. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिकणाऱ्या विजाभज/ विमाप्र विद्यार्थ्यांना विद्यावेतन ही राज्यस्तरीय योजना आहे. विमुक्त जाती/भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्गकरिता योजना आहे. संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याशी अधिक माहितीकरिता संपर्क साधावा. वरील सर्व योजनांच्या सविस्तर माहितीसाठी obcbahujankalyan.maharashtra.gov.in संपर्क साधावा.

वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना

विमुक्त जाती व भटक्या जमाती समुहांचे तांडे/वस्त्यांना प्राथमिक सुविधा उपलब्ध करून देणे. या तांडे वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी ही योजना राबवण्यात येते. ज्या तांडा वस्तीमध्ये या योजनेंतर्गत काम हाती घ्यावयाचे आहे, त्या तांडा वस्तीचे नाव बृहत आराखड्यामध्ये नमूद असावे. तांडा वस्तीस पुढील मूलभूत सुविधा पुरवणे यामध्ये १) विद्युतीकरण, २) पिण्याचे पाणी, ३) अंतर्गत रस्ते, ४) गटारे, ५) शौचालये तसेच समाज मंदिर/वाचनालये व शक्य असेल तेथे मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्यांची कामे. लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येईल. अधिक माहितीकरिता संबिधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त यांच्याशी संपर्क साधावा.

धनगर समाजाच्या विकासासाठी योजना

या समाजातील लाभार्थ्यांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत भूमिहीन मेंढपाळ कुटुंबासाठी अर्धबंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरिता जागा खरेदीसाठी अनुदान स्वरूपात एकवेळचे एकरकमी अर्थसाहाय्य या योजनेकरिता संबधित जिल्ह्याचे पशुसंवर्धन आयुक्त यांच्याशी संपर्क साधावा.

भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या गुणवंत विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश मिळवून देणे संबधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त यांच्याशी संपर्क साधावा.

भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या बेघर कुटुंबीयांना घरकुले बांधून देणे. ही योजना ग्रामविकास विभागाच्या गृहनिर्माण कक्षामार्फत राबवण्यात येईल.

केंद्र शासनाच्या स्टॅन्ड अप योजनेत भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या महिलांना साहाय्य करण्यासाठी मार्जिन मनी उपलब्ध करून देणे.

भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील मेंढपाळ कुटुंबांना पावसाळ्यात चराई करण्याकरिता जून ते सप्टेंबर या चार महिन्यांच्या कालावधीसाठी अनुदान देणे. या योजनेकरिता संबधित जिल्ह्याचे पशुसंवर्धन आयुक्त यांच्याशी संपर्क साधावा.

भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील बेरोजगार यवक-युवतींस

लष्करातील सैनिक भरती व राज्यातील पोलीस भरतीसाठी आवश्यक ते मूलभूत प्रशिक्षण देणे.

भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील लोकांना ग्रामीण परिसरातील कुक्कुटपालन संकल्पनेंतर्गत धनगर समाजातील कुटुंबीयांना ७५ टक्के अनुदानावर चार आठवडे वयाच्या सुधारित देशी प्रजातीच्या १०० कुक्कुटपक्षांच्या खरेदी व संगोपनासाठी साहाय्य करणे. संबधित जिल्ह्याचे पशुसंवर्धन आयुक्त यांच्याशी संपर्क साधावा.

भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नवी मुंबई, नाशिक, औरंगाबाद, पुणे, नागपूर व अमरावती या महसुली विभागाच्या ठिकाणी वसतिगृह निर्माण करणे या योजनेच्या माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त समाजकल्याण तसेच संबंधित वसतिगृहाचे गृहपाल यांच्याशी संपर्क साधावा.

भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील आवश्यक असलेल्या परंतु अर्थसंकल्पीय निधी उपलब्ध नसलेल्या कार्यक्रम/योजना राबवण्यासाठी न्यूक्लिअर बजेट योजना संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त समाजकल्याण यांच्याशी संपर्क साधावा.

भटक्या जमाती-क मधील धनगर समाजातील बेरोजगार युवक -युवतींना स्पर्धा परीक्षेसाठी परीक्षा शुल्कात आर्थिक सवलती लागू करण्याबाबत. व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती तसेच http://mahajyoti.org.in वर संपर्क साधावा.

वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभागाच्या स्वयं योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र योजना सुरू करण्याबाबत या योजनेसाठी संबंधित जिल्ह्याचे सहायक आयुक्त समाजकल्याण आयुक्त यांच्याशी संपर्क साधावा.

पुरस्कार योजना

स्व.वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार

राज्यातून माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत विमुक्त जाती/भटक्या जमाती प्रवर्गातून सर्वप्रथम आलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनीला प्रत्येकी रुपये १ लाख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येते. तसेच विभागातून माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता १० वी व १२ वी परिक्षेत विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातून सर्वप्रथम आलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनीला प्रत्येकी रुपये ५१ हजार, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येते. या पुरस्काराच्या अधिक माहितीसाठी संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याशी संपर्क साधावा.

महात्मा बसवेश्वर सामाजिक समता – शिवा पुरस्कार

वीरशैव-लिंगायत समाजासाठी कार्य करणारे समाजसेवक, कलावंत, समाज संघटनात्मक कार्यकर्ते, अध्यात्मिक प्रबोधनकार व साहित्यिकांसाठी हा पुरस्कार देण्यात येतो. शासनाने मान्यता दिलेले सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह रुपये २५ हजार रोख रक्कम एक शाल किंवा साडी खण आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

वीरशैव लिंगायत समाजासाठी कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थेसाठी शासनाने मान्यता दिलेले सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह यावर संस्थेचे नाव असेल रुपये ५१ हजार रोख रक्कम व शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. अधिक माहितीसाठी संबधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त समाजकल्याण यांच्याशी संपर्क साधावा.

वाहन चालक प्रशिक्षण योजना (विजाभज, इमाव व विमाप्र)

शासनाने नियुक्त केलेल्या प्रशिक्षण देणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस प्रतिप्रशिक्षणार्थी रक्कम अदा करण्यात येते. प्रशिक्षण कालावधीमध्ये जिल्हा कार्यालय ते प्रशिक्षण केंद्रापर्यंत जाण्यायेण्याचे भाडे, आरोग्य तपासणी, छायाचित्र चालकाचा कच्चा व पक्का परवाना, बिल्ला राहण्याची व जेवणाची व्यवस्था इत्यादी प्रशिक्षण संस्थेमार्फत पुरवण्यात येते. अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त समाजकल्याण यांच्याशी संपर्क साधावा.

कन्यादान योजना

विशेष मागास प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या मागासवर्गीय कुटुंबातील सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी होऊन विवाह करणाऱ्या जोडप्यांना रुपये १० हजार इतके अर्थसाहाय्य वधूचे आई-वडील किंवा पालकांच्या नावे धनादेशाद्वारे विवाहाच्या दिवशी देण्यात येते. सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करणाऱ्या संस्था वा संघटनांना प्रत्येक जोडप्यामागे रुपये २ हजार प्रोत्साहनपर अनुदान २००८ पासून देण्यात येते. सामुहिक विवाह सोहळ्यासाठी संस्थेने कमीत कमी २० दाम्पत्यांचा समावेश असावा. अधिक माहितीसाठी संबधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त समाजकल्याण यांच्याशी संपर्क साधावा.

विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या लोकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना वित्तिय साहाय्य योजना

लाभधारकास शासकीय जमीन जिल्हाधिकारी यांच्याकडून विनामूल्य मिळते. जर शासकीय जमीन उपलब्ध नसेल, तर संस्था खासगी जागा विकत घेऊन त्यासाठी जमीन अनुदान म्हणून नगररचना विभागाने प्रमाणित केलेल्या मुल्यांकनाची रक्कम ग्राह्य धरली जाते. शहरी भागात ४००चौ. फूट जागा व ग्रामीण भागात दोन हजार चौरस फूट जागा (दोन गुंठे) कमाल मर्यादित जमीन अनुदान मंजूर केले जाते. विविध उत्पन्न मर्यादानुसार घराच्या बांधकाम खर्चाची मर्यादा रुपये ६०,०००/- ते १,००,०००/- गृहीत धरून त्या खर्चाच्या ३० टक्के शासकीय अनुदान,२०% लाभार्थी हिस्सा व ५०% बँकेचे कर्ज अनुज्ञेय होते. अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्याचे साहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांच्याकडे संपर्क साधावा.

विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गासाठीच्या आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या मुलांमुलींसाठी निवासी आश्रमशाळा, विद्यानिकेतन शाळा चालवण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना साहाय्यक अनुदान योजना, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी निवासी कनिष्ठ महाविद्यालये या योजनांच्या अधिक माहितीसाठी obcbahujankalyan.maharashtra.gov.in वर संपर्क साधावा.

संकलन : संध्या गरवारे,
विभागीय संपर्क अधिकारी

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या अधीनस्थ असलेल्या महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ, लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, तर इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अधीनस्थ असलेल्या महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या माध्यमातून वंचितांच्या विकासासाठी विविध कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहेत.

कल्याणकारी महामंडळे

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांकरिता स्वयंरोजगार व रोजगार उपलब्ध करून सामाजिक व आर्थिक उन्नतीकरिता हे महामंडळ कार्यवाही करते. या महामंडळाचे भागभांडवल ५०० कोटींवरून १००० कोटी रुपये इतके करण्यात आले आहे. ५० टक्के अनुदान योजना, बिज भांडवल योजना, कौशल्य विकास कार्यक्रम, थेट कर्ज योजना, केंद्र योजनादेखील राबवण्यात येतात.

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ

अनुसूचित जातीतील चर्मकार समाज व त्यांच्या पोटजाती यांचा आर्थिक, सामाजिक विकास करण्यासाठी हे महामंडळ काम करते. हे महामंडळ केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करणारी संस्था आहे. महामंडळाचे भागभांडवल मर्यादा ७३ कोटींवरून १००० कोटी रुपये इतकी करण्यात आली आहे. या महामंडळामार्फत कर्ज योजना व अनुदान योजना राबवण्यात येतात. या कार्यालयाचा पत्ता : महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यावसायिक बॉम्बे लाईफ बिल्डिंग, ५ वा मजला, वीर नरिमन रोड, मुंबई - ४००००१ दूरध्वनी क्रमांक ०२२ - २२०४४१८६, २२०४७१५७.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाद्वारे मातंग समाजासह इतर १२ पोटजातींचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास करण्यासाठी विविध योजना राबवण्यात येतात. ५० टक्के अनुदान योजना, प्रशिक्षण कर्ज योजना, बीज भांडवल योजना तसेच राष्ट्रीय मागासवर्ग वित्तिय विकास महामंडळ दिल्लीमार्फत देखील योजना राबवण्यात येतात. या महामंडळाचे भागभांडवल ३०० कोटींवरून १००० कोटी रुपयांपर्यंत करण्यात आले आहे. या कार्यालयाचा पत्ता नवीन प्रशासकीय इमारत क्रमांक-२, तिसरा माळा, बी-विंग, आर.सी.चेंबूर मार्ग (पूर्व) मुंबई - ४०००७१, दूरध्वनी क्रमांक ०२२ - २५२२०००२, २५२२०००८ फॅक्स क्रमांक ०२२ - २५२७४०७२ असा आहे.

महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ

राज्यातील १८ ते ६० वयोगटातील दिव्यांगाना स्वयंरोजगारासाठी कर्ज स्वरूपात अर्थसाहाय्य करण्याचे कार्य या महामंडळाकडे आहे. कर्ज वितरणासोबतच दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून विविध योजना महामंडळ राबवत असते. या महामंडळामार्फत थेट कर्ज योजना, राष्ट्रीय महामंडळाच्या कर्ज योजना राबवण्यात येतात. या महामंडळाची अधिकृत भागभांडवल मर्यादा ५० कोटींवरून ५०० कोटी रुपये इतकी करण्यात आली आहे. या कार्यालयाचा पत्ता : खोली क्रमांक ७४, तळमजला, गृह निर्माण भवन, म्हाडा वांद्रे, पूर्व, मुंबई - ४०००५१ असा आहे.

लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ

ऊसतोड कामगारांचे जीवन सुखकारक करून त्यांचे राहणीमान उंचावून आयुष्य स्थिर व सुरक्षित करण्यासाठी लोकनेते गोपीनाथराव मुंडे महामंडळाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रात मोठ्या संख्येने असलेल्या ऊसतोड कामगारांची आजपर्यंत नोंदही नव्हती. महामंडळाच्या माध्यमातून त्यांच्या कल्याणासाठी विविध योजना व उपक्रम राबवण्यात येत आहे. लॉकडाऊन काळात राज्यभरात अडकलेल्या सुमारे दीड लाख ऊसतोड कामगारांना कोविडविषयक आरोग्य तपासणी करून सुखरूप घरी पाठवण्यासाठी १७ एप्रिल २०२० रोजी विशेष शासन निर्णय घेण्यात आला. या निर्णयानुसार एसटी बस, कारखान्याने दिलेले वाहन आदींचा वापर करून एप्रिल २०२० मधील कडक लॉकडाऊनच्या

काळातील राज्यातील सर्वात मोठे व यशस्वी स्थलांतर करण्यात आले.

ऊसतोड कामगार कल्याण महामंडळांतर्गत संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहे योजनेला मंजुरी देण्यात आली. राज्यातील १० जिल्ह्यांत ४१ तालुक्यांत ८२ वसतिगृहे उभारण्यात येणार असून १०० मुले किंवा १०० मुली अशी वसतिगृहाची क्षमता असणार आहे. संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेच्या पहिल्या टप्प्यात १० तालुक्यांतील २० वसतिगृहे २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात उभारण्यास मान्यता देण्यात आली असून, नामांकित शाळा/ जवळ भाडेतत्त्वावरील इमारतीमध्ये ही वसतिगृहे उभारण्यात येतील. यासाठी आवश्यक मनुष्यभरती करण्यास राज्य सरकारने परवानगी दिली आहे. भाडेतत्त्वावर इमारती अधिग्रहित करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. या योजनेंतर्गत अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड येथे पहिल्या संत भगवानबाबा शासकीय वसतिगृहाचे उद्घाटन मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते नुकतेच पार पडले.

ऊसतोड कामगारांची गावस्तरावर नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देण्याचा शासन निर्णय घेण्यात आला. ऊसतोड कामगारांची ग्रामसेवक किंवा तत्सम यंत्रणेकडून नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देण्यात येणार आहे. ही प्रक्रिया गतिमान करण्यासाठी आता डिजिटल यंत्रणेचा वापर होणार आहे. ऑनलाईन पोर्टल तसेच ॲपच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांची नोंदणी होणार आहे. ऊसतोड कामगार कल्याण महामंडळांतर्गत निधी स्वीकृती व खर्चासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करण्यात आले असून महामंडळाचे पुणे व परळी येथे कार्यालय उभारणे व पुणे कार्यालयाचे उद्घाटन नुकतेच पार पडले आहे. वसतिगृहांना इमारती अधिग्रहण व अन्य सामग्री उपलब्ध करणे तसेच कामगार नोंदणी यासाठी पहिल्या टप्प्यात ३ कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला.

या महामंडळाच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांसाठी शिक्षणाच्या योजना, घरकूल योजना, उत्तम आरोग्यासाठी वैद्यकीय सुविधा, राज्य विमा योजना, ऊसतोड कामगारांच्या मुलांनी उच्चशिक्षित व्हावे, यासाठी पुणे व मुंबई येथे वसतिगृह, कौशल्य विकास योजना, कमी व्याजदराने भांडवल म्हणून कर्ज उपलब्ध करून देणे, ऊसतोड कामगारांच्या मुलींच्या विवाहासाठी आर्थिक साहाय्य योजना, ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या वाहनचालक व वाहकांसाठी विमा योजना, प्रत्येक साखर कारखान्यावर एक विश्रांतिगृह व भोजनालय सुरू करण्याचे, ऊसतोड कामगारांच्या कुटुंबांना महामंडळमार्फत स्वस्त धान्य उपलब्ध करणे, प्रत्येक साखर कारखान्यावर फिरते वैद्यकीय पथक उपलब्ध करणे, ऊसतोड कामगारांसाठी हात आणि पायांची सुरक्षिततेसाठी हातमोजे व बूट उपलब्ध करणे, ऊसतोड कामगारांसाठी तंटामुक्त सल्ला केंद्र स्थापन करणे, ऊसतोड कामगारांना साखर कारखानास्थळी पिण्याचे पाणी व अंगणवाडी शाळा उपलब्ध करणे या योजना राबवण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

कार्यालयाचा पत्ता : लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर येरवडा, पुणे ०६.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग

महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती),नागपूर.

महात्मा जोतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारावर आधारित आधुनिक समाज निर्मितीकरिता राज्य शासनाने महाराष्ट्रातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक विकासासाठी महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) या संस्थेची स्थापना ८ ऑगस्ट २०१९ रोजी केली.

महाज्योतीमार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात समान संधी प्राप्त व्हावी, या हेतूने पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण, जेईई/ एनईईटी/एमएचटी-सीईटी, एमपीएससी, यूपीएससी आदी स्पर्धात्मक परीक्षांचे प्रशिक्षण देण्यात येते. उमेदवारांना रोजगाराची संधी मिळावी, याकरिता कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येतो. तसेच विविध संशोधन कार्याला प्रोत्साहन मिळावे याकरिता पीएच. डी व एम.फिल करणाऱ्या उमेदवारांना

महाज्योती
— ज्ञानदीप समतेचा —

अधिछात्रवृत्ती प्रदान करण्यात येते. महाज्योतीच्या लाभार्थ्यांना योजनांचा लाभ सुलभपणे मिळावा, या हेतूने महाज्योतीचे विभागीय कार्यालय औरंगाबाद, नाशिक येथे सुरू करण्यात आलेले असून पुणे, मुंबई व अमरावती येथे विभागीय कार्यालय सुरू करण्याची कार्यवाही सुरू आहे.

महाज्योतीमार्फत राबवण्यात येणाऱ्या प्रशिक्षण योजना

पोलीस भरती पूर्वप्रशिक्षण

इतर मागास बहुजन घटकातील उमेदवारांना महाराष्ट्रातील तसेच केंद्रातील पोलीस सेवेत संधी मिळण्यासाठी पोलीस भरती पूर्वप्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी उमेदवार १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. महाज्योतीमार्फत पोलीस भरती पूर्वप्रशिक्षणाची सुरुवात २२ फेब्रुवारी २०२१ रोजी करण्यात आली आहे. या प्रशिक्षणाकरिता २०२१-२२ करिता २७९६ अर्ज प्राप्त झालेले होते, त्यातील २१४३ उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

परीक्षांचे प्रशिक्षण

जेईई/एनईईटी/एमएचटी-सीईटी परीक्षेत यश मिळून अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षणाची संधी मिळण्यासाठी जेईई/ एनईईटी/एमएचटी-सीईटी परीक्षेचे

ऑनलाईन प्रशिक्षण महाज्योतीमार्फत देण्यात येते. ११ वी करिता विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेले व दहावीला किमान ६५% गुण असलेले इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकतात. २०२२ परीक्षेच्या प्रशिक्षणाची सुरुवात १७ एप्रिल २०२१ रोजी करण्यात आली होती. या प्रशिक्षणाकरिता ३८२७ अर्ज प्राप्त झाले होते. त्यातील पात्र २८५० उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले. २०२३ च्या परीक्षेसाठी प्रशिक्षणाची सुरुवात ६ डिसेंबर २०२१ रोजी करण्यात आली आहे. या प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी १२ हजार ७७५ अर्ज प्राप्त झालेले होते, त्यातील पात्र ८९२० उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

या प्रशिक्षणात संबंधित परीक्षेतील गणित, जीवशास्त्र, रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र या घटकांचे तज्ज्ञ व अनुभवी प्रशिक्षकांच्यामार्फत ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात येते. या प्रशिक्षणात सहभागी झालेल्या २८५० उमेदवारांना टॅब सोबत ६ जीबी डेटा (प्रतिदिन) सुविधा देण्यात आली. जेईई / एनईईटी / एमएचटी-सीईटी-२०२३ च्या प्रशिक्षणात सहभागी झालेल्या ८९२० उमेदवारांसाठी टॅब देण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच जेईईचे प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना ९० पुस्तकांचा संच व एनईईटीचे प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांना ६० पुस्तकांचा संच घरपोच देण्याची कार्यवाही सुरू आहे.

२०२४ च्या परीक्षेसाठी प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी महाज्योतीच्या संकेतस्थळावर अर्ज मागवण्यात आलेले आहेत.

स्पर्धा परीक्षेचे प्रशिक्षण

इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना एमपीएससी व यूपीएससी परीक्षेत यश मिळून केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागात अधिकारी म्हणून कार्य करण्याची संधी मिळण्यासाठी एमपीएससी व यूपीएससी परीक्षेचे प्रशिक्षण महाज्योतीमार्फत देण्यात येते.

२०२१-२२ या वर्षात एमपीएससी परीक्षेचे १८०६ उमेदवारांना नामांकित प्रशिक्षण संस्थेमार्फत १८ ऑक्टोबर २०२१ पासून १० महिने कालावधीसाठी एमपीएससी परीक्षेचे ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण देण्यात येत आहे. या कालावधीत उमेदवारांना राज्यसेवा परीक्षेतील पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षा या परीक्षेचे तज्ज्ञ व अनुभवी प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण देण्यात येत आहे. ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण घेण्यासाठी उमेदवारांना मोफत टॅब व ६ जीबी प्रतिदिन डेटा असणारे सीम देण्यात आलेले आहे. तसेच उमेदवारांना २० पुस्तकांचा संच घरपोच देण्यात आला आहे. तसेच २०२२-२३ या वर्षात १५०० उमेदवारांना एमपीएससीचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून त्यात उमेदवारांना अभ्यास साहित्य, विद्यावेतन आदी लाभ देण्यात येणार आहेत.

यूपीएससी प्रशिक्षणाचा लाभ देण्यासाठी २०२१-२२ या वर्षात उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवण्यात आले होते. त्यात एकूण ३४०१ अर्ज प्राप्त झाले व पात्र उमेदवारांची परीक्षा घेण्यात आली. त्यातील ८३० उमेदवारांची अंतिम निवड प्रशिक्षणासाठी करण्यात आली. त्यापैकी ७६६ उमेदवार प्रशिक्षणाचा लाभ घेत आहेत. या उमेदवारांना नामांकित प्रशिक्षण संस्थेमार्फत २६ ऑक्टोबर २०२१ पासून १० महिने कालावधीसाठी युपीएससी परीक्षेचे ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षण देण्यात येत आहे.

या कालावधीत उमेदवारांना संघ लोकसेवा परीक्षेतील पूर्वपरीक्षा व मुख्य परीक्षा या परीक्षेचे तज्ज्ञ व अनुभवी प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण देण्यात येत आहे. ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षण घेण्यासाठी उमेदवारांना मोफत टॅब व ६ जीबी प्रतिदिन डेटा असणारे सीम देण्यात आलेले आहे तसेच तसेच उमेदवारांना २१ पुस्तकांचा संच घरपोच देण्यात आलेला आहे.

२०२२-२३ या वर्षात १५०० उमेदवारांना यूपीएससीचे प्रशिक्षण हे दिल्ली येथे देण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यात उमेदवारांना अभ्यास साहित्य, विद्यावेतन आदी लाभ देण्यात येणार आहेत.

अधिछात्रवृत्ती

महाज्योती, नागपूर मार्फत पीएच.डी. व एम.फिल. करणाऱ्या उमेदवारांना अधिछात्रवृत्ती देण्याची योजना आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये सुरू करण्यात आलेली आहे. यात पीएच.डी.करिता नोंदणी केलेल्या उमेदवारांना प्रतिमाह रक्कम ३१,००० रुपये अधिछात्रवृत्ती देण्यात येते, तर एम.फिल. करिता नोंदणी केलेल्या उमेदवारांना प्रतिमाह रक्कम २०,००० रुपये अधिछात्रवृत्ती देण्यात येते.

सद्य:स्थितीत २०१७ पासून पीएच.डी. करिता नोंदणी करण्यात आलेल्या एकूण ७५६ उमेदवारांना दरमाह रक्कम ३१,००० रुपये अधिछात्रवृत्ती देण्यात येत आहे, तर एम.फिल.करिता नोंदणी करण्यात आलेल्या एकूण ७३ उमेदवारांना दरमाह रक्कम २०,००० रुपये अधिछात्रवृत्ती देण्यात येत आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षात २०० उमेदवारांना पीएच.डी. करिता अधिछात्रवृत्ती प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

महाज्योतीमार्फत भटक्या जाती, विमुक्त जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील बेरोजगार युवक-युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी www.mahajyoti.org या संकेतस्थळावर जाऊन उमेदवार अभ्यासक्रमाची निवड करून नोंदणी करू शकतो. उमेदवाराची नोंदणी झाल्यानंतर संबंधित प्रशिक्षण संस्थेकडून उमेदवारास समुपदेशनासाठी बोलावण्यात येते, समुपदेशनात प्रशिक्षणाचे महत्त्व, कोर्स केल्यानंतर मिळणारा रोजगार त्यासाठी आवश्यक तयारी आदीबाबत इत्यंभूत माहिती देण्यात येते. उमेदवाराने समुपदेशनानंतर निकष पूर्ततेसाठी प्रवेश अर्ज व आवश्यक कागदपत्रे भरून देणे आवश्यक असते, कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर उमेदवाराचा प्रवेश निश्चित होतो. प्रशिक्षण केंद्रावर उमेदवारास संबधित अभ्यासक्रमाचे थिअरी व प्रात्यक्षिक दोन्हीचे प्रशिक्षण हे राष्ट्रीय कौशल्य विकास संस्थेने ठरवून दिलेल्या निकष व अभ्यासक्रमानुसार घेण्यात येते. प्रशिक्षणासाठी तज्ज्ञ व

अनुभवी प्रशिक्षक, प्रयोगशाळा, पायाभूत, मूलभूत व प्रशिक्षण सुविधा या प्रशिक्षण संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात येतात.

महाज्योतीमार्फत काही प्रशिक्षणे ही निवासी स्वरूपाची असल्याने तेथे भोजन व निवास यांची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येते. अनिवासी स्वरूपाच्या प्रशिक्षणात उमेदवारास ही व्यवस्था स्वत: करणे आवश्यक आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षण संस्थेमार्फत परीक्षा घेऊन उत्तीर्ण उमेदवारांना प्रमाणपत्र व रोजगाराच्या किमान ३ संधी उपलब्ध करून देण्यात येतात. रोजगार प्राप्त झाल्यावर महाज्योती कार्यालय त्याचा किमान ६ महिने पाठपुरावा करते.

औरंगाबाद येथील सेंट्रल इन्स्टिट्युट ऑफ प्लास्टिक प्रोसेसिंग (सिपेट) यांचे सारख्या नामवंत प्रशिक्षण संस्थांमार्फत Machine Operator-Tool Room (MO-TR), Machine Operator-Injection Moulding, Machine Operator-Plastic Processing (MO-PP) या अभ्यासक्रमात १०५ उमेदवार प्रशिक्षण घेत असून प्रशिक्षण अंतिम टप्प्यात आहे.

यवतमाळ, औरंगाबाद, अहमदनगर व बीड जिल्ह्यात EMS Technician, Technical Support, General Duty Assistant, Web Developer, CRM Domestic Voice, Emergency Medical Technician या कोर्सेसचे ३६१३ उमेदवार प्रशिक्षण घेत आहेत. त्यातील २२२० प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांपैकी ७५% पेक्षा अधिक उमेदवारांनी रोजगार स्वीकारला आहे.

कमर्शिअल पायलट प्रशिक्षण

महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना विमान व्यवसायात करिअर करण्याची संधी मिळण्याकरिता नागपूर फ्लाईंग क्लबमार्फत कमर्शिअल पायलट प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्यात येत आहे. नागपूर फ्लाईंग क्लब, नागपूर यांना क्षमतावृद्धी करण्यासाठी महाज्योतीमार्फत निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

हे प्रशिक्षण १८ महिन्यांच्या कालावधीचे असून त्याकरिता महाज्योती, नागपूर मार्फत एकूण २० उमेदवारांना प्रायोजित करण्यात येत आहे. या विद्यार्थ्यांचे संपूर्ण प्रशिक्षण शुल्क हे महाज्योती, नागपूर यांच्याकडून देण्यात येणार आहे. याकरिता ग्रामीण व शहरी उमेदवारांना समान संधी प्राप्त व्हावी, याकरिता १० जागा शहरी व १० जागा ग्रामीण भागातील उमेदवारांसाठी आरक्षित करण्यात आलेल्या आहेत. ग्रामीण भागातील उमेदवारांसाठी ६५% गुणांची अट, तर शहरी भागातील उमेदवारांना ७०% गुणांची अट ठेवण्यात आलेली आहे. इतर मागासवर्ग गटासाठी १२ जागा, विमुक्त जाती-भटक्या जमाती गटासाठी ७ जागा व विशेष मागास प्रवर्गासाठी १ जागा आरक्षित ठेवण्यात आलेले आहे.

महाराष्ट्रातील रहिवासी असलेले, किमान १८ वर्षे ते २८ वर्षे पूर्ण केलेले, १२ वी फिजिक्स, केमिस्ट्रि व मॅथेमेटिक्स हे विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना या उपक्रमाचा लाभ घेता येणार आहे. महाज्योतीमार्फत राबवण्यात येणाऱ्या या उपक्रमाला महाराष्ट्रभरातून मोठा प्रतिसाद प्राप्त झाला आहे. आतापर्यंत एकूण १९८३ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झालेले असून त्यांची छाननी परीक्षा घेण्यात येणार आहे.

व्यक्तिमत्त्व चाचणी परीक्षेसाठी आर्थिक साहाय्य

दरवर्षी केंद्रीय लोकसेवा आयोग-मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व नागरी सेवा व्यक्तिमत्त्व चाचणीसाठी पात्र नॉन क्रिमिलेअर गटातील इतर मागासवर्गीय, भटक्या जाती-विमुक्त जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना एकरकमी रक्कम २५,००० रुपये आर्थिक साहाय्य महाज्योतीमार्फत देण्यात येते.

२०२१-२२ या वर्षात ५२ उमेदवारांना अर्थसाहाय्य करण्यात आलेले असून त्यातील १५ उमेदवार हे संघ लोक सेवा आयोगाच्या अंतिम परीक्षेत उतीर्ण झाले असून आयएएस, आयपीएस, आयआरएसकरिता त्यांची निवड झालेली आहे.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.) मुंबई

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या कर्ज योजना खालीलप्रमाणे:-

२५% बीजभांडवल कर्ज योजना

ही योजना राष्ट्रीयकृत बँका जिल्हा अग्रणी बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातून राबवण्यात येते. महामंडळाचा सहभाग २५% व बँक सहभाग ७५% असतो. या योजनेसाठी महत्तम प्रकल्प मर्यादा ५ लाख रुपये आहे. महामंडळाच्या कर्जावरील व्याजदर ४% असून परतफेड कालावधी ५ वर्षापर्यंत, अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे असावे, अर्जदाराचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपर्यंत असावे.

१ लाख रुपयांपर्यंत थेट कर्ज योजना

या योजनेसाठी अर्जदाराचे वय १८ ते ५५ वर्षे असावे, अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न शहरी व ग्रामीण भागासाठी १ लाख रुपयांपर्यंत असावे, नियमित ४८ समान मासिक हप्त्यामध्ये परतफेड २०८५ रुपयांप्रमाणे करणाऱ्या लाभार्थींना व्याज अदा करावे लागणार नाही. परंतु थकीत झालेल्या हप्त्यांवर द.सा.द.शे. ४% व्याजदर आकारण्यात येईल.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना

या योजनेसाठी अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे असावे, महाराष्ट्र राज्यातील विमुक्त

जाती व भटक्या जमातीतील व इतर मागास प्रवर्गातील गरजू व कुशल व्यक्तींना कृषी संलग्न व पारंपरिक उपक्रम, लघू व मध्यम उद्योग, उत्पादन, व्यापार व विक्री सेवा क्षेत्र इ. व्यवसायाकरिता कर्ज व्याज परतावा उपलब्ध करून देणे. वेब पोर्टलवर www.vjnt.in या महामंडळाच्या संगणक प्रणालीवर नाव नोंदणी अनिवार्य, बँकेमार्फत लाभार्थींना १० लाख रुपयांपर्यंत कर्ज वितरित केले जाते. कर्ज रकमेचे हप्ते नियमित भरल्यास व्याजाची रक्कम (१२% च्या मर्यादेत) व्याज परतावा रक्कम अनुदान स्वरूपात बँक प्रमाणीकरणानुसार लाभार्थींच्या आधार लिंक बँक खात्यात जमा करण्यात येते. लाभार्थींना ऑनलाईन पोर्टलवर उद्योग सुरू असल्याचे किमान दोन फोटो अपलोड करावेत, कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपयांपर्यंत, परतफेडीचा कालावधी बँक निकषानुसार राहील.

गट कर्ज व्याज परतावा योजना

या योजनेसाठी उमेदवारांचे बचतगट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, तसेच बँकमार्फत स्वयंरोजगार उद्योग उभारणीकरिता जे कर्ज दिले जाईल, त्या कर्ज रकमेवरील व्याज परतावा हा बँक प्रमाणीकरणानुसार महामंडळाकडून अदा केला जाईल. गटातील लाभार्थींचे किमान वय १८ ते ४५ वर्षे असावे, गटातील लाभार्थींचे वार्षिक उत्पन्न मर्यादा ८ लाख रुपयांपर्यंत, गटाने कर्ज रकमेचे हप्ते नियमित भरल्यास व्याजाची रक्कम (१२% च्या मर्यादेत) व्याज परतावा त्यांचा आधारलिंक बँक खात्यात जमा करण्यात येतो, वेब पोर्टलवर www.vjnt.in या महामंडळाच्या संगणक प्रणालीवर नाव नोंदणी अनिवार्य.

अर्ज सादर करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचा तपशिल पुढीलप्रमाणे :-

जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रेशन कार्ड / रहिवासी दाखला २, आधार कार्ड / पॅनकार्ड, व्यवसाय स्थळाचा पुरावा भाडेपावती करारनामा ७/१२ चा उतारा, जन्म तारखेचा दाखला / शाळेचा दाखला, तांत्रिक व्यवसायासाठी आवश्यक असतील असे परवाने/लायसन्स, व्यवसायाचा प्रकल्प अहवाल व लागणारा कच्चा माल यंत्रसामग्रीचे दरपत्रक आवश्यक.

अधिक माहितीसाठी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या https://obcbahujankalyan.maharashtra.gov.in/ संकेतस्थळावर माहिती उपलब्ध आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या.

शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्या.,(महामंडळाची उपकंपनी) महामंडळामार्फत राबवण्यात येत असलेल्या योजना :-

२०% बीज भांडवल योजना

राज्यातील इतर मागास प्रवर्गातील व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीयकृत बँका, जिल्हा अग्रणी बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातून स्वयंरोजगारासाठी योजना राबवण्यात येते.

लाभार्थींचे वय १८-५० वर्षे असावे. महामंडळाचा सहभाग २०%, लाभार्थींचा सहभाग ५% व बँकांचा सहभाग ७५% असतो, या योजनेमध्ये महत्तम प्रकल्प मर्यादा ५ लाख रुपये आहे. व्याजाचा दर ६% असून परत फेडीचा कालावधी ५ वर्ष आहे.

थेट कर्ज योजना (१ लाख रुपयांपर्यंत)

राज्यातील इतर मागास प्रवर्गातील व्यक्तींना लघू उद्योगासाठी बँकांमार्फत कर्ज घेताना उद्भवणाऱ्या अडीअडचणी व कर्ज मंजूर प्रक्रियेस होणारा विलंब टाळून स्वयंरोजगारास प्रोत्साहित करून त्यांना तत्काळ वित्तपुरवठा करणे. तसेच इमाव प्रवर्गातील निराधार, विधवा महिलांना प्राथमिकता देणे व योजनेंतर्गत नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या लाभार्थींना बिनव्याजी स्वरूपात १ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध करून देण्यात येते.

लाभार्थींचे वय १८-५५ वर्षे असावे, शासनाकडून प्राप्त भाग भांडवलातून महामंडळ ही योजना राबवते, लाभार्थींचा सहभाग निरंक, नियमित हप्ता भरणाऱ्यास बिनव्याजी कर्ज मिळेल, थकीत हप्त्यासाठी ४% दराने व्याज आकारण्यात येईल. परत फेड कालावधी नियमित ४८ समान मासिक हप्त्यांमध्ये मुद्दल २,०८५ रुपये परतफेड करावी लागेल.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (१ लाख रुपयांपर्यंत)

राज्यातील इतर मागास प्रवर्गातील व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीयकृत बँका, जिल्हा अग्रणी बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातून मंजुर केलेल्या १० लाख रुपयांपर्यंतच्या कर्ज रकमेवरील व्याज परतावा (जास्तीत जास्त १२% मर्यादेत) महामंडळाकडून करण्यात येईल.

लाभार्थींचे वय १८-५० वर्षे असावे, महत्तम कर्जमर्यादा १० लाख रुपयांपर्यंत, बँकेमार्फत लाभार्थींना १० लाख रुपयांपर्यंत कर्ज रक्कम वितरित केली जाईल. या कर्ज रकमेवरील व्याज परतावा हा बँक प्रमाणिकरणानुसार महामंडळाकडून केला जाईल. बँकेने रुपये १० लाखपर्यंतच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या उमेदवाराने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम (१२% च्या मर्यादेत) त्यांच्या आधारलिंक बँक खात्यात महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. इतर मागासवर्गीय प्रवर्गातील कृषी, संलग्न व पारंपरिक उपक्रम, लघू उद्योग व मध्यम उद्योग, उत्पादन, व्यापार व विक्री, सेवाक्षेत्र, इ. व्यवसायाकरिता कर्ज उपलब्ध करून देणे, जर लाभार्थींने मध्येच नियमित कर्ज परतफेड केली नाही, तर व्याज

परतावा दिला जाणार नाही. उमेदवाराने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रकमेची प्रतिपूर्ती (१२% मर्यादेत) त्याच्या आधारलिंक बँक खात्यामध्ये महामंडळामार्फत करण्यात येईल. महामंडळ केवळ बँकेने वेळेत वसूल केलेली योग्य व्याज रक्कम अदा करेल, या ऐवजी इतर कोणतेही शुल्क देयके अदा करणार नाही. या योजनेंतर्गत लाभार्थींना अदा करण्यात येणारी व्याज परताव्याची रक्कम अनुदान स्वरूपात अदा करण्यात येईल. परतफेडीचा कालावधी बँक निकषांनुसार असेल.

गटकर्ज व्याज परतावा योजना (१० लाख ते ५० लाख)

इतर मागास प्रवर्गातील लाभार्थीचे शासनमान्य बचत गट, भागीदारी संस्था (कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत) एलएलपी, एफपीओ अशा शासन प्रमाणिकरण प्राप्त संस्थांना कृषी, संलग्न व पारंपरिक उपक्रम, लघू उद्योग, मध्यम उद्योग, उत्पादन-व्यापार व विक्री तसेच सेवा क्षेत्राकरिता बँकेतर्फे मंजूर करण्यात आलेल्या १० लाख ते ५० लाख रुपयांपर्यंतच्या कर्ज रकमेवरील व्याज परतावा (१२% मर्यादेत) महामंडळाकडून अदा केला जाईल.

गटातील लाभार्थ्याचे किमान वय १८ ते ४५ वर्षे असावे. नॉन क्रिमिलेअरकरिता असलेल्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत असलेल्या उमेदवारांच्या गटांकरिता बँकेकडून प्रतिगटास कमीत कमी १० लाख ते जास्तीत जास्त ५० लाख रुपयांपर्यंतच्या उद्योग उभारणीकरिता, मंजूर कर्जावर ५ वर्षांपर्यंत अथवा कर्ज कालावधी यापैकी जे कमी असेल ते, गटाने वेळेत मंजूर केलेल्या कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर जास्तीत जास्त १२ टक्के व्याज दराच्या आणि १५ लाख रुपयांच्या मर्यादेत त्यातील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात महामंडळामार्फत जमा करण्यात येईल, महामंडळ केवळ बँकेने वेळेत वसूल केलेली योग्य व्याज रक्कम अदा करेल, इतर कोणतेही शुल्क महामंडळ अदा करणार नाही, गटातील उमेदवाराने अर्ज करते वेळी या प्रकल्पासाठी व यापूर्वी महामंडळाच्या वा इतर महामंडळाच्या कोणत्याही योजनांचा वैयक्तिक लाभ घेतलेला नसावा, गटातील उमेदवार कोणत्याही बँकेचा/वित्तीय संस्थाचा थकबाकीदार नसावा, गटाने कर्ज प्रकरण हे सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) या अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे प्रकरण हाताळण्यास सक्षम असलेल्या बँकेत केलेले असावे. ही योजना सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या व्यवसायाच्या विस्तारासाठी व योजनेची अंमलबजावणी सुरू केल्यानंतर स्थापन झालेल्या नवीन उद्योगांसाठी लागू असेल, गटाच्या भागीदारांचे किमान ५०० कोटी रुपयांच्यावर ठेवी असलेल्या व कोअर बँकिंग सिस्टिम असलेल्या राष्ट्रीयकृत/ शेड्यूल्ड बँकेत खाते असावे. गटातील सर्व सदस्यांचा सिबिल क्रेडिट स्कोअर किमान ५०० इतका असावा.

शैक्षणिक कर्ज योजना

राज्यातील इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी/विद्यार्थिनींना शैक्षणिक हिताच्या दृष्टिकोनातून त्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याकरिता राज्य व देशांतर्गत अभ्यासक्रमाकरिता १० लाख रुपये तसेच परदेशी अभ्यासक्रमाकरीता २० लाख रुपये मर्यादेपर्यंत बँकेकडून वितरित केलेल्या शैक्षणिक कर्ज रकमेवरील व्याज परतावा (जास्तीत जास्त १२% मर्यादेत) महामंडळाकडून अदा करण्यात येईल. विद्यार्थ्याचे वय १७ ते ३० वर्षे असावे, इमाव प्रवर्गातील व महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.

कर्जासाठी पात्र अभ्यासक्रम

१. आरोग्य विज्ञान, २. अभियांत्रिकी, ३. व्यावसायिक व व्यवस्थापन अभ्यासक्रम ४. कृषी, अन्नप्रक्रिया व पशुविज्ञान अभ्यासक्रम.

● **राज्यांतर्गत अभ्यासक्रम :-** केंद्रीय परिषद, कृषी विद्यापीठ परिषद, शासकीय अनुदानित व खासगी मान्यता प्राप्त (नॅक मानांकन प्राप्त) शैक्षणिक संस्थेत अभ्यासक्रमासाठी शासनमान्य सामाईक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व त्यानुसार प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी.

● **देशांतर्गत अभ्यासक्रम :** देशातील नामांकित संस्थेत प्रवेश घेतलेले विद्यार्थी पात्र असतील.

● **परदेशी अभ्यासक्रमासाठी :** QS (Quacquarelli Symonds) च्या रँकिंग / गुणवत्ता, पात्रता परीक्षा Graduate Record Exam (GRE), Test of English as a Foreign Language (TOEFL) उत्तीर्ण झालेले विद्यार्थी.

कौशल्य विकास प्रशिक्षण योजना

राज्यातील इतर मागासवर्गीय समाजातील परंपरागत व्यवसायाचे आधुनिकीकरण झालेले असल्यामुळे त्या परंपरागत व्यवसायात कार्यरत असलेल्या तसेच, इतर शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या इतर मागासवर्गीय समाजातील पात्र व्यक्तींना आधुनिक प्रशिक्षणाचा लाभा व्हावा. तसेच कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करुन कौशल्यपूर्ण बनवणे व त्याद्वारे रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे. प्रशिक्षण कार्य - महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाकडून योजनेची प्रभावी मांडणी व अंमलबजावणीबाबत एमएसएसडीएस यांना साहाय्य करणे, प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत एमएसएसडीएसच्या पोर्टलला महामंडळाच्या पोर्टलशी जोडणी करण्यात आली आहे, महामंडळ निवडक प्रशिक्षण कार्यक्रमाची निवड करून त्याची अंमलबजावणी करेल, समुपदेशन उपक्रम, असंघटित क्षेत्रातील काम करणाऱ्या लोकांमध्ये जनजागृती आणि मार्गदर्शन कार्यक्रमास मदत व समर्थन करण्यासाठी एमएसएसडीएसच्या जिल्हा यंत्रणेशी महामंडळाची जिल्हा यंत्रणा साहाय्य करील. किमान इयत्ता दहावी पास व पुढील शिक्षण घेतलेले इतर मागास प्रवर्गातील युवकांना परंपरागत तसेच कौशल्य विकासासाठी कार्यरत असणाऱ्या व्यावसायिक/शैक्षणिक संस्था यांना प्रोत्साहित करून साहाय्य करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

संकलन : संध्या गरवारे,
विभागीय संपर्क अधिकारी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांना समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत पोहोचवणे, जागृती निर्माण करणे आणि त्या माध्यमातून समाजातील प्रत्येक स्तरातील तरुणांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (बार्टी) गेली ४२ वर्षे करत आहे. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, समता दूत, युवा गट, कौशल्य विकास प्रशिक्षण आदी उपक्रमांच्या माध्यमातून समताधिष्ठित समाजाच्या दिशेने बार्टीची वाटचाल सुरू आहे.

समताधिष्ठित समाजनिर्मिती

समता हा कोणत्याही समाजाचा विकासाचा पाया आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समतेवर आधारित समाज निर्माण करण्याचे स्वप्न पाहिले. त्यांचे स्वप्न पूर्ण करणे त्यांचे विचार सर्वत्र पोहोचवणे यासाठी 'बार्टी'चे कार्य सुरू आहे.

'बार्टी'ची स्थापना

समतामूलक आणि संविधानमूलक विचारांवर आधारित समाज निर्माण करण्यासाठी २२ डिसेंबर १९७८ रोजी मुंबई येथे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता विचारपीठ' या नावाने संस्था स्थापन करण्यात आली. १९८७ मध्ये या संस्थेचे स्थलांतर पुण्यात करण्यात आले आणि संस्थेची व्याप्ती वाढवण्यासाठी २००८ मध्ये संस्थेस राज्य शासनाकडून स्वायत्तता देण्यात आली. २००८ पासून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक उत्थान, अनुसूचित जाति-जमातीसाठी असलेल्या विविध योजनांचे मुल्यमापन, जातीविषयक संशोधन, उमेदवारांना कौशल्य विकास प्रशिक्षण, विद्यार्थ्यांकडून संशोधक वृत्तीचे काम होण्यासाठी अधिछात्र वृत्ती, विशेष शिष्यवृत्ती योजना संदर्भात राज्यभरातील विद्यार्थ्यांसाठी बार्टी संस्था कार्यरत आहे.

'बार्टी'मध्ये १४ विभाग असून त्यामध्ये प्रशिक्षण विभाग, मूल्यमापन विभाग, संशोधन विभाग, कौशल्य विभाग, प्रचार-प्रसार, जात पडताळणी विभाग, प्रकाशन व प्रसिद्धी विभाग कार्यरत आहेत. समतामूलक साहित्य पुरोगामी चळवळीस सहकार्य करणाऱ्या लेखकांचे साहित्य प्रकाशन व प्रसिद्धी विभागाच्या माध्यमातून केले जाते. आजतागायत १८ कोटी रुपयांची पुस्तके केवळ १५ टक्के रक्कम आकारून बार्टीमार्फत वितरित करण्यात आली आहेत.

बेंच मार्क सर्वेक्षण प्रकल्प

अनुसूचित जातीच्या विविध घटकांवर संशोधन करण्यासाठी तसेच शासनाच्या योजना समाजातील लोकांपर्यंत पोहोचत आहेत की नाही, याबाबत सर्वेक्षण करण्यासाठी 'बेंच मार्क सर्वेक्षण प्रकल्प' सुरू करण्यात आला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल २०२२ रोजी खासदार शरद पवार यांच्या हस्ते या प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. या सर्वेनुसार नवीन योजना राबवावयाच्या आहेत का, जुन्या योजना बंद करावयाच्या आहेत का, कमकुवत योजना दुरूस्त करावयाच्या आहेत का याबाबत निरीक्षण नोंदवता येणार आहे. या संदर्भातील अहवाल पुढील एक वर्षात शासनास सादर करण्यात येणार आहे.

विशेष अनुदान योजना

सामाजिक न्याय विभागाचे मंत्री धनंजय मुंडे आणि सचिव सुमंत भांगे यांच्या प्रेरणेने आणि मार्गदर्शनाने शिक्षणाबाबतीत विद्यार्थ्यांचे उत्थान करण्यासाठी 'विशेष अनुदान' ही महत्त्वाकांक्षी योजना राबवण्यात येत आहे. जे विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत आणि ज्यांना इयत्ता दहावीमध्ये ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त आहेत, अशा गुणवंत विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी एक लाख रुपये विशेष अनुदान देण्यात येणार आहे. सध्या साडेतीन हजार विद्यार्थी या योजनेसाठी पात्र ठरले असून, त्यांच्या निधी वितरणाचे कार्य सुरू आहे. या विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक शिक्षणामुळे कितीतरी कुटुंबांचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी मदत होणार आहे. याचबरोबर एम.फील, पीएच. डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देण्यात येते. २०१९ आणि २०२० या काळात एकूण ४०० विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देण्यात आली आहे.

समतादूत प्रकल्प व आरटीई

२०१४ पासून 'समतादूत प्रकल्प' ग्रामीण आणि शहरी भागात राबवण्यात येत आहे. जातिभेदाचे निर्मूलन, महापुरुषांच्या समतामुलक विचारांचा प्रचार-प्रसार व्हावा यासाठी तालुकास्तरावर 'समतादूत' नेमण्यात आले आहेत आणि जिल्हास्तरावर प्रकल्प अधिकारी कार्यरत आहेत. 'आरटीई' (शिक्षणाचा अधिकार)च्या माध्यमातून जास्तीतजास्त अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा, यासाठी बार्टी मार्गदर्शन करते. आजतागायत ७५ हजार अर्ज बार्टीच्या माध्यमातून भरण्यात आले असून, २५ ते ३० हजार विद्यार्थ्यांना आरटीईच्या माध्यमातून प्रवेश मिळाला आहे.

५० हजार युवा गटांची स्थापना

शासनाच्या सर्व विभागाच्या अनेक लोककल्याणकारी योजना आहेत. या योजना जनमानसांपर्यंत अनेकदा न पोहोचल्याने निधी शासनास परत जातो. त्यासाठी शासन आणि जनता यातील दुवा म्हणून 'युवा गट' तयार करण्यात आले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त या 'युवा गट प्रकल्पा'चे लोकार्पण मा. खासदार शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले. ५० हजार युवा गट स्थापन करण्यात येणार असून, पाच लाखांपेक्षा जास्त ग्रामीण आणि शहरी भागातील तरुणांपर्यंत शासनाच्या योजनांची माहिती आणि लाभ पोहोचवण्यास सहकार्य होणार आहे. सामाजिक न्याय विभागामार्फत प्रत्येक जिल्ह्यात सामाजिक न्याय भवन उभारण्यात आले आहे. याचबरोबर समाज मंदिर, विहार यांचाही समावेश करून येथे विद्यार्थ्यांसाठी डिजिटल स्टुडिओच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने उद्योजकता, कौशल्य विकास, महिलांसाठी योजना, स्पर्धा परीक्षा या संदर्भात माहिती देण्यात येणार आहे.

विविध स्तरावर सामाजिक समता तत्वप्रणालीवर आधारित समाजाची उभारणी करण्यासाठी सहकाराच्या माध्यमातून प्रशिक्षण आणि त्याबाबत अधिक संशोधन करणे, अनुभव, विचार, परिवर्तन करण्याचे कार्य बार्टीच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी) आणि राज्य लोकसेवा आयोगात (एमपीएससी) राज्यातील विद्यार्थ्यांची संख्या जास्तीत जास्त वाढावी, यासाठी बार्टी विशेष प्रयत्न करत आहे. यूपीएससी परीक्षा देण्यासाठी 'यशदा' येथे बार्टीतून ३० विद्यार्थी पाठवण्यात येतात, त्यांचा सर्व खर्च बार्टी करते. राज्यातील ६ विभागात प्रशासकीय सेवा प्रशिक्षण केंद्र आहेत. या प्रत्येक केंद्रात १० विद्यार्थी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठी देण्यात येतात. दिल्ली येथे २०० विद्यार्थ्यांना नामांकित संस्थांमध्ये प्रशिक्षणासाठी निवास, जेवण, साहित्य व विद्यावेतनाचा खर्च बार्टीमार्फत

करण्यात येतो. आजतागायत २५५ विद्यार्थ्यांची केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत निवड झाली आहे. ७० विद्यार्थी क्षमतेचे निवासी प्रशिक्षण केंद्र पुणे येथे सुरू करण्यात येणार आहेत. राज्यभर अशी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. एमपीएससी आणि युपीएससी बरोबरच एलआयसी, रेल्वे, बँक अशा विविध परीक्षांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढावा, यासाठी २४ जिल्ह्यांत ३० संस्थांच्या माध्यमातून आयबीपीएस केंद्रे सुरू आहेत.

प्रशिक्षणातून रोजगार निर्मिती

सामाजिक उन्नतीत रोजगारक्षम नागरिक घडविणे, रोजगारभिमुख प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. ही भविष्यातील काळाची गरज ओळखून बार्टीच्या कौशल्य विकास विभागामार्फत विविध कौशल्य विकासासंदर्भातील योजना राबवण्यात येतात. महिलांसाठीही विशेष योजना राबवण्यात येतात. २० हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात रोजगार उपलब्ध करून दिले जातात. २०२२-२३ या आर्थिक वर्षात १० हजार उमेदवारांना प्रशिक्षित करून रोजगार उपलब्ध करून देण्याचे कार्य बार्टी करत आहे. पुढील १० वर्षांत रोजगार वृद्धीत काय काम करायचे, याचा विस्तृत आराखडा शासनास सादर करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात बांधण्यात आलेली सामाजिक न्याय सभागृह, तेथील समाज मंदीर, विहार अशा वास्तूंचा उपयोग करून डिजिटल प्लॅटफॉर्म सुरू करण्यात येणार आहेत. जिल्हा आणि तालुका स्तरावर डिजिटल स्टुडिओच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने उद्योजकता, कौशल्य विकास, महिला कामगार, स्पर्धापरीक्षा यासंदर्भात ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन करण्यात येईल.

ॲट्रॉसिटीबाबत प्रशिक्षण

सामाजिक न्यायाशी निगडित असलेले ॲट्रॉसिटी कायद्यासारख्या विषयात लोकांना प्रशिक्षित करण्यासाठी शासनाच्या दक्षता समितीतील अशासकीय सदस्यांना प्रशिक्षण देण्याचे काम बार्टीमार्फत करण्यात येते. १४० पेक्षा जास्त कार्यशाळा आतापर्यंत राबवण्यात आल्या आहेत. याचबरोबर लोकप्रतिनिधींनी काम कसे करावे, त्यांचे कामाचे स्वरूप काय आहे, याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षण कार्यशाळा आहे. राज्यभर अशा कार्यशाळा राबवण्याचा बार्टीचा मानस आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनातील समानतेवर आधारित समाज निर्माण करण्याचा प्रयत्न बार्टी संस्थेमार्फत होत आहे.

शब्दांकन : श्रद्धा मेश्राम, उपसंपादक

(धम्मज्योती गजभिये महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांनी दिलखुलास या कार्यक्रमात दिलेल्या मुलाखतीचा संपादीत भाग.)

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत विविध योजना व उपक्रम राबवण्यात येतात. या योजनांचा लाभ घेऊन अनेकांचे जगणे सुसह्य व सुकर झाले असून ते स्वावलंबी झाले आहेत. यात रमाई आवास योजना, स्वाधार योजना, छत्रपती शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनांचा प्रामुख्याने समावेश आहे. सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना व उपक्रमांचा लाभ घेतलेल्या लाभार्थींच्या या काही प्रातिनिधिक यशकथा...

वंचितांना भक्कम साथ

घरकूल योजनेचा 'रहिमतपूर पॅटर्न'

शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा एकत्रित कृतिसंगम केल्यास त्याचा लाभ अधिक कार्यक्षमतेने आणि गतीने सर्वसामान्यांना देता येतो. शासकीय यंत्रणांच्या समन्वयातून येणाऱ्या अडचणींवर सहजपणे मात करून विकास योजना प्रभावीपणे राबवता येतात, हेच रहिमतपूर येथील रमाई आवास योजनेच्या अंमलबजावणीने दाखवून दिले आहे. घरकूल उभारणीचा हा 'रहिमतपूर पॅटर्न' संपूर्ण राज्यात मार्गदर्शक ठरला आहे.

सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर नगर परिषदेच्या हद्दीत प्रभाग क्रमांक एकमध्ये अनुसूचित जातीच्या नागरिकांची वस्ती होती. त्यांनी मोकळ्या जागेत तात्पुरता निवारा उभा केला होता. घरे कच्ची असल्याने समस्याही भरपूर होत्या. अशा परिस्थितीत अनेक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागत असताना त्यांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या सहकार्याने नगर परिषदेने पुढाकार घेतला.

घरे देण्यासाठी जागेची असलेली अडचण दूर करण्यासाठी बहुमजली इमारत उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. अर्जदाराकडे स्वत:ची जागा नसल्याने जागेचा प्रश्न निर्माण झाला असताना नगरपरिषदेने जागा उपलब्ध करून दिली. पहिल्या टप्प्यात ४१ व नंतर ७ अशा एकूण ४८ कुटुंबांना रमाई घरकूल योजनेतून घरकूल मंजूर करण्यात आले. शहरातील १४३५.८ चौरस मीटर जागेवर बांधकाम सुरू झाले. प्रत्येक सदनिकेचा आकार २६९ चौरस फूट निश्चित करण्यात आला. तळमजला अधिक दोन अशी तीन मजली सुंदर इमारत उभारण्यात आली.

समाज कल्याण विभाग, नगर परिषद प्रशासनाचा १३ वा वित्त आयोग आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून बांधकामासाठी सुमारे १ कोटी ५६ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून घेण्यात आला. विशेष म्हणजे सामाजिक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेतून सामाजिक न्याय विभागाने नगरपरिषदेला सुमारे सव्वादोन कोटी रुपये मंजूर करून दिले. त्यातून या वस्तीच्या बाजूला संरक्षक भिंत व पेव्हिंग ब्लॉक, आदर्श विद्यालय ते बेघरवस्ती ओढ्यावरील पूल, रस्ता, पाणीपुरवठ्यासाठी जलवाहिनी आणि आरसीसी गटार या कामांना मंजुरी देण्यात आली. पाणीपुरवठ्यासाठी २ लाख लीटर क्षमतेची पाण्याची टाकी उभारण्यात आली.

नगर परिषद व सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचा एकत्रितरीत्या लाभ दिल्यामुळे बेघरांना हक्काचे घर मिळण्यासोबत त्या वस्तीचा कायापालट होण्यासही मदत झाली आहे. सामाजिक न्याय विभागाच्या घरकूल योजनेसोबतच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी विकास वस्ती कार्यक्रमातून एखाद्या झोपडपट्टीचा झालेला हा विकास निश्चितच राज्यासाठी पथदर्शक ठरू शकतो.

जिल्हा माहिती कार्यालय, सातारा

'डिजिटल क्लासरूम'चा अभिनव प्रयोग

पूर्वीच्या काळी शाळेमध्ये भिंतीवर काळा फळा लटकवलेला असायचा. शिक्षक फळ्यावर खडूने लिहून गणित समजावून द्यायचे. इंग्रजीचे स्पेलिंग, विज्ञानाच्या व्याख्या, मराठी व्याकरण, भूमितीचे प्रमेय हे आपण फळ्यावरच शिकत आलो. कधी स्पष्ट दिसत नव्हते, तर फळा पुसताना पूर्ण पांढरा होत असे. यामुळे मुलांना काय लिहिले आहे हे कळत नव्हते. मात्र माहिती तंत्रज्ञानाच्या युगात शाळांमध्येही बदल होऊ लागले आहेत. सोलापूरच्या जिल्हा समाज कल्याण कार्यालयामार्फत चालवण्यात येणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांच्या दोन शासकीय निवासी शाळा आता डिजिटल

क्लासरूम झाल्या आहेत. समाज कल्याण विभागामार्फत चालवण्यात येणाऱ्या निवासी शाळेचा हा राज्यातील पहिलाच प्रयोग आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, नजिक पिंपरी (ता. मोहोळ) आणि अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा, अक्कलकोट या दोन्ही शाळेमध्ये डिजिटल क्लासरूम सुरू करण्यात आली आहे. अनुसूचित जाती उपयोजना २०२०-२१ मध्ये वैशिष्ट्यपूर्ण/नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत डिजिटल क्लासरूम प्रकल्प राबवण्यात आला आहे. हा प्रकल्प पूर्ण झालेला असून डिजिटल पद्धतीचा वापर करून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी त्यांना देण्यात आलेल्या टॅबचा वापर करून उपक्रम तयार केलेले आहेत. या प्रकल्पामुळे शासकीय निवासी शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये वाढ झालेली असून विद्यार्थ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शिक्षणाची आवड निर्माण झालेली आहे.

गणित सोपे झाले...

'टॅबच्या साहाय्याने विज्ञान व गणित शिकवल्यामुळे त्यातील अवघड संकल्पना सहज आणि लवकर समजतात. हे विषय समजण्यास खूप सोपे झाले आहेत. पूर्वी ग्रीन बोर्डवर शिकवल्यामुळे ऐकून व पाहून शिक्षण घ्यावे लागत असल्याने गणित, विज्ञान विषय अवघड वाटायचे. आता शिकवताना वापरल्या जाणाऱ्या डिजिटल पद्धतीमुळे कितीही अवघड संकल्पना समजून घेणे खूप सोपे झाल्याचे' विद्यार्थी गौरव गौडदाब याने सांगितले.

– धोंडिराम अर्जुन, माहिती सहायक,
जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर

मिळाले आर्थिक बळ

सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील युवक व युवतींना उद्योजक होण्यासाठी आर्थिक पाठबळ मिळण्यासाठी मार्जिन मनी ही योजना सुरू करण्यात आली आहे. त्याचा लाभ मोठ्या प्रमाणात नवउद्योजक घेत आहेत. मुंबई विभागातील ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथे राहणाऱ्या वैशाली सुनील खांडेकर यांनी मार्जिन मनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

वैशाली खांडेकर या एक सर्वसामान्य गृहिणी. त्यांनी इलेक्ट्रॉनिक ॲण्ड टेलिकम्युनिकेशन विषयाची अभियांत्रिकी पदविका व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक येथून स्नातक पदवी प्राप्त केली आहे. सध्या त्या सुमेधा रोडवेज या नावाने हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशनकरिता एलपीजी वायुचा टँकरद्वारे वाहतुकीचा व्यवसाय करतात.

केंद्र शासनाने २०१५ मध्ये स्टँड अप इंडिया ही योजना सुरू केली. या योजनेमध्ये अनुसूचित जाती प्रवर्ग आणि महिलांमध्ये प्रत्येकी १.२५ लाख उद्योजक निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले होते. सार्वजनिक क्षेत्रातील तेल उत्पादक कंपन्यांनी या स्टँड अप योजनेच्या अनुषंगाने गॅस वाहतुकीच्या क्षेत्रात वाहतूकदार उद्योजक निर्माण करण्याची संधी उपलब्ध करून दिली. त्यादृष्टीने निविदा जाहीर करण्यात आल्या. त्यातील अटीनुसार १८ एमटी व २१ एमटी क्षमतेचे टँकर असणे आवश्यक होते. दलित इंडिया चेंबर्स ऑफ कॉमर्स व इंडस्ट्रिज या संघटनेने पुढाकार घेऊन बँक ऑफ बडोदा ही बँक स्टँड अप इंडिया या योजनेखाली पतपुरवठा करण्यासाठी तयार झाली. मात्र, एवढ्यावरच भागणार नव्हते. कारण एकूण प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के रक्कम ही लाभार्थ्यांने भरणे आवश्यक होते. आर्थिक परिस्थितीमुळे तेवढी रक्कम उभी करणे शक्य नसल्याने राज्य शासनाचा सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग मदतीला धावून आला. अनुसूचित जाती व नवबौद्ध संवर्गातील व्यक्तींना एकूण प्रकल्प खर्चाच्या हिश्श्यातील २५ टक्के मार्जिन मनीपैकी १५ टक्के मार्जिन मनी उपलब्ध करून देण्यास मान्यता मिळाली. यामुळे उद्योजक बनण्याच्या

आकांक्षांना बळ प्राप्त झाले. त्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या ठाणे येथील साहाय्यक आयुक्त कार्यालयाने सहकार्य केले. कोकण विभागीय कार्यालयाने तेवढ्याच सकारात्मकतेने प्रतिसाद देत मुख्य कार्यालय स्तरावर पाठपुरावा करून आवश्यक असलेला १५ टक्के मार्जिन मनी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही केल्याने आर्थिक बळ मिळाले.

– संजय भोसले, जनसंपर्क अधिकारी,
समाज कल्याण, ठाणे

'कापूस ते कापड' प्रक्रियेचे चक्र गतिमान

अनुसूचित जाती घटकातील २७ उद्योजकांनी एकत्र येऊन बोरगाव मंजू येथे 'कापूस ते कापड' हा प्रक्रिया उद्योग उभारला आहे. एकाच व्यवसायाशी निगडित उद्योग करणाऱ्या लहान लहान उद्योग एककांना एकत्र आणून 'कापूस ते कापड' (Fiber to Fashion) या प्रक्रियेचे चक्र जिल्ह्यात गतिमान झाले आहे. जिल्हा उद्योग केंद्रामार्फत या २७ उद्योग एककांचे एकत्रीकरण (Cluster) 'दि संघा टेक्सटाईल डेव्हलपमेंट असोसिएशन, अकोला' या नावाने तयार करण्यात आले असून त्यांचे प्रत्यक्ष उत्पादन सुरू झाले आहे. उद्योगाचे धागे अखंड विणत, आर्थिक समृद्धीची वस्त्र- प्रावरणे दृष्टिपथात आहेत.

कापूस उत्पादक जिल्हा म्हणून ओळख असलेल्या अकोला जिल्ह्यात कापसावर प्रक्रिया उद्योग होऊन 'कापूस ते कापड' येथेच तयार व्हावे, अशी ही संकल्पना. या संकल्पनेला जिल्ह्यात 'एक गाव एक उत्पादन', हे रूप देऊन पालकमंत्री बच्चू कडू यांनी चालना दिली. त्यानुसार जिल्हा उद्योग केंद्रामार्फत कापूस प्रक्रिया करणाऱ्या एककांना एकत्र आणण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील बोरगाव मंजू येथे 'दि संघा टेक्सटाईल डेव्हलपमेंट असोसिएशन, अकोला' या उद्योगसमूहाचे एकत्रीकरण करण्यात आले. आता सद्य:स्थितीत शेलापूर व बोरगाव मंजू येथील युनिट्स मिळून २७ युनिट कार्यरत आहेत. सूक्ष्म व लघू उद्योग एकक विकास कार्यक्रमात हे क्लस्टर विकसित करण्यात आले. प्रत्येकी ५० लाख रुपये भांडवलातून ही युनिट्स उभी राहिली आहेत. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातील २० टक्के निधी हा अनुसूचित जाती घटकासाठी राखीव असतो. हा निधी सामाजिक न्याय विभागातर्फे देण्यात आला.

२७ जणांचा सहभाग

सम्यक जिनिंग चिखलगाव येथून या उपक्रमाची सुरुवात झाली. कापसाचे केवळ जिनिंग प्रेसिंग न करता पुढे धागे व कापड ते थेट वस्त्र तयार करेपर्यंत प्रक्रिया येथेच कराव्यात. यासाठी विविध उद्योजकांना एकत्र केले, अशी माहिती या उद्योगाचे चालक कश्यप जगताप यांनी दिली. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निलेश निकम यांनी त्यास चालना देऊन एकूण ३० जणांना एकत्र आणून त्यांना टेक्सटाईल उद्योगाचे प्रशिक्षण तसेच उद्योगांना भेटी आयोजित केल्या. २७ जणांनी यात सहभाग घेतला. हे सर्व उद्योजक हे अनुसूचित जातीतील आहेत, हे विशेष.

– डॉ. मिलिंद दुसाने,
जिल्हा माहिती अधिकारी, अकोला

मिळाले हक्काचे घरकूल

हक्काच्या, स्वत:च्या घरात राहण्याचा आनंद हा अवर्णनीयच असतो. असाच आनंद शहादा तालुक्यातील मोहिदे तर्फे शहादे येथील वंदना पिंपळे यांना मिळाला आहे. त्यांना रमाई घरकूल योजनेतून घरकूल मंजूर झाले आहे. या घरकुलाचे काम आता पूर्णत्वास आले असून श्रीमती पिंपळे यांना आपल्या हक्काच्या घरात राहण्याचा आनंद मिळत आहे. त्यांच्या जीवनात हा आनंदाचा क्षण आणला तो रमाई घरकूल योजनेने.

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील मोहिदे तर्फे शहादे हे श्रीमती पिंपळे यांचे गाव. याच गावात त्यांचे पूर्वी पत्र्याचे साधे घर होते. पावसाळा सुरू होण्याच्या पूर्वीपासून श्रीमती पिंपळे यांना घराची चिंता भेडसावत असे. त्यामुळे पावसापासून संरक्षण करायची कसरत दरवर्षी ठरलेली असायची. पावसाचे पाणी घरात आले की, काही दिवस जमिनीतील ओलावा टिकून राहत असे. लहानशा घरात चार सदस्यांचा संसार सावरताना त्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असे.

आर्थिक परिस्थितीमुळे श्रीमती पिंपळे यांना शिक्षण घेता आले नाही. त्यांचे कुटुंबीय शेतमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. अशा परिस्थितीत स्वत:चे पक्के घर बांधणे त्यांच्यासाठी स्वप्नवत होते. ते रमाई घरकूल योजनेच्या माध्यमातून साकारले गेले आहे. त्यांना रमाई आवास योजनेविषयी माहिती मिळाल्यानंतर प्रारंभी घर मिळेल किंवा कसे, याविषयी त्यांच्या मनात शंका

होती. त्यांना २०१९-२०२० या वर्षांत रमाई आवास योजनेंतर्गत घर मंजूर झाले. त्यामुळे त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला. पूर्वी झालेला त्रास परत होऊ नये म्हणून चांगले घर बांधण्याचा निश्चय त्यांनी केला. घरबांधणीसाठी आलेल्या अडचणींवर त्यांनी यशस्वीपणे मात केली. घराच्या

बांधकामासाठी त्यांनी स्वतःही परिश्रम घेतले. ग्रामपंचायत व पंचायत समितीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केल्याचा त्या आवर्जून उल्लेख करतात. त्यांच्या परिश्रमाला फळदेखील मिळाले आहे. पक्के घर बांधून तयार झाले. घरात आवश्यक सुविधाही झाल्या आहेत. त्यासाठी त्यांना १ लाख २० हजार रुपये अनुदान मिळाले. त्या पैशातून व त्यांच्याजवळ असलेल्या रकमेतून पक्के घराचे स्वप्न साकार झाल्याने कुटुंबातील सर्व सदस्य समाधानी आहेत. त्यांच्याशी बोलताना हक्काचे घर मिळाल्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसतो.

जिल्हा माहिती कार्यालय, नंदुरबार

घरकुलाचे स्वप्न झाले साकार !

अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा. आपल्या हक्काचा निवारा असला पाहिजे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. त्यातही रोज मजुरी करणाऱ्या मजुरांसाठी तर स्वतःचे घर असणे म्हणजे स्वप्नातीलच गोष्ट. वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर

तालुक्यातील मूर्तिजापूर ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या मंगळसा येथील गजानन यशवंत खिराडे या घरबांधकाम अर्थात गवंडी काम करणाऱ्या मजुराचे घराचे स्वप्न सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या रमाई आवास योजनेमुळे साकार झाले आहे.

गजानन खिराडे याचे कुटुंब दारिद्र्यरेषेखालील. परिस्थितीमुळे शिक्षण घेता आले नाही. अल्प शिक्षण असल्याने गजानन याच्यावर मजुरी करण्याची वेळ आली. एका घर बांधकाम करणाऱ्या गवंड्याकडे तो अनेक वर्षांपासून बांधकामास मदत करतो. आपण दुसऱ्यांची घरे बांधतो, पण आपल्या घराचे स्वप्न केव्हा प्रत्यक्षात साकारणार याचा प्रश्न त्याच्या मनात सतत यायचा. दारिद्र्यरेषेखालील आणि अनुसूचित जातीतील कुटुंबांना समाज कल्याण विभागाच्या रमाई आवास योजनेतून घरकूल बांधून मिळते, अशी माहिती गजाननला मिळाली. त्याने ग्रामपंचायतीमध्ये जाऊन याविषयी माहिती घेतली आणि आवश्यक कागदपत्रांसह आपला अर्ज केला.

२०१९-२० या वर्षात मंगरूळपीर पंचायत समितीकडून गजाननला समाज कल्याण विभागाच्या रमाई आवास योजनेतून घरकूल मंजूर झाले. रमाईचे घरकूल मंजूर झाल्यानंतर घराच्या बांधकामास प्रत्यक्ष सुरुवात झाली. घराचा पायवा खोदण्यासाठी अग्रिम म्हणून १५ हजार रुपये मिळाले. पायवा तयार केल्यानंतर बांधकामचा दुसरा हप्ता ४५ हजार रुपये मिळाला. त्यामधून लेंटरपर्यंतचे बांधकाम झाले. घरकुलाच्या कामात खंड पडू नये, म्हणून जवळून ५० हजार रुपये खर्च केले. त्यामुळे वेगाने काम पूर्णत्वाकडे जाऊ लागले. ४० हजार रुपयांचा तिसरा हप्ता मिळाला. घरकुलावर स्लॅब टाकण्यासाठी स्वतःजवळच्या ५० हजार रुपयांची भर घातली. २० हजार रुपयांचा चौथा हप्ता मिळून हे बांधकाम पूर्ण झाले. एका वर्षात गजाननचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण झाले. पत्नी, एक मुलगा व मुलगी यांसह गजानन आता आपल्या हक्काच्या घरामध्ये राहत आहे.

२६९ चौरस फूट जागेत गजाननचे घरकूल साकारले आहे. रमाई आवास योजनेतून आपल्या घराचे स्वप्न साकार झाल्याचे सांगताना गजाननच्या चेहऱ्यावर स्वतःच्या हक्काचे घर झाल्याचे समाधान दिसून येते.

– विवेक खडसे,
जिल्हा माहिती अधिकारी, वाशिम

शासनाच्या शेतजमिनीतून उदरनिर्वाह

दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील भूमिहीन असलेल्या १८ ते ६० या वयोगटातील लाभार्थ्यांना उदरनिर्वाहासाठी शासन अनुदानावर ४ एकर जिरायत शेतजमीन किंवा २ एकर बागायत शेतजमीन वाटप केली जाते. या योजनेंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील भूमिहीन लाभार्थ्यांना शेतजमीन वाटप करण्यात आली आहे. या योजनेत शासन अनुदानावर प्रत्येक लाभार्थ्यांना ४ एकर जिरायत शेतजमीन दिली जात असल्याने शेतमजूर म्हणून हलाखीचे जीवन जगत असलेल्या व्यक्तीला स्वतःच्या उपजीविकेसाठी शासनाकडून स्थायी साधन मिळत आहे. शासनाच्या मदतीमुळे शेतमजूर म्हणून जगत असलेल्या लाभार्थ्यांची आर्थिक बाजू भक्कम होत असून त्यांचे समाजातील जीवनमान उंचावण्यास मदत होत आहे.

शासनाचे मनःपूर्वक आभार

यंदाच्या खरीप हंगामापासून शासनाने दिलेल्या शेतजमिनीत पेरणी करून माझ्या कुटुंबाचा चांगल्या प्रकारे उदरनिर्वाह करता येईल. यातूनच मला माझ्या कुटुंबीयांसमवेत आनंदी व चांगल्या प्रकारे जीवन जगता येईल याचा मला मनस्वी आनंद होत आहे. या योजनेचा लाभ दिल्याबद्दल शासनाचे मनःपूर्वक आभार.

- रुखिमणीबाई भालेराव

हिंगोली जिल्ह्यात औंढा तालुक्यातील पिंपळदरी या गावातील रुख्मिणीबाई परसराम भालेराव यांची कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत शासन निर्णयानुसार २०२१-२२ या वर्षासाठी निवड करण्यात आली. त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी त्यांना ४ एकर जिरायत शेतजमीन कळमनुरी येथील शिवारात गट क्र. ४२/१ मध्ये शासनाकडून देण्यात आली आहे. त्यांना दोन मुले, सुना, नातवंड असा परिवार आहे. रुख्मिणीबाई भालेराव यांचा एक कर्ताधर्ता मुलगा कविचंद हा देशसेवा करताना जम्मू-काश्मीर येथे २००२ मध्ये शहीद झाला. यात त्यांच्या कुटुंबाचा आधार गेला. त्यांची इतर दोन मुले शेतमजुरी, मिळेल ते काम करत कुटुंबाचा कसाबसा उदरनिर्वाह करत असत. त्यांना त्यांच्या कामाची शाश्वती मिळत नव्हती, तर कधी कामासाठी वाट पाहावी लागे. कधी काम मिळालेच तर त्याचा मोबदला वेळेवर व कामानुसार मिळत नव्हता. या अनेक अडचणी त्यांच्या कुटुंबाला येत होत्या. या अडचणींचा सामना करत असताना शासनाने कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेसाठी रुख्मिणबाई यांची विशेष बाब म्हणून निवड केली आणि त्यांना ४ एकर जिरायत शेतजमीन प्राप्त झाली.

– श्वेता पोटुडे–राऊत,
प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली

'स्वाधार' योजनेचा शिक्षणाला आधार

सद्य:परिस्थितीत शिक्षणाविषयी जागृती झालेली असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर शिक्षणाकडे कल वाढला आहे. त्यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरांमध्ये विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्यासाठी येत आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना संबंधित महाविद्यालयांच्या वसतिगृहात प्रवेश घ्यावा लागतो. प्रवेश न मिळाल्यास बाहेर भाड्याने रूम घेऊन खर्च करावा लागतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शिक्षणावरील खर्च वाढतो. विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे व त्यांचा शिक्षणावरील खर्च कमी करण्यासाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची अंमलबजावणी सामाजिक न्याय विभागाकडून करण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेऊन विद्यार्थी शिक्षण पूर्ण करत आहे. त्यापैकीच एक हिमांशु अशोक गायकवाड रा. दुसरबीड ता. सिंदखेडराजा हा विद्यार्थी होय.

दुसरबीड हे गाव बुलडाणा जिल्हा मुख्यालयापासून सुमारे ७० ते ७५ कि.मी. आहे. त्यामुळे साहजिकच हिमांशुला बुलडाणा येथे शिक्षण घेण्यासाठी भाड्याने राहावे लागत होते. बुलडाणा येथील जिजामाता महाविद्यालयात हिमांशुचे शिक्षण झाले असून त्याला २०१८ ते २०२० दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ मिळाला आहे. या योजनेंतर्गत मदत मिळाल्यामुळेच हिमांशुचे उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण झाले आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या योजनेमुळे उच्च शिक्षण कमी खर्चात घेता येणे सोयीचे झाले आहे. उच्च शिक्षण घेऊन स्वत:च्या पायावर उभे राहत कुटुंबाचा सांभाळ करण्याचे बळ या योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत आहे. जे विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे आपले शिक्षण पूर्ण न करता मध्येच सोडून देतात, त्यांच्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना ही एक हक्काची योजना ठरत आहे.

जिल्हा माहिती कार्यालय, बुलडाणा

स्वाधार योजनेमुळे शिक्षण पूर्ण

एका खेडेगावातून जिल्ह्याच्या ठिकाणी येऊन उच्च शिक्षण घेणे खूप अवघड जाते. खेडेगावातील माझ्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती तितकीशी पोषक नसल्याने मला पदवीनंतरचे शिक्षण पूर्ण करता येणार नाही, असे वाटले. पण स्वाधार योजनेमुळे मला आर्थिक साहाय्य मिळाल्याने बुलडाणा येथे राहता आले व शिक्षण पूर्ण करता आले.

- हिमांशू गायकवाड (विद्यार्थी)

परदेशातील उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार

मिरज तालुक्यातील कवठेपिरान या गावात मोहन कांबळे आणि त्यांचे कुटुंब परिस्थितीशी झगडत वास्तव्य करत होते. त्यांना दोन मुले व एक मुलगी अशी तीन अपत्ये. आपल्या मुलांनी उच्च शिक्षण घेऊन मोठे व्हावे ही त्यांची इच्छा होती. ते एका खासगी बँकेत नोकरी करत होते. पण ही बँक २०११ मध्ये अवसायनात निघाली आणि त्यांची नोकरीही गेली. या धक्क्याने त्यांचे २०१४ मध्ये निधन झाले आणि सारे कुटुंबच पोरके झाले. या वेळी तीन लहान मुलांना घेऊन मोहन कांबळे यांच्या पत्नी अलका कांबळे यांनी आपल्या मुलांना शिक्षण मिळावे, यासाठी मोलमजुरी करण्यास सुरुवात केली. राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाकडे अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना आहे. या योजनेचा लाभ अनुराधा

मोहन कांबळे हिने घेतला. या योजनेच्या बळावरच आज ती लंडन येथील युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिस्टॉल विद्यापीठात एरोस्पेस इंजिनिअरिंगमध्ये एम.एससी रिसर्चचे शिक्षण घेत आहे.

अनुराधा कांबळे हिचे पहिली ते सातवीपर्यंतचे प्राथमिक शिक्षण कवठेपिरान या गावात झाले, तर विश्रामबाग सांगली

येथील सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहात राहून आठवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण राजमती नेमगोंडा पाटील गर्ल्स हायस्कूल विश्रामबाग, सांगली येथे पूर्ण केले व सांगली येथील वालचंद इंजिनिअरिंग कॉलेज येथे मेकॅनिकल डिप्लोमा पूर्ण केला. तसेच पुणे येथील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे बी.ई. (मेकॅनिकल) पदवीचे शिक्षण पूर्ण केले. परदेशात उच्च शिक्षण पूर्ण करण्यासाठी पुणे येथील खासगी कंपनीत नोकरी केली. पण परदेशातील खर्च मोठा असल्यामुळे पुढील शिक्षण घेणे शक्य होत नव्हते. अशातच तिला महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेची माहिती मिळाली व तिने त्यासाठी प्रयत्न केले आणि तिची निवड झाली. आतापर्यंत १ लाख ९६ हजार रुपये इतका खर्च राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने तिच्या शिक्षणावर केला आहे. यापुढे येणारा खर्चही शासन करणार आहे.

'सातवीत असताना एरोस्पेस इंजिनिअर बनण्याचे स्वप्न पहिले होते. हे स्वप्न साकार होण्यासाठी समाज कल्याण विभागाच्या राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेचा मोलाचा वाटा असल्याचे' शिष्यवृत्तीबाबत बोलताना अनुराधा मोठ्या अभिमानाने सांगते.

– रणजीत पवार,
माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, सांगली

निवासी शाळेतून घडत आहे उद्याचे भविष्य

केंद्र सरकारच्या नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर उभारण्यात आलेल्या राज्यातील सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या निवासी शाळांची यशस्वी वाटचाल सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर सहायक आयुक्त, समाजकल्याण विभाग परभणी येथील कार्यालयाच्या अंतर्गत जून-२०११ पासून जिंतूर तालुक्यातील अकोली, सेलू तालूक्यातील हादगाव (पा.) आणि पुर्णा येथे मुलांच्या तर मानवत येथे मुलींची शासकीय निवासी शाळा कार्यरत आहेत. या चारही शासकीय निवासी शाळेत २००

विद्यार्थी निवासासह शिक्षण घेऊ शकतील अशा सर्व शैक्षणिक व भौतिक सोयीसुविधा विद्यार्थी-विद्यार्थिनींना नि:शुल्क उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. इयत्ता सहावी ते दहाव्या वर्गासाठी रिक्त असलेल्या जागेवर प्रवर्गनिहाय आरक्षण विचारात घेऊन गुणवत्तेच्या आधारावरच या निवासी शाळेत प्रवेश दिला जातो.

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागामार्फत या शासकीय निवासी शाळेत प्रवेशित विद्यार्थी-विद्यार्थीनींना सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. यामध्ये सर्व सोयींनी युक्त सुसज्ज अशी शाळेची इमारत उभारण्यात आली आहे. या चारही निवासी शाळा आय.एस.ओ. नामांकित असून या ठिकाणी उच्चशिक्षित शिक्षक अध्यापनाचे कार्य करतात. विद्यार्थ्यांमध्ये उद्यमशीलता वृद्धिंगत व्हावी, त्यांना शिक्षणाबरोबरच व्यवहार ज्ञान, सामाजिक जडणघड, सर्वंकष दृष्टिकोन विकसित करून स्वावलंबी होण्याचे शिक्षण येथील शिक्षक देतात.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे शालेय शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट असून शासकीय वसतिगृहातील प्रगतीबरोबरच विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व सामाजिक हिताची जोपासना करण्यासाठी त्यांना सहशालेय उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. या उपक्रमातील सहभागामुळे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढून सुप्त गुणांचा व सामाजिक कौशल्याचा विकास साधण्यास मदत होते. यासाठी विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धा, सामाजिक उपक्रमांमध्ये (वृक्षारोपण, पथनाट्य, स्वच्छता अभियान, तंबाखू मुक्त शाळा, संरक्षण प्रशिक्षण) सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येते. कोरोना प्रादुर्भावामुळे असलेल्या ताळेबंदीच्या कालावधीत निवासी शाळेत प्रवेशित विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने शिक्षण देण्यात आले. निवासी शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणांना वाव मिळण्यासाठी शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी सतत प्रयत्नशील असतात. २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षात परभणी जिल्ह्यातील चारही निवासी शाळेतील सर्व विद्यार्थी हे इयत्ता दहावीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. या शाळेतील अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी हे उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात कार्यरत आहे. खऱ्या अर्थाने शिक्षणाचा अर्थ समजलेली आणि देशाचे भविष्य घडवणारी आदर्श पिढी तयार करणाऱ्या या सामाजिक न्याय विभागाच्या निवासी शाळा सर्वार्थाने वेगळ्या ठरत आहेत.

– अरुण सूर्यवंशी,
जिल्हा माहिती अधिकारी, परभणी

सक्षमीकरण तृतीयपंथीयांचे!

तृतीयपंथी व्यक्तींची राष्ट्रीय पोर्टलवर नोंद करून घेण्यासाठी राज्यात सर्वप्रथम कोल्हापूर जिल्ह्यात राष्ट्रीय कार्यशाळा घेण्यात आली. यात एकाच दिवशी ६७ तृतीयपंथीयांनी नॅशनल पोर्टल फॉर ट्रान्सजेंडर या संकेतस्थळावर ऑनलाईन नावनोंदणी केली. तृतीयपंथीयांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देऊन त्यांच्या सक्षमीकरणासाठी पालकमंत्री सतेज पाटील यांच्या संकल्पनेतून कोल्हापूरचे जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी या दृष्टीने नियोजनबद्ध प्रयत्न सुरू केले आणि जिल्ह्यात तृतीयपंथीयांची नॅशनल पोर्टल फॉर

ट्रान्सजेंडरवर नोंदणी सुरू झाली. सध्या २६ तृतीयपंथीयांना विविध विषयांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. कोल्हापुरात झालेल्या 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्व' सांगता समारंभात पहिल्या टप्प्यात प्रशिक्षण देण्यात येणाऱ्या ६ तृतीयपंथीय प्रशिक्षणार्थ्यांना श्री शाहू छत्रपती महाराज, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ, पालकमंत्री सतेज पाटील व सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य ज्ञानेश्वर मुळे व लोकप्रतिनिधी यांच्या हस्ते निवडपत्र देण्यात आले.

पालकमंत्र्यांच्या संकल्पनेतून जिल्हा प्रशासनाच्या वतीने 'तृतीयपंथीयांच्या सक्षमीकरणावर भर देण्यात आला. जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी जिल्ह्यातील तृतीयपंथीयांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठी बैठका घेऊन त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण केला. जिल्ह्यात तृतीयपंथीयांची अधिकाधिक नोंदणी होऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न सुरू करण्यात आले.

तृतीयपंथीयांची वैयक्तिक, शैक्षणिक, आर्थिक माहिती घेऊन त्यांना त्यांच्या आवडीनुसार, क्षमतेनुसार त्यांना कौशल्य शिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ५० मुद्द्यांचा समावेश असणारे सर्वेक्षण अर्ज तयार केले. हे अर्ज जिल्ह्यातील प्रत्येक तृतीयपंथी व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यात आले. यासाठी जिल्हास्तरीय समितीचे सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्था, तालुकास्तरीय गुरू यांची मदत घेण्यात आली. पोर्टलद्वारे नोंदणी वाढवण्यासाठी जिल्ह्यात ८ ते १० ठिकाणी नोंदणी शिबिरे घेऊन ११५ अर्ज भरून घेण्यात आले. यानंतर या अर्जांची छाननी करून प्रत्येकाच्या छंद व आवडीनुसार त्यांना कोणते प्रशिक्षण देता येईल, याबाबत माहिती तयार केली. सध्या २० तृतीयपंथीयांना शेळीपालनाचे, तर ६ तृतीयपंथीयांना मेकअप आर्टिस्टचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

– **वृषाली पाटील,** माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर

उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण

ग्रामीण भागातील एका सामान्य कुटुंबातून आलेली वैशाली धनंजय सावंत आज नाशिक शहरात डी. फार्मसीचे शिक्षण घेत आहे. वडील शेती करतात, तर आई गृहिणी आणि एक लहान भाऊ असे चौकोनी कुटुंब. पण घरची नाजूक परिस्थिती असल्यामुळे शहरात शिक्षण घेणे वैशालीला शक्य नव्हते. त्यामुळे तिने बारावीपर्यंतचे सर्व शिक्षण गावातच पूर्ण केले. मनात जिद्द व विश्वास असला तर प्रत्येक परिस्थितीचा सामना करण्याची ताकद मिळते. घरची परिस्थिती नाजूक असली तरी आई-वडिलांनी वैशाली आणि तिच्या भावात कधीच भेद केला नाही. आई-वडिलांचा पाठिंबा व स्वत:वर असलेल्या विश्वासामुळे तिला दहावीत ९१ टक्के गुण मिळून ती प्रथम आली. वैशालीचे पुढे शिक्षण घेण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी तिला गाव सोडून शहरात यावे लागणार होते. घरच्या नाजूक आर्थिक परिस्थितीमुळे शहरात शिक्षणासाठी आल्यावर राहण्याची, जेवणाची व्यवस्था करण्यासाठी घरच्यांवर अवलंबून राहणे वैशालीस शक्य नव्हते. पण इच्छा असेल तर मार्ग सापडतो, या उक्तीप्रमाणे शिक्षण घेण्याची इच्छा, स्वत:वरील विश्वास व घरच्यांच्या पाठिंब्यामुळे वैशालीने नाशिकमधील फार्मसी महाविद्यालयात प्रवेश घेतला. आणि तिने महाविद्यालयातील तिच्या शिक्षकांना तिची राहण्याची अडचण सांगितली. त्या वेळी शिक्षकांनी वैशालीला सामाजिक न्याय विभागाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेबद्दल माहिती दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेबद्दल माहिती मिळाल्यावर थोडाही उशीर न करता वैशालीने स्वाधार योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज भरला. या योजनेंतर्गत अर्जदार विद्यार्थी हा अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गाचा असणे आवश्यक असून त्याला किमान ६० टक्क्यांपेक्षा अधिक गुण असणे गरजेचे आहे. हे सर्व निकष पूर्ण करत असल्याने या योजनेंतर्गत निवास, भोजन व निर्वाह भत्त्यासहित वर्षाला ४७ हजार ७०० रुपये बँक खात्यात जमा झाले आहेत. आई-वडिलांना त्यांच्या उतारवयात सांभाळण्यासाठी आणि घरची आर्थिक परिस्थिती बदलण्यासाठी उच्च शिक्षण घेण्याची वैशालीची इच्छा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेमुळे पूर्ण होत आहे. या योजनांच्या माध्यमातून आम्हा विद्यार्थ्यांना आमची स्वप्नं पूर्ण करण्यासाठी व स्वत:च्या पायावर आत्मविश्वासाने उभे राहण्यासाठी आधार मिळत असून त्यामुळेच मी आज घरापासून लांब राहूनदेखील सुरक्षितपणे शिक्षण घेत असल्याचे वैशाली सांगते.

– **अर्चना देशमुख,** माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक

शिष्यवृत्तीमुळे उच्च शिक्षणाची वाट सुकर

हलाखीच्या परिस्थितीशी दोन हात करताना रोजच्या जगण्याची भ्रांत होती. अशातच उच्च शिक्षणाचा विचार करणे तर शक्य नव्हते. मात्र सामाजिक न्याय विभागाच्या शिष्यवृत्तीमुळे उच्च शिक्षणाचे स्वप्न तर साकार झालेच; पण आयुष्याचा जोडीदारही मिळाला.

अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील मोहजदेवडे हे अजित व तेजश्री उबाळे यांचे गाव. सामाजिक न्याय विभागाच्या राजर्षी शाहू महाराज देशांतर्गत शिष्यवृत्ती योजनेतून बेंगळुरू येथील राजीव

गांधी आरोग्य विज्ञान विद्यापीठातून तेजश्रीने बीएसस्सी नर्सिंगची पदवी २०२०-२१ या वर्षात पूर्ण केली आहे. तर अजित हा सध्या याच विद्यापीठात शेवटच्या (चौथ्या) वर्षाला शिकत आहे. तेजश्री सध्या बेंगळुरूच्या सौरभा इन्स्टिट्यूट नर्सिंग या संस्थेत मानधन तत्त्वावर अध्यापक म्हणून काम करत आहेत.

अजितची घरची परिस्थिती अत्यंत हलाखाची. आई दुसऱ्याच्या शेतात मजुरी करते. तर वडील गवंड्याच्या हाताखाली बांधकाम मजूर म्हणून काम करतात. अजितने स्वत:चे बारावीपर्यंतचे शिक्षण हे दुसऱ्यांच्या शेतात मजुरी करून घेतले. बारावीत (विज्ञान शाखा) त्याला चांगले गुण मिळाले. मात्र, पैशाअभावी डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करता आले नाही. त्यामुळे त्याने आयटीआय अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. २ वर्षात शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुण्यात २ वर्षे कंपनीत काम केले; पण वैद्यकीय क्षेत्रात काम करण्याचे त्याचे स्वप्न त्याला स्वस्थ बसू देत नव्हते. त्याने पुन्हा प्रयत्न करत सीईटी परीक्षा दिली. अपेक्षित गुण न मिळाल्यामुळे वैद्यकीयला प्रवेश मिळाला नाही. परंतु, बेंगळुरूच्या राजीव गांधी आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या अधीनस्थ असलेल्या ब्राईट कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये बीएस्सी नर्सिंग या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळाला. मात्र बीएस्सी नर्सिंगच्या चार वर्षाच्या अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक शुल्काचा प्रश्न आ वासून उभा होता. अशातच त्याला सामाजिक न्याय विभागाच्या राजर्षी शाहू महाराज देशांतर्गत शिष्यवृत्ती योजनेविषयी मित्रांकडून माहिती मिळाली. शिष्यवृत्तीसाठी त्यांनी साहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, अहमदनगर कार्यालयाकडे अर्ज केला. त्याचा अर्जही मंजूर झाला. त्यानंतर २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ या तीन वर्षांसाठी एकूण २ लाख १६ हजार ४०० रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली. सध्या त्याचे चौथ्या वर्षाच्या शेवटच्या सत्राचे शिक्षण चालू आहे, तर तेजश्रीला २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या चार वर्षांसाठी २ लाख ८९ हजार ६०० रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली आहे.

बेंगळुरू येथे शिष्यवृत्तीचे शिक्षण घेत असतानाच त्याच्याच कॉलेजमध्ये बीएससी नर्सिंगच्या शेवटच्या वर्षाला असलेल्या तेजश्रीसोबत त्याची नातेवाइकांच्या ओळखीतून लग्नगाठ जुळून आली. ४ जुलै २०२१ रोजी दोघांचा श्रीरामपूर येथे छोटेखानी विवाह संपन्न झाला.

– **सुरेश पाटील,** माहिती अधिकारी,
उपमाहिती कार्यालय, शिर्डी

गृहिणी ते यशस्वी महिला उद्योजिका

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने नेहमीच अनुसूचित जातीतील उद्योजकांना घडवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. उद्योग क्षेत्रात महिला व अनुसूचित जातीतील उद्योजकांना उभे करण्याचे व त्यांच्या पंखांना बळ देण्याचे काम सामाजिक न्याय विभाग पार पाडत आहे. या विभागाच्या माध्यमातून औरंगाबाद येथील कविता आत्माराम धाबे यांना ६,३२,२०० रुपयांचे उद्योगासाठी अनुदान मिळाले. कोविड-१९च्या काळात कमी मागणी असल्यामुळे कर्जाची वेळेवर परतफेड करताना आर्थिक ओढाताण करावी लागत होती. पण सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या माध्यमातून मदत मिळाली व कर्जाचे हप्ते वेळेवर भरण्यास मदत झाली. तसेच मूळ कर्ज रकमेतील रक्कम कमी झाल्यामुळे दरमहा येणारा मासिक हप्ताही कमी झाला. त्यामुळे सामाजिक न्याय विभागाच्या सहकार्यामुळे एक साधारण गृहिणी ते एक यशस्वी महिला उद्योजिका असा प्रवास गाठता आला. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या सहकार्यामुळे एका महिला उद्योजिकेला भारत पेट्रोलियम या भारत सरकारच्या नवरत्न व मल्टिनॅशनल कंपनीसोबत काम करण्याची संधी उपलब्ध झाली.

महिला असल्यामुळे व्यवसाय निवडीला मर्यादा होत्या. पण मनाचा पक्का निर्धार केला आणि व्यवसायात पदार्पण करायचेच होते म्हणून भारत पेट्रोलियमच्या माध्यमातून एल.पी.जी. गॅस टँकर पुरवठ्यासाठी अर्ज केला व त्यासाठीच्या लागणाऱ्या सर्व कागदपत्रांची पूर्तता केली. बँक ऑफ बडोदा या राष्ट्रीयकृत बँकेकडून ३८.२० लाख रुपयांचे कर्ज मिळाले व महिला उद्योजिका म्हणून काम करण्याचे स्वप्न पूर्ण झाले असल्याचे श्रीमती धाबे सांगतात.

जिल्हा माहिती कार्यालय, औरंगाबाद

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिन २६ जून हा सामजिक न्यायदिन म्हणून साजरा केला जातो. शाहूराजांच्या दूरदृष्टीच्या अशा अनेक गोष्टी सांगता येतात. ज्या त्यांनी शंभर वर्षांपूर्वी कृतीत आणल्या, परंतु आजही समाजाच्या पचनी पडत नाहीत. त्यांच्या डोंगराएवढ्या कार्याने महाराष्ट्राला आणि देशाला दिशा दिली आहे. त्यांच्या कार्याचा मागोवा घेणारा लेख...

सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते : राजर्षी छत्रपती शाहू महाराज

विजय चोरमारे

राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे शाहू महाराज हे देशातील पहिले राज्यकर्ते आहेत. २६ जुलै १९०२ रोजी त्यांनी हा आरक्षणाचा निर्णय घेतला. त्याद्वारे तळागाळातल्या घटकांसाठी ५० टक्के जागा राखीव ठेवल्या. आरक्षणाच्या निर्णयावर अभ्यंकर नावाच्या एका वकिलाने आक्षेप घेतला. ज्याच्यात क्षमता आहे, तो पुढे जाईल, असा युक्तिवाद त्या वकिलाने केला.

शाहू महाराजांनी त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. घोड्याच्या पागेत बसलेल्या शाहू महाराजांनी वकिलाला तिथेच एक प्रयोग करून दाखवला. शाहू महाराजांनी मोतद्दारांना एके ठिकाणी घोड्यांची चंदी टाकायला सांगितली. नंतर घोड्यांचा सांभाळ करणाऱ्या मोतद्दारांना सगळे घोडे सोडून द्यायला सांगितले. पागेतले सर्व घोडे सोडून दिले. घोडे चंदी खाण्यासाठी तुटून पडले. पण सगळी चंदी धष्टपुष्ट घोड्यांनीच खाऊन टाकली. अशक्त, कमजोर, लुळीपांगळी घोडी तशीच मागे राहिली. मग शाहू महाराजांनी त्या वकिलाला सांगितले, माझे आरक्षणाचे धोरण हे अशा लोकांसाठी आहे. कमजोर, कमकुवत लोकांसाठी आहे. धष्टपुष्ट, ताकदवान घोडी कमजोर, कमकुवत घोड्यांना काहीच खाऊ देत नाहीत. अशाच कमकुवत लोकांना आरक्षण धोरणातून संधी दिली जाते.

शाहूराजांनी घेतलेला आरक्षणाचा निर्णय अनेक अर्थांनी क्रांतिकारक ठरतो. मागासांसाठी नोकऱ्यांमधील ५० टक्के जागा आरक्षित ठेवण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. १०० वर्षे उलटून गेल्यानंतरही तळागाळातल्या घटकांचे जीवनमान उंचावण्यासाठी मन मोठे करण्याची समाजाची मानसिकता नाही. राज्यकर्ते कुणीही असले तरी छोट्यातल्या छोट्या घटकालाही दुखावण्याची भूमिका घेत नाहीत. त्या पार्श्वभूमीवर आरक्षण धोरणाचे शिल्पकार असलेल्या शाहूराजांच्या दूरदृष्टीची कल्पना येते. या निर्णयामुळे शाहूराजांचे शत्रू वाढले आणि ते अधिक संघटित व आक्रमक झाले. लोकमान्य टिळकांसारख्या नेत्यांनी त्या वेळी हा निर्णय म्हणजे महाराजांच्या बुद्धिभ्रंशाचे लक्षण असल्याची टीका केली.

मानवी जीवनाच्या विकासाचे असे एकही क्षेत्र नाही, ज्यासाठी शाहू महाराजांनी काम

केले नाही. उस्ताद अल्लादिया खाँ साहेबांना त्यांनी कोल्हापूरला आणले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचे नेते असल्याचे त्यांनीच माणगावच्या परिषदेत जाहीर केले.राधानगरी धरण बांधून सिंचनाची सोय केली. कुस्तीला प्रोत्साहन दिले. कोल्हापुरात प्रत्येक जातीसाठी स्वतंत्र वसतिगृहे सुरू करून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात क्रांतिकारक कार्य केले. फासेपारध्यांच्या पुनर्वसनासाठी काम करून त्यांना माणसात आणण्यासाठी प्रयत्न केले. हे सगळे करत असताना समाजातील विशिष्ट वर्गाशी त्यांना मोठा संघर्ष करावा लागला. संघर्ष करतानाही त्यांनी विकासाची वाट आणि तळागाळांतील घटकांप्रति असलेली बांधिलकी याचा कधी विसर पडू दिला नाही. प्रस्थापितांनी त्यांच्या बदनामीच्या कहाण्या रचल्या. परंतु नव्या पिढीतल्या इतिहास संशोधकांनी त्या कहाण्या म्हणजे हितसंबंध दुखावलेल्या मंडळींनी रचलेली कुभांडे असल्याचे सप्रमाण सिद्ध केले.

आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार

जातिभेदांच्या निवारणाचा महत्त्वाचा मार्ग म्हणून रोटी-बेटी व्यवहाराचा उल्लेख आजही केला जातो. रोटीबंदी ही अस्पृश्यता निवारणाशी संबंधित असलेली संकल्पना बऱ्यापैकी कालबाह्य झाली आहे. बेटीबंदीच्या निर्बंधाचा विळखा मात्र आजही कायम आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे दिवंगत कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी अलीकडच्या काळात सुरू केलेली आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांची चळवळ त्याचीच साक्ष देते. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही आंतरजातीय विवाहांचा जोरदार पुरस्कार केला होता. त्याच्याही खूप आधी म्हणजे आजपासून शंभरेक वर्षांपूर्वी राजर्षी शाहू महाराजांनी आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला होता.

शाहू महाराज हे कृतिशील विचारवंत होते. त्यांनी केवळ भाषणे आणि कायदा करून विषय सोडून दिला नाही. त्याची सुरुवात स्वतःच्या घरापासून केली. आपली चुलतबहीण चंद्रप्रभाबाई यांचा विवाह इंदूरच्या तुकोजीराव होळकरांचे पुत्र यशवंतराव यांच्याशी निश्चित केला.

मराठ्यातील उच्चकुलीन घराण्यांनी धनगर समाजाशी वैवाहिक संबंध निर्माण करण्याची ही घटना दुर्मीळ आणि तत्कालीन समाजाला पचनी पडणारी नव्हती. कुटुंबापासूनच त्याची सुरुवात होती. परंतु हे संबंध जोडण्याची तयारी व्हावी म्हणून महाराजांनी करवीरच्या शंकराचार्यांकडून, 'मराठे व धनगर मूलतः एकच आहेत' असा अभिप्राय मिळवला. कोल्हापूर-इंदूर या दोन संस्थानांमध्ये मराठा-धनगर यांच्यातील शंभर आंतरजातीय विवाह करण्याची योजना त्यांनी आखली होती. त्यानुसार २५ विवाह पार पडले. शाहूराजांच्या अकाली निधनामुळे हे कार्य पुढे गेले नाही.

मोफत व सक्तीचे शिक्षण

विद्येविना मती गेलेल्या समाजाला शिक्षणाशिवाय तरणोपाय नसल्याचे लक्षात आल्यावर शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. सर्व जाति-जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची स्थापना केली. शाहूंनी २८ वर्षात १८ वसतिगृहांची स्थापना करून कोल्हापूरला 'मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस' अशी ओळख मिळवून दिली. संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यासाठी राजर्षी शाहूंनी १९१३ मध्ये बंधू पिराजीराव घाटगे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. भास्करराव जाधव, म. ग. डोंगरे, अण्णासाहेब लठ्ठे, वाय. के. दिलवर, डॉ. एच. एन. घाटगे या सदस्यांची नियुक्ती करून शिफारशी मागवून घेतल्या.

२४ जुलै १९१७ रोजी त्यांनी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याच्या योजनेचा हुकूम काढला. त्यात म्हटले आहे की, 'येत्या गणेश चतुर्थीपासून करवीर परिसरातील सर्व शाळांत मोफत व सक्तीचे शिक्षण अमलात आणण्याचा उपक्रम होण्याचा आहे.' सर्व प्राथमिक शाळांतून फी माफी करण्यात आली आहे, असा आदेशही २५ जुलै १९१७ रोजी काढला. प्रत्येक गावात एक शाळा, यानुसार काम सुरू केले. गावातील चावडी, धर्मशाळा, मंदिरात शाळा सुरू करण्याचा आदेश काढला. ज्या गावात चावडी नाही, तेथे तुळजाभवानीचे मंदिर बांधून तेथेच शाळा व चावडी बांधण्याचा आदेश काढला. त्या काळात अस्पृश्यांसाठी वेगळ्या शाळा होत्या.

शाहू महाराजांनी कालांतराने अस्पृश्यांसाठीच्या शाळा बंद केल्या. अस्पृश्य मुलांना इतर मुलांबरोबरच शाळेत बसण्याचा आदेश दिला. या बहुतेक शाळा देवळांमधून भरत होत्या. त्या काळात मंदिरांमध्येही अस्पृश्यांना प्रवेश नव्हता. शाहू महाराजांनी या निर्णयाद्वारे एकाच दगडात दोन पक्षी मारले. एक म्हणजे शालेय पातळीवरील स्पृश्यास्पृश्यतेचा भेद मिटवून टाकला. शिवाय शाळेच्या निमित्ताने अस्पृश्य मुलांनाही मंदिरात प्रवेश मिळवून दिला. शाहू महाराजांच्या या निर्णयाचे अनुकरण पुढे कर्मवीर भाऊराव पाटील यांनीही केले आणि त्यांनीही शाळांच्या माध्यमातून अस्पृश्यता निर्मूलनाचे काम पुढे नेले.

शाहू महाराजांनी गंगाराम कांबळेला हॉटेल सुरू करून दिले आणि त्या हॉटेलात स्वतः चहा प्यायला जाऊ लागले. महाराजच तिथे जातात म्हटल्यावर इतर लोकही गंगाराम कांबळेच्या हॉटेलात चहा प्यायला जाऊ लागले. अस्पृश्यता निर्मूलनासाठी शाहू महाराजांनी केलेले हे कृतिशील प्रयत्न काळाच्या खूप पुढचे होते.

मोफत प्राथमिक शिक्षण आणि सक्तीचा कायदा प्रसिद्ध करताना त्यांनी काढलेल्या आदेशात म्हटले की, 'प्रत्येक गावातील पालकांनी ३० दिवसांमध्ये मुलांची नावे कळवावीत. नावे न कळवणाऱ्या पालकांना समन्स बजावण्यात येईल. जो विद्यार्थी शाळेत येणार नाही, त्याच्या पालकास दिवसाला एक रुपये दंड ठोठावला जाईल.'

मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या या कायद्याबरोबरच स्त्री शिक्षणाच्या प्रोत्साहनाची धोरणे, वसतिगृहांची चळवळ त्यांच्या शिक्षणविषयक दृष्टिकोनाची साक्ष देतात. विधवा पुनर्विवाह कायदा, घटस्फोटाचा व वारसाचा कायदा, देवदासी प्रतिबंधक कायदा, स्त्री अत्याचार प्रतिबंधक कायदा असे स्त्रियांना संरक्षण देणारे अनेक कायदे त्यांनी केले. ज्या फासेपारधी किंवा तत्सम भटक्या जमातींना समाजाने गुन्हेगारीचा शिक्का मारून जवळपास बहिष्कृत केले होते, अशा लोकांना शाहूराजांनी मातेच्या ममतेने पोटाशी धरले. त्यांना आपल्या सेवेत घेतले. त्यांना माणसात आणण्याचे प्रयत्न केले.

दुष्काळ निवारणार्थ कार्य

महाराष्ट्र सरकारने १९७२च्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आणलेल्या रोजगार हमी योजनेचे अमाप कौतुक होते. याच योजनेतून भारत सरकारची महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना आकारास आली. परंतु महाराष्ट्र सरकारची रोजगार हमी योजना हीच मुळी शाहूराजांनी १८९६-९७ आणि १८९९-१९०० मधील दुष्काळात आपल्या संस्थानामध्ये राबवलेल्या उपाययोजनांवर आधारलेली आहे. रोजगार हमी योजनेचे गुणगान गाताना तिचे श्रेय शाहूराजांना दिले जात नाही. दुष्काळात शाहूराजांनी स्वतंत्र दुष्काळ निवारण खाते निर्माण करून त्यावर भास्करराव जाधव याच्यासारख्या कर्तबगार अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. तालुक्याच्या ठिकाणी दुष्काळ निवारण कार्यालये स्थापन केली होती. मुंबई इलाख्यात दुष्काळामुळे हजारो लोक तडफडून मरत असताना कोल्हापूर संस्थानात एकही भूकबळी पडला नव्हता. कारण शाहूराजांनी दुष्काळात अपंग, वृद्ध आणि निराधार लोकांसाठी ठिकठिकाणी नऊ आश्रम काढले होते, त्यामध्ये ५० हजारांवर लोकांची सोय करून त्यांचे जीव वाचवले. म्हैसूर राज्यातून धान्य मागवून गावागावांमध्ये धान्याची दुकाने काढली. धान्य घेण्यासाठी लोकांच्या हाती पैसे यावे म्हणून रस्त्यांची, विहिरींची, तलावांची कामे काढली. सरकारची जंगले आणि कुरणे लोकांच्या गुराढोरांसाठी खुली केली. मजुरीवर काम करणाऱ्या महिलांच्या तान्ह्या मुलांसाठी कामाच्या ठिकाणी पाळणाघरे उभी केली.

काळाच्या पुढे असलेल्या माणसांचे महत्त्व लक्षात यायला समाजही तेवढा प्रगल्भ बनावा लागतो. आजच्या समाजात तेवढी प्रगल्भता व्यापक पातळीवर दिसत नाही. म्हणूनच राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचे योग्य मूल्यमापन होत नाही. आरक्षणासह अस्पृश्यता निर्मूलनापासून आंतरजातीय विवाहापर्यंत त्यांनी घेतलेले निर्णय आजही समाजाला आणि राज्यकर्त्यांना दिशादर्शन करणारे आहेत.

(लेखक हे ज्येष्ठ पत्रकार आणि राजर्षी शाहू महाराज चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव आहेत.)

अरुण बाळकृष्ण कोलटकर हे प्रामुख्याने मराठी व इंग्रजी भाषांमध्ये कविता करणारे भारतीय कवी. मुंबईच्या सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्स येथून कला क्षेत्रातील पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी ग्राफिक्स डिझायनर व जाहिरात क्षेत्रात कलादिग्दर्शक म्हणून यशस्वी कारकीर्द घडवली. रंग-रेषांप्रमाणेच त्यांचे शब्दांवरही अतोनात प्रेम होते. जाहिरातींचे संकल्पन, पुस्तकांची मुखपृष्ठे, रेखाचित्रे अशी दृश्यभाषेत मुशाफिरी करतानाच शब्दभाषेतूनही ते सातत्याने व्यक्त होत राहिले. स्वातंत्र्योत्तर भारतातील महत्त्वाचे द्विभाषिक कवी म्हणून ते कायम ओळखले जातील.

शब्दांचा मनस्वी खेळिया

दीपक कपूर

अरुण कोलटकर (जन्म : १ नोव्हेंबर १९३२, मृत्यू : २५ सप्टेंबर २००४)... आयुष्यभर कविता आणि जाहिरात या दोन्ही क्षेत्रातील बापमाणूस म्हणून ओळखला गेलेला आणि नंतर दोन्ही क्षेत्रांचा त्याग केलेला शब्दांचा मनस्वी खेळिया...

कोलटकर हे इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांमध्ये स्वतंत्रपणे उत्तम लेखन करणारे सिद्धहस्त लेखक होते. सप्टेंबर २००४ मध्ये ते प्रदीर्घ आजाराने हे जग सोडून गेले. एक विचित्र योगायोग म्हणजे, इंग्रजी कवितेतील आणखी एक भारतीय श्रेष्ठ कवी डॉम मोरेस यांचाही २००४ मध्येच कर्करोगाने मृत्यू झाला होता. डॉम मोरेस आणि अरुण कोलटकर हे दोघेही भावनारम्य रचना करणारे अजरामर इंग्रजी कवी किट्स आणि बायरन यांच्या मुशीतील कवी. परंतू इंग्रजी साहित्यिक डायलन थॉमससारखे अरुण कोलटकरसुद्धा बहरले, कोमेजले आणि मद्यपानाचे व्यसन, आजारपण यामुळे आयुष्यातील जीवनरस आटल्याने उद्विग्न होऊन जग सोडून गेले.



अरुण कोलटकर हे खरे तर जाहिरात क्षेत्रातील उत्कृष्ट ग्राफिक आर्टिस्ट होते, पण जाहिरात क्षेत्र सोडून देत त्यांनी कवितेला वाहून घेतले. कवितेसाठीच जणू त्यांचा जन्म झाला होता, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. अरुण कोलटकरांची कविता हा त्यांचा मराठी काव्यसंग्रह १९७७ मध्ये प्रकाशित झाला, त्यानंतर चिरीमिरी, द्रोण आणि भिजकी वही प्रकाशित झाले.

दुर्मीळ मार्मिकता नि उत्कटतेचा ठसा

इंग्रजी कवितेच्या पटलावर कोलटकरांनी आपल्या दुर्मीळ मार्मिकतेचा आणि उत्कटतेचा ठसा उमटवला. १९७४ मध्ये जेजुरी हे त्यांचे इंग्रजीतील पहिले पुस्तक त्यांनी लिहिले आणि त्या पहिल्याच पुस्तकाला अत्यंत प्रतिष्ठेच्या राष्ट्रकूल (कॉमनवेल्थ) पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.

चिंतनशील कवी

मानवी मनाची सर्वोत्कृष्ट निरीक्षणे असलेल्या त्यांच्या अजरामर अशा काळा घोडा आणि सर्प सूत्र या कविता २००४ मध्ये प्रकाशित झाल्या. त्यांच्या सर्व रचनांमध्ये, काळा घोडामधील कवितांमधून दैनंदिन जीवनातील सर्व रंग आणि त्यातील रंगसंगतीचे, तीव्र विनोद आणि दुःखाच्या छटांसह वर्णन करणारा एक अतिशय चिंतनशील कवी दिसून येतो.

ते लिहितातः - delegation of crows, unfurling black flags (कावळे, काळे झेंडे फडकवणारे शिष्टमंडळच जणू...).

मुंबईतील फोर्ट परिसरात फिरत असताना त्यांना महापालिकेचे कर्मचारी शहर स्वच्छ करण्यात गुंतलेले दिसतात. त्याची निरीक्षणे त्यांनी पुढील शब्दांमध्ये व्यक्त केली आहेतः-

The more we clean Bombay, the more Bombay there is to clean. (आपण जितकी जास्त मुंबई स्वच्छ करू, तितकी अधिक मुंबई स्वच्छ करायची राहणार आहे.)

अमीट छाप सोडणाऱ्या प्रतिमा

नर्मविनोदाच्या आडून येणारी कारुण्याची सूक्ष्म छटा, हा अरुण कोलटकरांच्या सर्व कवितांमध्ये दिसणारा एक समान धागा. अतिशय सामान्य जगण्यातून ते अशा प्रतिमा निर्माण करतात, ज्या वाचकांच्या मनावर अमीट छाप सोडतात, ते सुद्धा अगदी तरलपणे, कमळाच्या पानांवरील दवबिंदूंसारख्या...

तू एकटा आहेस, मी एकटा आहे. चला, एकत्र एकेकटे राहू या, या कवी डोम मोरेस यांच्या कवितेतील भावनेप्रमाणेच आयुष्यभर एकाकीपणाच्या भावनेने पछाडलेले अरुण कोलटकर, त्यांच्या कवितांमधून लाभणाऱ्या त्यांच्या सहवासातून आपल्याला अतिशय समृद्ध करून सोडतात, हा काव्यात्मक न्यायच म्हणावा लागेल.

(लेखक हे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक आहेत.)





जगभर होत असलेल्या वातावरणीय बदलाचे गंभीर परिणाम आपण सर्वजण अनुभवत आहोत. या पार्श्वभूमीवर विकास हा महत्त्वाचा आहेच, पण तो शाश्वत आणि पर्यावरणपूरक असावा हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून राज्याच्या पर्यावरण विभागाने गेल्या दोन वर्षांत अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. वातावरणीय बदल स्वीकारून त्यावर उपाययोजना करत राज्याची पर्यावरणपूरक विकासाच्या दिशेने दमदार वाटचाल सुरू आहे.

प्रदूषणमुक्त वसुंधरा

ब्रिजकिशोर झंवर

वाढते ध्वनी व वायूप्रदूषण, अमाप वृक्षतोडीमुळे वाढलेले तापमान, निसर्गचक्राचा ढासळलेला समतोल आणि त्यामुळे उद्‌भवणारे अनेक नैसर्गिक संकटे प्रत्येकाच्या दारापर्यंत येऊन ठेपले आहेत. हे सर्व वातावरणीय बदलांचेच दुष्परिणाम. त्यावर उपाययोजना करण्याची हीच वेळ आहे, याची जाणीव ठेवून प्रत्येकाने पर्यावरणपूरक सवयी अंगिकारणे गरजेचे झाले आहे. जाणीवजागृती आणि पर्यावरणपूरक विकासाच्या दृष्टीने राज्य शासनानेही एक पाऊल पुढे टाकले आहे. गेल्या दोन वर्षांपासून याबाबत विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. पर्यावरण संवर्धनाच्या महाराष्ट्राच्या याच प्रयत्नांची दखल घेऊन संयुक्त राष्ट्र हवामान बदल परिषदेच्या स्कॉटलंड येथील 'सीओपी-२६' परिषदेत महाराष्ट्राला 'प्रेरणादायी प्रादेशिक नेतृत्वा'साठी पुरस्कार मिळाला आहे. स्कॉटलंडमध्ये तीनपैकी एक पुरस्कार जिंकणारे महाराष्ट्र हे भारतातील एकमेव राज्य आहे. राज्याच्या हवामान भागीदारी आणि क्रिएटिव्ह क्लायमेट सोल्युशन्सचीही येथे विशेष दखल घेतली गेली.

वातावरणीय बदल परिषदेची स्थापना

इंटर गव्हर्नमेंटल पॅनल ऑन क्लायमेट चेंज (आयपीसीसी) या संयुक्त राष्ट्रांच्या संस्थेने, वातावरणीय बदलाच्या अनुषंगाने सादर केलेल्या अहवालाचे राज्य मंत्रिमंडळापुढे सादरीकरण करण्यात आले. यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहअध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र वातावरणीय बदल परिषद' स्थापन करण्यात आली.

वृक्ष संवर्धन अधिनियम

५० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे वृक्ष हे वृक्ष संवर्धन अधिनियम अधिनियमानुसार 'हेरिटेज ट्री' (प्राचीन वृक्ष) परिभाषित केले जाणार आहेत. झाड तोडणे अत्यावश्यक असल्यास नुकसानभरपाई म्हणून, तोडल्या जाणाऱ्या वृक्षांच्या वयाच्या संख्येएवढी नवीन झाडे लावावी व त्याचे संगोपन करावे लागणार आहे.

लातूर येथील प्राचीन वृक्ष.

इलेक्ट्रिक वाहन धोरण

विकास हा महत्त्वाचा आहेच. पण तो शाश्वत आणि पर्यावरणपूरक असावा या अनुषंगाने राज्य शासनाने उत्पादक, वापरकर्ता आणि पर्यावरण रक्षण यांचा विचार करून सुधारित इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) धोरण आणले आहे. वातावरणीय

बदल थांबवण्यासाठी जगभरात जी क्रांती होणार आहे, त्यात महाराष्ट्र मागे पडणार नाही, यासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरणार आहे. महाराष्ट्रात शाश्वत आणि प्रदूषणरहित वाहनांचा अंगीकार करणे, ईव्हीच्या वापरात महाराष्ट्राला देशात अग्रेसर बनवणे, वाहन उत्पादनातील महाराष्ट्राचे आघाडीचे स्थान कायम राखणे आणि जागतिक पातळीवर एक प्रमुख उत्पादक आणि गुंतवणूक केंद्रस्थान म्हणून उदयास येणे हे या धोरणाचे लक्ष्य आहे.

ईव्हीच्या खरेदीवर प्रोत्साहन तसेच त्यांना रस्ते करामधून सूट देण्यात आली आहे. याचप्रमाणे चार्जिंग पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरितादेखील प्रोत्साहन देण्यात येत आहे. यामध्ये मंदगती चार्जिंग स्टेशनला महत्तम दहा हजार, तर मध्यम किंवा वेगवान चार्जिंग स्टेशनला पाच लाख एवढे महत्तम प्रोत्साहन देण्यात येणार आहे. शासनाने महावितरण कंपनीस चार्जिंग सुविधा पुरवण्यासाठी राज्य नोडल एजन्सी म्हणून नियुक्त केले आहे. या चार्जिंग

स्टेशनला विजेकरिता लागणारा दर हा अत्यंत माफक असणार आहे. महावितरणच्या विविध उपकेंद्रांमध्येदेखील चार्जिंग स्टेशन्स उभारण्यात येत आहेत. सध्या महावितरण, टाटा, अदानी, बेस्ट आणि इतर असे ४९७ सार्वजनिक चार्जिंग स्टेशन्स असून केंद्राच्या फेम-२ योजनेंतर्गत ३१७ केंद्र उभारण्यात येणार आहेत. नुकताच इमारती विकासकांच्या नरेडको संघटनेने टाटा पॉवरसोबत ५००० चार्जिंग स्टेशन्स उभारण्याचा करार केला आहे. शासनामार्फत भविष्यात राज्यात मोठ्या प्रमाणात चार्जिंग स्टेशन्स उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

सार्वजनिक वाहतुकीसाठी ईव्हींना प्राधान्य देण्यात येत आहे. सध्या मुंबईतील 'बेस्ट'कडे ३८६ इलेक्ट्रिक बसेस आहेत, तर २१०० बसेस घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. इतरही मोठ्या शहरांत ईव्हींचा वापर वाढत आहे. शासनाने या वर्षीपासून सर्व शासकीय कार्यालयात इलेक्ट्रिक वाहने घेण्याचा निर्णय घेतलाय. याची सुरुवात राजशिष्टाचार विभागाने आपल्या ताफ्यात वाहने घेऊन केली आहे. राज्यात २०२०-२१ या वर्षात ९४१५ ईव्हीची नोंदणी झाली, तर २०२१-२२ मध्ये यात मोठी वाढ होऊन ही संख्या ५१४०० इतकी झाली आहे. यातून नागरिकांचाही वाढता प्रतिसाद दिसून येत आहे.

नीती आयोगासमवेत मुंबईत झालेल्या बैठकीत आयोगाने राज्याच्या इलेक्ट्रिक वाहन धोरणाचे कौतुक केले. 'महाराष्ट्राने भविष्याचा वेध घेऊन इलेक्ट्रिक वाहन धोरण आणून चांगले पाऊल टाकले', अशा शब्दात मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ कांत यांनी प्रशंसा केली.

माझी वसुंधरा अभियान

पर्यावरण रक्षणासाठी भूमी, जल, वायू, अग्नी, आकाश या पंचतत्त्वांवर राज्य शासनाने बरेच काम केले आहे. 'माझी वसुंधरा' उपक्रमाला चळवळीचे रूप आले आहे. राज्यातील स्थानिक संस्थांना यात समाविष्ट करण्यात आले असल्याने पर्यावरण सुधारणेसाठी भरीव काम होत आहे. यामध्ये ई-प्रतिज्ञेद्वारे प्रत्येक नागरिकाला जोडण्याचे देखील उद्दिष्ट आहे. यामध्ये शासकीय संस्था, स्थानिक व जागतिक खासगी संस्था यांना जोडण्याचे तसेच सर्व राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सेवाभावी संस्था यांना बदलावर लक्ष ठेवण्यासाठी एका छत्राखाली आणण्याचे उद्दिष्ट आहे. या उपक्रमाने भावी पिढीत हरित मूल्ये रूजवण्यासाठीदेखील पुढाकार घेतला आणि महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम विकसित करण्याची योजना आखली, ज्याची सुरुवात शिक्षण विभागाद्वारे येत्या शैक्षणिक वर्षात केली जाईल.

मागील वर्षी विभागीय आणि जिल्हा प्रशासनाच्या पातळीवर माझी वसुंधरा अभियान राबवण्यात आले. मुंबईसह राज्यात साधारणपणे २१ लाख झाडे लावली गेली. २०३० पर्यंत कार्बन न्युट्रल पुणे करण्याचा प्रयत्न सुरू आहे. महाराष्ट्र जेवढे पाणी एका दिवसात वापरते तेवढे पाणी रेन वॉटर हॉर्वेस्टिंग ॲण्ड पर्क्युलेशन पिट्सद्वारे वाचवण्यात यश आले आहे. एलईडी लाईटस्, सोलर पॅनल, रूफ टॉप सोलर पॅनलचा वापर वाढवण्यात आला आहे.

पर्यावरण विभागामार्फत अनेक ठिकाणी प्राचीन झाडे वाचवण्यात येत आहेत. १६,९८४ हेक्टर जमिनीवरील कांदळवने ही राखीव वने म्हणून घोषित केलेली आहेत. यात आणखी वाढ होत आहे. आरेचे ८०८ एकरचे जंगल वाचवण्यात यश आले आहे. राज्यात नवीन जलाशये तयार केली आहेत, तर ७७५ जलस्त्रोत स्वच्छ करण्याचे काम केले. १६५० हरित क्षेत्रांची निर्मिती केली, २३७ जुनी हरित क्षेत्रे पुनर्जीवित केली, तर १.५० कोटी नागरिकांनी हरीत शपथ घेतली आहे. घनकचरा व्यवस्थापनांतर्गत कचऱ्याचे शास्त्रीय पद्धतीने विलगीकरण, वर्गीकरण व उपचार केल्याने १०,६६३ टन कंपोस्ट खत दर महिन्याला तयार झाले. ज्याद्वारे ६३,९८२.५ टन कार्बन डायऑक्साईडचे कमी करण्यात यश आले.

नुतनीकरणीय योग्य ऊर्जा स्रोत, सौर ऊर्जा, एलईडी आणि अक्षय ऊर्जा अभियानादरम्यान १२.२३ लाख एलईडी बल्ब तसेच ७० हजार सोलर लाईट्स लावण्यात आले. ज्यामधून १.४ लाख युनिट वीज वाचवण्यात मदत झाली आहे. ग्रामीण भागात माझी वसुंधरा अभियानादरम्यान ७३६ बायोगॅस प्लांट व ७०१ सोलर पंप बसवण्यात आले. ज्यामुळे, जवळपास ३२.५ टन कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन कमी झाले. पहिल्याच वर्षात ३,७०,९७८ टन कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन कमी झाले. तुलना केल्यास हे प्रमाण १.७ कोटी मोठी झालेली झाडे जेवढा कार्बन डायऑक्साईड शोषून घेतील तितके किंवा ३४ आरे जंगले जेवढा कार्बन डायऑक्साईड शोषून घेतील एवढे आहे. या वर्षी माझी वसुंधरा अभियानाचा दुसरा टप्पा राबवला जात आहे.

रेस टू झिरो

वातावरणीय बदलामुळे होत असलेले दुष्परिणाम कमी करण्यासाठी पर्यावरण विभागासह इतर सर्वच विभाग या विषयाला गंभीरपणे हाताळत आहेत. मुंबई महानगरपालिकेचा वातावरणीय बदल आराखडा जाहीर करण्यात आला असून इतर महत्त्वाच्या शहरांसाठी देखील आराखडे तयार करण्यात येत आहेत. राज्यातील ४३ अमृत शहरे 'रेस टू झिरो'मध्ये सहभागी झाली आहेत.

मुंबईत ३१-३२ डिग्री असणारे तापमान ४१-४२ सारखे भासू लागले आहे. वातावरणीय बदलांमुळे होणाऱ्या या दुष्परिणामांसाठी मोठ्या प्रमाणात आपणच जबाबदार आहोत हे लक्षात घ्यायला हवे. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता 'आज नाही तर कधीच नाही...' या दृष्टिकोनातून पर्यावरणाच्या रक्षणासाठी शासनाबरोबरच प्रत्येकाने हातभार लावणे तितकेच गरजेचे आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

राज्याच्या सर्वांगीण प्रगतीत कृषी क्षेत्राचे मोठे योगदान आहे. राज्य शासनाने विकासाची पंचसूत्री स्वीकारली असून कृषी क्षेत्राला प्रथम प्राधान्य दिले आहे. राज्यातील कृषी क्षेत्राच्या दृष्टीने खरीप हंगामाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे यंदाचा खरीप हंगाम यशस्वी होण्यासाठी शासनाने काटेकोर नियोजन केले आहे. शेतकरी बांधवांनी कोरोना संकटकाळात अर्थव्यवस्थेला ताकद दिली. आपल्या या शेतकरी बांधवांना खरीप हंगामात, बियाणे, खते वेळेत व मुबलक मिळावीत, यासाठी शासनाने योग्य ती काळजी घेतली आहे.

खरिपाची पूर्वतयारी

सागरकुमार कांबळे

राज्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७.५८ लाख हेक्टर आहे. त्यापैकी निव्वळ पेरणी क्षेत्र १६६.५० लाख हेक्टर आहे. खरिपाचे लागवडीखालील क्षेत्र १५१.३३ लाख हेक्टर असून ५१.२० लाख हेक्टर क्षेत्र रब्बी पिकाखाली आहे, तर उन्हाळी क्षेत्र १.८१ लाख हेक्टर आहे. राज्यात १ कोटी ५३ लाख शेतकरी आहेत. खरिपात भात, ज्वारी, बाजरी, मका, तूर, कापूस, सोयाबीन, ऊस ही पिके घेतली जातात.

यंदाचे हवामान

राज्याचे सरासरी पर्जन्यमान १०७५.३ मिलीमीटर एवढे आहे. यंदा ९६ ते १०४ टक्के पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हवामान खात्याच्या सध्याच्या अंदाजानुसार समाधानकारक पाऊस होणार आहे. मान्सून २०२२ दरम्यान प्रशांत महासागरावरील नीना परिस्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. केरळमध्ये नैऋत्य मोसमी पावसाचे आगमन सामान्य तारखेच्या काही दिवस आधी होण्याची शक्यता आहे.

दादाजी भुसे
कृषी मंत्री

राज्यातील शेतकरी बांधवांना दर्जेदार, प्रमाणित बियाणांचा पुरवठा करण्याबरोबर कोणत्याही शेतकरी बांधवांची तक्रार येणार नाही याची दक्षता घेतली आहे. बियाणे हा शेतीमध्ये शाश्वत उत्पादन व उत्पादकता वाढवण्यासाठीचा महत्त्वाचा घटक आहे. खरीप हंगामात खोडमाशीच्या प्रादुर्भावाची शक्यता गृहित धरून खोडमाशीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या आहेत. हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा पुरेसा पाऊस होणार आहे. परंतु पुरेसा पाऊस झाल्याशिवाय शेतकरी बांधवांनी पेरणी करू नये. २०२२-२३ हे वर्ष 'महिला शेतकरी व शेतमजूर सन्मान वर्ष' म्हणून घोषित केले आहे. कृषी विभागाच्या योजना ५० टक्के महिलांसाठी राखीव, महिलांसाठी ३० टक्के पूरक अनुदान व प्रचलित योजनेतून अभिसरणाद्वारे महिलांना लाभ देण्यात येत आहेत.

> ज्या राज्यातला शेतकरी बांधव सुखी ते राज्य सुखी. शेतकरी बांधव कष्ट करत असताना स्वत:च्या, कुटुंबाच्या आरोग्याकडे त्यांचे दुर्लक्ष होते. त्यामुळे शेतकरी बांधवांच्या आरोग्यासाठी पोषक गुणधर्म असणाऱ्या भाज्या, कडधान्यांचे दहा वाण राज्य शासन शेतकरी बांधवांना मोफत देणार आहे. शेतकरी बांधव आपल्या कुटुंबातले घटक आहेत. त्यामुळे यंत्रणेने आपुलकीने कुटुंबासारखे काम करावे. 'विकेल ते पिकेल' अभियान यशस्वी करण्यासाठी कृषी विभागाने शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करावे. शेतमालाला हमी भाव आहे, पण हमखास भाव मिळाला पाहिजे. यंदा चांगला पाऊस होणार आहे असा हवामान खात्याचा अंदाज आहे. कृषी विभागाचे खरीप हंगामाचे नियोजन समाधानकारक आहे. त्यामुळे आपणा सर्वांच्या प्रयत्नाने, सहकार्याने यंदाचा खरीप हंगाम यशस्वी होईल, असा विश्वास आहे.
>
> **- उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री**

खरीपाचे नियोजन

राज्यात २०२१-२२ मध्ये तृतीय पूर्वानुमान अहवालानुसार अन्नधान्य पिकाचे एकूण १६५.०२ लाख मेट्रिक टन उत्पादन झाले. सरासरी उत्पन्नाच्या तुलनेत ३९ टक्के वाढ झाली. यामध्ये खरीप हंगाम २०२१-२२ मध्ये अन्नधान्य ८१.६० लाख टन, खरीप गळीतधान्य ५६.७१ लाख टन, कापूस ७१.२० लाख गाठी व ऊस ११३९.३३ लाख टन इतके उत्पादन झाले आहे. राज्याच्या खरीप हंगाम २०२२ मधील कापूस पिकाखाली लागवडीखालील ४२ लाख हेक्टर क्षेत्र अपेक्षित आहे. सोयाबीन पिकाखाली ४६ लाख हेक्टर, भात पिकाखाली १५.५० लाख हेक्टर, मका पिकाखाली ९.५० लाख हेक्टर, तर कडधान्य पिकाखाली २३ लाख हेक्टर क्षेत्र आणण्याचे नियोजन केले आहे.

बी–बियाणे मुबलक

खरीप हंगामासाठी १७.९५ लाख क्विंटल बियाणे आवश्यक असून महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ व खासगी संस्था असे एकूण १९.८८ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. राज्यात शेतकरी बांधवांचे घरचे तयार केलेले ४५.०९ लाख

> राज्याच्या विकासात कृषी विभागाची भूमिका महत्त्वाची आहे. कोरोना संकटकाळात अर्थव्यवस्थेला कृषी क्षेत्राने, शेतकरी बांधवांनी ताकद दिली. राज्यातील शेतकरी बांधवांना खते, बियाणे वेळेत मिळाली पाहिजेत. खते कमी दरात वेळेत मिळण्यासाठी कृषी विभागाने केंद्र सरकारशी संपर्क, समन्वय ठेवावा. यंदाचा खरीप हंगाम यशस्वी करण्यासाठी समन्वयाने काम करा. कृषी विभाग योजनांसाठी सातत्याने पाठपुरावा करत असतो. ही बाब समाधानाची आहे. या विभागाला आवश्यक निधी उपलब्ध करू देण्यात येईल. शेतकरी बांधवांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही.
>
> **- अजित पवार, उपमुख्यमंत्री**

क्विंटल इतके सोयाबीन उपलब्ध झाले आहे. कापूस पिकाखाली सरासरी क्षेत्र ४१.८४ लाख हेक्टर असून ९८ टक्के क्षेत्रावर बीटी कापसाची लागवड आहे. कापूस पिकासाठी १ कोटी ७१ लाख बियाणे पाकिटांची आवश्यकता असून कापूस पिकाकरिता २ कोटी ७ लाख पाकिटांचा पुरवठा करण्याचे नियोजन आहे.

खतांची उपलब्धता

खरीप हंगाम २०२२ मध्ये एप्रिल ते सप्टेंबर दरम्यान ४५.२० लाख मे.टन रासायनिक खत उपलब्ध होणार असून त्यापैकी ९.०८ लाख मे.टन पुरवठा झाला आहे.

सध्या राज्यात १६.९८ लाख मे.टन रासायनिक खतांचा साठा उपलब्ध आहे. आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये खताच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे युरिया, डी.ए.पी.चे दर स्थिर ठेवण्यासाठी केंद्र शासनाकडे राज्य शासनाने वेळोवेळी पाठपुरावा केल्याने खतांचे दर स्थिर राहिले आहेत. यामध्ये कृषी मंत्री दादाजी भुसे यांनी मोठी भूमिका बजावली आहे.

राज्यातील शेतकरी बांधवांना गुणवत्तापूर्ण निविष्ठा मिळण्यासाठी व निविष्ठांमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी ३९५ भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. तसेच आयुक्तालय स्तरावर नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली.

विशेष मोहीम

प्रत्येक गावात शेतकऱ्यांच्या सभा घेऊन जमीन सुपिकता निर्देशांक आधारित संतुलित खत वापर विशेष मोहिमेंतर्गत ग्रामपंचायतीमध्ये प्रदर्शित केलेल्या जमीन सुपीकता निर्देशांक फलक आधारित खत वापराबाबत जनजागृती करण्यात येत आहे. खतांच्या विविध संयोजन पर्यायाकरिता शेतकऱ्यांच्या मोबाईलमध्ये कृषिक ॲप डाऊनलोड करून त्याच्या वापराबाबत मार्गदर्शन करण्यात येत आहे.

डॉ. विश्वजीत कदम
कृषी राज्यमंत्री

कोरोना काळातील बिकट परिस्थितीतही अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य कृषी विभागाने केले असून गेल्या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी विक्रमी उत्पादन घेतले आहे. खरीप हंगाम २०२२ साठी प्रशासकीय तयारी पूर्ण झाली आहे. शेतकऱ्यांना दर्जेदार खते, बी-बियाणे उपलब्ध करण्याच्या दृष्टीने विभागवार नियोजन केले आहे. यंदाच्या हंगामामध्ये संपूर्ण राज्यभर वरुण राज्याची चांगली कृपादृष्टी राहील, असा भारतीय हवामान खात्याने अंदाज वर्तविला असून, सर्व शेतकरी बांधवांनी योग्य पाऊस पडल्यानंतर पिकांची पेरणी करावी.

विकेल ते पिकेल

'विकेल ते पिकेल' अभियानांतर्गत शेतकरी ते ग्राहक थेट विक्री करण्यासाठी २०,३१४ ठिकाणी शेतकऱ्यांना खासगी, सार्वजनिक व शासकीय कार्यालय आवारात बाजार उपलब्ध करून देण्यात आले आहेत. संत शिरोमणी सावता माळी रयत बाजार अभियानामुळे आता शेतकरी ते ग्राहक थेट विक्री होत आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजना

२०२१-२२ मध्ये ९६.४६ लाख शेतकरी या योजनेत सहभागी झाले असून ५७.१६ लाख हेक्टर क्षेत्रावरील पीक संरक्षित करण्यात आले. त्यापैकी खरीप हंगामासाठी ६४.६ लाख शेतकऱ्यांना ३८२७.४७ कोटी इतकी नुकसान भरपाईची रक्कम निश्चित करण्यात आली आहे. त्यापैकी स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत २३८९.८६ कोटी व हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत झालेले नुकसान ४५०.८९ कोटी रुपये निश्चित करण्यात आले आहे.

योजना आणि उपक्रम

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा), मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट), महाडिबीटी पोर्टल-अर्ज एक योजना अनेक, डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन, रिसोर्स बँकेतील शेतकऱ्यांचा विस्तार कार्यामध्ये सहभाग, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना आदी योजना, उपक्रमांच्या माध्यमातून शेतकरी बांधवांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शासन प्रयत्नशील आहे.

महाराष्ट्राची बलस्थाने

शेतमाल निर्यातीसाठी असलेल्या ट्रेसिबिलीटी नोंदणीच्या प्रणालीमध्ये देशातील ७२,२८० शेतकऱ्यांपैकी महाराष्ट्रातील ६२,३४४ शेतकरी आहेत. भारतातील १२९ भौगोलिक मानांकनापैकी महाराष्ट्रातील २६ आहेत. देशात भौगोलिक मानांकन नोंदणीकृत शेतकरी ५,२६० आहेत. त्यापैकी ४३९० शेतकरी महाराष्ट्रातील आहेत. महाराष्ट्रातील द्राक्ष, डाळींब, आंबा, केळी, कांदा, मिरची या पिकांच्या निर्यातीत आघाडीवर आहे. देशाच्या एकूण निर्यातीच्या ६५ टक्के फळे, ५५ टक्के भाजीपाला महाराष्ट्रातून निर्यात होतो. देशात सर्वाधिक ४५०० शेतकरी उत्पादक कंपन्या महाराष्ट्रात आहेत. पीएमएफएमई योजनेत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. ही आपल्या महाराष्ट्राची बलस्थाने आहेत.

विभागीय संपर्क अधिकारी

शासन विविध स्तरावर लोकाभिमुख निर्णय घेत असते. त्या निर्णयांची अंमलबजावणी, विविध प्रकल्पांचे भूमिपूजन, शुभारंभ होत आहेत. काही योजनांच्या कार्यपूर्तीचा, प्रकल्पांचे लोकार्पण, नवीन वास्तूंचे उद्घाटन, विकासकामांचा आढावा घेण्याचे काम मंत्रिमंडळातील सदस्य करत असतात, अशा अनेक बाबींचा थोडक्यात आढावा...

उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्यमंत्री

पाऊल पडते पुढे

महा-उत्सव २०२२ चे उद्घाटन

महाराष्ट्र दिनानिमित्त राज्य शासनाच्या सेवेतील अधिकाऱ्यांच्या कलागुणदर्शनाचा रंगारंग महोत्सव महा-उत्सव २०२२ कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे महा-उत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, परिवहन मंत्री ॲड. अनिल परब, पर्यावरण व राजशिष्टाचार मंत्री, आदित्य ठाकरे यांच्यासह खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी, मुख्यसचिव मनुकुमार श्रीवास्तव आदींची उपस्थिती होती. या वेळी शासनाच्या दर्शनिका विभाग, पर्यटन व सांस्कृतिक विभागाच्या स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्राचे योगदान या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री श्री. ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच कोरोना योध्यांचा सत्कारही या वेळी करण्यात आला.

कृषी पुरस्कार वितरण सोहळा

नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठात राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. २०१७, २०१८ व २०१९ च्या या राज्यस्तरीय कृषी पुरस्कार वितरण सोहळ्यात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे (दूरदृश्य प्रणालीद्वारे) उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, कृषिमंत्री दादाजी भुसे, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री छगन भुजबळ, रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, कृषी राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, आमदार हिरामण खोसकर, दिलीप बनकर, माणिकराव कोकाटे, नितीन पवार, पद्मश्री पुरस्कार प्राप्त राहीबाई पोपेरे, कृषी विभागाचे सचिव एकनाथ डवले, कृषी विभागाचे आयुक्त धीरज कुमार, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, जिल्हाधिकारी गंगाथरन डी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी लीना बनसोड व इतर अधिकारी उपस्थित होते.

या वेळी मान्यवरांच्या हस्ते २०१७, २०१८ आणि २०१९ या तीन वर्षातील राज्यातील १९८ शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. पुरस्कार प्राप्त काही शेतकऱ्यांनी आपल्या पुरस्काराची रक्कम मुख्यमंत्री सहायता निधीत जमा केल्याने त्यांचे आभार या वेळी मान्यवरांनी मानले. तसेच कृषी राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम यांनी आभार व्यक्त करून पुरस्कार प्राप्त सर्व शेतकऱ्यांचे अभिनंदन केले.

महा-उत्सव २०२२ कार्यक्रमाप्रसंगी 'स्वातंत्र्यसमरातील महाराष्ट्राचे योगदान' या पुस्तकाचे प्रकाशन करताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे. सोबत उपमुख्यमंत्री अजित पवार, परिवहन मंत्री ॲड. अनिल परब, पर्यावरण व राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे यांच्यासह खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी, मुख्यसचिव मनुकुमार श्रीवास्तव आदींची उपस्थिती होती.

उद्योग विभागाचा आढावा

राज्याचे उद्योगाचे धोरण हे भूमिपुत्रांना रोजगार उपलब्ध करून देणारे असावे. यासाठी या धोरणातच शिक्षण -प्रशिक्षणाचा समावेश राहील यासाठी उच्च व तंत्रशिक्षण, कौशल्य विकास विभाग यांचा सहभाग घेण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले.

मंत्रालयातील समिती सभागृहात उद्योग

विभागाची आढावा बैठक झाली. बैठकीस उद्योगमंत्री सुभाष देसाई, पर्यावरण, पर्यटन व राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, खासदार अनिल देसाई, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, उद्योग विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव बलदेव सिंह, उद्योग विभागाचे विकास आयुक्त हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. अन्बलगन, कौशल्य विकास विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता आदी उपस्थित होते.

कृतज्ञता पर्व साजरा

ज्या वृत्ती विरोधात छत्रपती शाहू महाराज लढले ती वृत्ती आज खरोखर संपली आहे का, याचा विचार करण्याची गरज आहे. ती वृत्ती आता जिथे जिथे जिवंत असेल तिथे तिथे लढू या व सामाजिक समता स्थापित करून छत्रपती शिवाजी महाराज व राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना अपेक्षित असलेला समाज आणि राज्य निर्माण करण्यासाठी एकत्र येऊन काम करू, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा १०० वा स्मृतिदिन हा 'कृतज्ञता पर्व' म्हणून साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त शाहू मिल येथे आयोजित कृतज्ञता सभेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे दूरभाष्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन करत होते. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार हे दूरभाष्य प्रणालीद्वारे पुणे येथून उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. शाहू छत्रपती महाराज होते.

या वेळी व्यासपीठावर महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, ग्रामविकास व कामगार मंत्री हसन मुश्रीफ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, पालकमंत्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील-यड्रावकर, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, महाराष्ट्र राज्य कृषी प्रशिक्षण व संशोधन केंद्राचे उपाध्यक्ष प्रकाश आबिटकर, छत्रपती संभाजीराजे, छत्रपती मालोजीराजे, खासदार संजय मंडलिक, खासदार धैर्यशील माने, आमदार जयंत आसगावकर, विनय कोरे, पी. एन. पाटील, राजेश पाटील, राजू आवळे, आमदार जयश्री चंद्रकांत जाधव, जिल्हाधिकारी राहुल रेखावार व अन्य मान्यवर उपस्थित होते.

सर्वांसाठी पाणी धोरणाचा शुभारंभ

मुंबई महानगरपालिका देशात सर्वोत्तम महानगरपालिका आहे. सर्वांसाठी पाणी या धोरणाच्या माध्यमातून मुंबईत येणाऱ्या प्रत्येक माणसाला हक्काचे पाणी मिळणार आहे. सर्वांसाठी पाणी हे धोरण राबवणारी मुंबई महानगरपालिका देशात पहिली महानगरपालिका आहे. सर्वांसाठी पाणी या बरोबरच सर्वांसाठी आरोग्य हा उपक्रम सुरू करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले.

माँसाहेब मीनाताई ठाकरे उद्यान, नागरी निवारा परिषद गोरेगाव येथे बृहन्मुंबई महानगरपालिका परिसरातील सर्व निवासी रहिवाशांसाठी असणाऱ्या सर्वांसाठी पाणी धोरणाचा शुभारंभ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. या वेळी शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड, वस्त्रोद्योग मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री अस्लम शेख, पर्यटन मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, खासदार गजानन कीर्तिकर, आमदार सुनिल प्रभू, राजहंस सिंह, रवींद्र वायकर, माजी महापौर किशोरी पेडणेकर, महानगरपालिका आयुक्त व प्रशासक डॉ. इकबालसिंह चहल आदि मान्यवर उपस्थित होते. या वेळी सर्वांसाठी पाणी! धोरणाच्या पुस्तिकेचे प्रकाशन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

बीडीडी चाळीतील पोलिसांना घरे

नायगाव, एन. एम. जोशी मार्ग आणि वरळी येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाला गती देण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केले आहे. या चाळींमध्ये २०११ च्या आधीपासून पोलीस सेवा निवासस्थानात राहात असलेल्या पोलिसांच्या कुटुंबीयांना बांधकाम दराने ही घरे देता यावीत, यासाठी गृहनिर्माण विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या निवासस्थानी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पासंदर्भात बैठक घेण्यात आली, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड, गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, राजशिष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे यांच्यासह मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव आदी उपस्थित होते.

खरीप हंगामपूर्व नियोजनाचा आढावा

'राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक २०२२' मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथिगृह, मुंबई येथे झाली. या वेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, कृषिमंत्री दादाजी भुसे, सहकार मंत्री बाळासाहेब पाटील, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री सुनिल केदार, फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे, कृषी राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, फलोत्पादन राज्यमंत्री कु. आदिती तटकरे, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, कृषी आयुक्त धीरजकुमार उपस्थित होते, तर दूरदृश्यप्रणालीद्वारे पालकमंत्री, विभागीय आयुक्त, कृषी विद्यापाठांचे कुलगुरू, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास मान्यता

श्रीक्षेत्र जेजुरी गड तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील १०९.५७ कोटींच्या पहिल्या टप्प्याच्या कामास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

ऐतिहासिक वास्तूंचे जतन आणि संवर्धन करताना त्या वास्तूची मूळ शैली जपणे आवश्यक असून पुरातत्त्वीय जाण असलेल्या संस्थेमार्फत ही कामे करण्यात यावीत, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

यांनी दिले. जेजुरी गडावरील मंदिराचे जतन आणि संवर्धन करताना परिसरातील इतर मंदिरेही पुरातत्त्व विभागांतर्गत संरक्षित करावीत, असेही त्यांनी सांगितले. पहिल्या टप्प्यात जेजुरी मंदीर व गड जतन आणि संवर्धन तसेच परिसर व जल व्यवस्थापनाचे काम करण्यात येणार आहे.

या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, खासदार सुप्रिया सुळे, आमदार संजय जगताप, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी आदी उपस्थित होते.

सेवाग्राम विकास आराखड्यास निधी

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत सेवाग्राम विकास आराखड्यांतर्गत करण्यात येत असलेल्या कामांसाठी ८१.५७ कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी मंजूर करण्यात आला. तसेच एकूण २४४.०८७ कोटी रुपयांच्या सुधारित सेवाग्राम आराखड्यास मान्यता देण्यात आली. सेवाग्राम विकास आराखड्यांतर्गत करावयाची कामे ही वेळेत पूर्ण व्हावीत, तसेच त्या कामांचा दर्जा उत्कृष्ट राहील याची दक्षता घेण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिल्या.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सेवाग्राम विकास आराखड्यासंदर्भातील शिखर समितीची बैठक सह्याद्री अतिथिगृहात आयोजित करण्यात आली होती, त्या वेळी ते बोलत होते.

बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, पशुसंवर्धन मंत्री तथा वर्ध्याचे पालकमंत्री सुनील केदार, वित्त व नियोजन राज्यमंत्री शंभुराज देसाई, खासदार रामदास तडस, आमदार सर्वश्री रणजित कांबळे, पंकज भोयर यांच्यासह मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव आदी उपस्थित होते. बैठकीत सेवाग्राम विकास आराखडा-वर्धा या कॉफी टेबल बूकचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

आदिवासी महिलांच्या मागण्या

राज्यातील आदिवासी महिलांच्या विविध मागण्यांसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, जलसंपदा मंत्री जयंत पाटील, कृषिमंत्री दादाजी भुसे, रोजगार हमी योजना मंत्री संदिपान भुमरे, आदिवासी विकास राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, आमदार कपिल पाटील, लोक संघर्ष मोर्चाच्या प्रतिभाताई शिंदे आदींसह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते. आदिवासी विकासमंत्री ॲड. के. सी. पाडवी, महिला व बालविकास

अजित पवार
उपमुख्यमंत्री

मंत्री यशोमती ठाकूर हे मान्यवर दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जल, जंगल, जमिनीवर स्थानिक आदिवासींचा प्राधान्याने हक्क असून त्यादृष्टीने वन हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी. आदिवासी विकासाच्या योजना परिणामकारक राबवाव्यात. कृषीसह अन्य विभागाच्या योजनांचा लाभ आदिवासी बांधवांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. वनहक्क दावे मंजूर झालेल्या लाभार्थींची यादी प्रसिद्ध करण्यात यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मुंबईतील सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित विशेष बैठकीत दिले.

आरोग्य जनजागृती परिषद

कोरोना कालावधीत राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभाग अतिशय चांगले काम केले. मात्र सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचे बळकटीकरण करण्याची आवश्यकता असून त्यादिशेने राज्य शासन काम करत आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजित पवार यांनी केले.

राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांच्या वतीने राज्यस्तरीय आरोग्य जनजागृती परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत मार्गदर्शन करताना श्री. पवार बोलत होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथील सभागृहात हा कार्यक्रम झाला. या वेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे, माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री आदिती तटकरे, खासदार सुप्रिया सुळे, आमदार भास्कर जाधव, महात्मा जोतिराव फुले आरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुधाकर शिंदे, संचालक डॉ. साधना तायडे, हर्षवर्धन देशमुख, डॉ. समीर दलवाई आदी उपस्थित होते.

प्रशिक्षण संकुलाचे लोकार्पण

हवेली तालुक्यातील वडमुखवाडी (चऱ्होली) येथील प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेत उभारण्यात आलेल्या प्रशिक्षण संकुलाच्या लोकार्पण करण्यात आले. या वेळी कृषिमंत्री दादाजी भुसे, खासदार श्रीरंग बारणे, कृषि विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, वनामतीचे संचालक रविंद्र ठाकरे, रामेतीचे प्राचार्य विनायक देशमुख आदी उपस्थित होते.

महामंडळाच्या योजनांना निधी देणार

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात पहिल्या पाचपैकी ४, पहिल्या १० पैकी ७, एकूण उत्तीर्ण ५९७ पैकी १९८ उमेदवार 'सारथी' संस्थेचे आहेत. यावरून 'सारथी'ची वाटचाल योग्य दिशेने सुरु असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'सारथी'च्या कामगिरीचे कौतुक केले. देशात, जगाच्या पाठीवर उद्योगक्षेत्राची गरज ओळखून

रोजगार मिळवून देणारे अभ्यासक्रम तरुणांनी निवडावेत. प्रशिक्षणानंतर स्वत:च्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करावा. कृषी, उद्योग, आर्थिक क्षेत्राच्या गरजेनुसार कौशल्यविकासाचे अभ्यासक्रम निवडून पूर्ण करण्यासाठी 'सारथी'ने तरुणांना मदत करावी. राज्यातील तरुणांना रोजगार, उद्योग, व्यवसायात संधी देऊन यशस्वी होण्यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी मदत करेल. 'सारथी' व 'अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळा'ने त्यांच्या योजना प्रभावीपणे राबवाव्यात, त्यांना योजनांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिला.

मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन गद्रे, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव सुमंत भांगे, 'सारथी'चे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक एम. व्ही. मोहिते, राजेंद्र कोंढरे, अनंत पवार, धनंजय जाधव, आप्पासाहेब कुढेकर, गंगाधर काळकुटे हे उपस्थित होते. बैठकीत मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, 'सारथी' व 'अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळा'चे कामकाज प्रभावी करण्याच्या सूचना दिल्या.

'सारथी'ची पुणे मुख्यालय इमारत, कोल्हापूर उपकेंद्राची इमारत, तसेच खारघर-नवीमुंबई, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, लातूर, नागपूर येथील केंद्राच्या निर्मितीचाही बैठकीत आढावा घेण्यात आला.

नवीन वाहने

विधानभवन समोरील वाहनतळावर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या नवीन वाहनांचे वितरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते फीत कापून व वाहनाला हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले. या वेळी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या प्रधान सचिव वल्सा-नायर सिंह, आयुक्त कांतिलाल उमाप, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे सहआयुक्त विश्वनाथ इदिसे, संचालक दक्षता व अंमलबजावणी उषा वर्मा, उपआयुक्त सुनील चव्हाण, संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

अवैध मद्यविक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून महसूल वाढीसाठी प्रभावीपणे राज्य उत्पादन शुल्क विभाग प्रयत्नशील राहील. यामुळे देश व राज्याच्या महसूलातही मोठी भर पडेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

कृषी उत्पादनांच्या विक्रीचा शुभारंभ

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथील सभागृहात राज्यातील १२ भौगोलिक मानांकन प्राप्त कृषी उत्पादनांच्या विक्रीचा शुभारंभ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला. यात मंगळवेढा मालदांडी ज्वारी, नवापूर तूरडाळ, भिवापूर मिर्ची पावडर, पुणे आंबेमोहोर तांदूळ, महाबळेश्वर ड्राय स्ट्रॉबेरी, सांगली हळद, आजरा घनसाळ तांदूळ, वायगाव हळद, डहाणू चिक्कू पावडर, सांगली बेदाणा, वेंगुर्ला काजू, भंडारा चिन्नोर तांदूळ या उत्पादनांचा समावेश आहे. या शुभारंभप्रसंगी सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील, आमदार तथा प्राधिकृत अधिकारी बाबासाहेब पाटील, सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार, कृषी व पदुम विभागाचे सचिव एकनाथ डवले, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक सुधाकर तेलंग, प्राधिकृत अधिकारी मंडळ सदस्य नंदकिशोर सूर्यवंशी यांच्यासह राज्यातील विविध भागातून आलेले शेतकरी उपस्थित होते.

नवीन इमारतीचे उद्घाटन

गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी येथील उपकोषागार कार्यालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते मंत्रालयातून ऑनलाईन पद्धतीने झाले. या वेळी वित्त राज्यमंत्री शंभूराज देसाई, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन गद्रे, लेखा व कोषागारे प्रधान सचिव आभा शुक्ला, लेखा व कोषागारे संचालक वैभव राजेघाटगे, उपसचिव इंद्रजीत गोरे, सहसंचालक स्मिता कुलकर्णी, स्वप्नजा सिंदकर, अहेरी उपकोषागार कार्यालय येथून विभागीय सहसंचालक सुवर्णा पांडे, जिल्हा कोषागार अधिकारी लक्ष्मण लिंगालोड, उपकोषागार अधिकारी पंकज मुधोळकर आदींसह विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

'रेरा' आधी सिडकोची परवानगी

नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्रात ('नैना') वेगाने वाढत असलेल्या अनधिकृत बांधकामांना चाप लावण्यासाठी या इमारतींचे रेरा रजिस्ट्रेशन करण्यापूर्वी त्यांना सिडकोची मान्यता तपासणे अनिवार्य करण्यात आले आहे. यामुळे 'नैना' क्षेत्रात वेगाने सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामांना रोखण्यास मोठी

एकनाथ शिंदे
नगरविकास, सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम) मंत्री

मदत होणार आहे. यासोबतच 'नैना' क्षेत्रातील भूखंडावर आकारण्यात येणारे विकास शुल्क शेवटच्या घटकाकडून स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. 'नैना' प्रकल्पातील टाऊन प्लॅनिंग स्कीममध्ये सामील होणाऱ्या भूखंड धारकांना लवकरात लवकर प्रॉपर्टी कार्ड देण्याचा निर्णयही नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे.

नवी मुंबई विमानतळाच्या आजूबाजूच्या

परिसराचा विकास सुनियोजितपणे व्हावा यासाठी स्थापन करण्यात आलेल्या नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना) प्राधिकरणाशी संबंधित भूमिपुत्र आणि विकासकांना दिलासा देण्यासाठी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेतला असून त्यांना दिलासा देण्यासाठी विविध निर्णय घेतले आहेत.

प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत सूचना

ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांवर तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी दिल्या.

घाटघर उदंचन जलविद्युत प्रकल्पग्रस्तांच्या समस्यांबाबत आज जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. त्या वेळी त्यांनी या सूचना दिल्या. सारंगपूरी, खैरे, साठगांव, शिलोत्तर, शिवनेरी, धसई येथील डावातीर कालवा प्रकल्पांवरही चर्चा करण्यात आली.

जयंत पाटील
जलसंपदा मंत्री

भातसा धरणाच्या पाणी वापराचे फेर जलनियोजन करून या कालव्यांसाठी आवश्यक पाण्याची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच शहापूर तालुक्यातील मुंमरी प्रकल्पाच्या भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती देण्याच्या सूचना ठाणे जिल्हाधिकारी यांना जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी दिल्या.

जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, सचिव प्रकल्प समन्वय विलास राजपूत व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मधाचे गाव प्रकल्पाचा शुभारंभ

सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील मांघर येथील 'मधाचे गाव' प्रकल्प देशातील हा पहिलाच प्रकल्प असून राज्यातील इतर जिल्ह्यात देखील असे प्रकल्प राबवण्यात येतील, असे प्रतिपादन उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी केले.

सुभाष देसाई
उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री

महाबळेश्वर तालुक्यातील मांघर हे 'मधाचे गाव' म्हणून श्री. देसाई यांच्या उपस्थितीत घोषित करण्यात आले. या वेळी ते बोलत होते. या प्रसंगी उद्योग राज्यमंत्री कु. आदिती तटकरे, आमदार मकरंद पाटील, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अन्शु सिन्हा, उप मुख्यकार्यकारी अधिकारी बिपीन जगताप, प्रांताधिकारी संगिता चौगुले, मध संचालनालयाचे संचालक दिग्विजय पाटील, ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक सुषमा देसाई, सरपंच यशोदा संजय जाधव आदी उपस्थित होते.

सेंद्रिय शेतीविषयक चर्चा

महा ऑर्गनिक ॲण्ड रेसिड्यू फ्री फार्मर्स असोसिएशन (मोर्फा) महाराष्ट्र राज्य पुणे यांच्यासमवेत सह्याद्री अतिथिगृह येथे सेंद्रिय अणि विषमुक्त शेतीविषयक अन्न व औषध प्रशासन विभागाशी संबंधित विषयांवर चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली. जेष्ठ नेते आणि

डॉ. राजेंद्र शिंगणे
अन्न व औषध प्रशासन मंत्री

माजी केंद्रीय कृषिमंत्री खासदार शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीला अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, कृषिमंत्री दादाजी भुसे, सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील, पशु संवर्धन व दुग्ध विकासमंत्री सुनील केदार उपस्थित होते.

सेंद्रिय उत्पादनांना प्रोत्साहन देत असतानाच ग्राहकांची फसवणूक होणार नाही याची काळजी घेतली जावी, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागातर्फे सहकार्य केले जाईल, असे अन्न व औषध प्रशासन मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी या वेळी सांगितले.

उद्यमिता यात्रेचा प्रारंभ

राज्यात उद्योजकता, सूक्ष्म व्यवसाय, कौशल्य विकास आणि तरुणांच्या प्रशिक्षणाला चालना देण्यासाठी राज्यव्यापी उद्यमिता यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून या यात्रेचा प्रारंभ करण्यात आला.

युथ एड फाऊंडेशन यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी आणि राज्यातील विविध भागातील स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. यात्रेच्या प्रारंभी कौशल्य विकास सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेन्द्र सिंह कुशवाह, कौशल्य विकास विभागाच्या सहसचिव डॉ. सुवर्णा खरात, उपसचिव नामदेव भोसले, युथ एड फाऊंडेशनचे अध्यक्ष मॅथ्यू मॅथन, फाऊंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रिया कोठारी यांच्यासह स्वयंसेवक, प्रशिक्षक आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्यमिता यात्रेचा प्रारंभ झाला असून पालघर, वसई, ठाणे, नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव या मार्गे राज्यातील सर्व जिल्ह्यांमधून जनजागृती करत ही यात्रा प्रवास करणार आहे. २० जून रोजी पुणे येथे यात्रेचा समारोप होणार आहे.

राजेश टोपे
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

जन आरोग्य योजनेची अंमलबजावणी

महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेची अंमलबजावणी अधिक सुलभ करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी सांगितले.

राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग आणि यशवंतराव चव्हाण सेंटर यांच्या वतीने राज्यस्तरीय आरोग्य जनजागृती परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेच्या समारोपाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी विधी व न्याय राज्यमंत्री आदिती तटकरे, खासदार सुप्रिया सुळे, अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, महात्मा जोतिराव फुले आरोग्य सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुधाकर शिंदे, संचालक डॉ. साधना तायडे, आदी उपस्थित होते.

ग्रामीण रुग्णालयांतही दातांवर उपचार

बालकांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्व वयोगटातील रुग्णांसाठी दंत चिकित्सकांची सेवा आवश्यक असल्याने दंतचिकित्सक क्षेत्रातील विविध पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. ग्रामीण रुग्णालयांपर्यंत पदे निर्माण करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे ग्रामीण रुग्णालयातही दातांवर उपचार मिळतील, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी दिली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे महाराष्ट्र राज्य दंत परिषदेने कोविड दंत योद्धा पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मंत्री राजेश टोपे, तर पुरस्काराचे वितरण मंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी परिषदेचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र काळे, निबंधक शिल्पा परब, डॉ. जगन्नाथ हेगडे, डॉ. अशोक ढोबळे यांच्यासह परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

हेरवाड ग्रामपंचायतीचे अभिनंदन

समाजात प्रचलित असलेली अनिष्ट प्रथा बंद करण्याचा ठराव ग्रामसभेमध्ये ठेऊन कोल्हापूर जिल्ह्याच्या हेरवाड ग्रामपंचायतीने विधवा प्रथा बंद केली. आता अन्य ग्रामपंचायतींना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. पुरोगामी महाराष्ट्रामध्ये प्रागतिक विचारांचे स्वागत होणे महत्त्वाचे आहे. जुन्या बुरसटलेल्या

हसन मुश्रीफ
ग्रामविकास, कामगार मंत्री

प्रथा परंपरांना विज्ञानवादी युगामध्ये स्थान असता कामा नये, असे सांगून हेरवाड ग्रामपंचायतीप्रमाणे राज्यातील अन्य ग्रामपंचायतींनी याचे अनुकरण करून ठराव करण्याचे आवाहन ग्रामविकास व कामगार मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले.

कोल्हापूर जिल्ह्याच्या हेरवाड ग्रामपंचायतीने ५ मे २०२२ रोजी विधवा प्रथा बंद करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर केला. या ग्रामपंचायतीने केलेली ही कृती स्तुत्य असल्याने या ग्रामपंचायतीचे मंत्री हसन मुश्रीफ यांनी अभिनंदन केले. आज कुप्रथांचे पालन होत असल्याने अशा व्यक्तीच्या प्रतिष्ठेचे, जीवन जगण्याच्या मानवी अधिकारांचे तसेच भारतीय संविधानाने बहाल केलेल्या समतेच्या हक्काचेही उल्लंघन होते. त्यामुळे अशा प्रथेचे निर्मुलन होणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे हेरवाड ग्रामपंचायतीने केलेल्या ठरावाप्रमाणेच अन्य ग्रामपंचायतींनी या निर्णयास आदर्श मानून समाजातील कुप्रथा बंद करून महिलांचे जीवन सुकर आणि आनंदी करण्याचे समाजोपयोगी निर्णय घ्यावेत, असेही आवाहन मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले. या संदर्भातील परिपत्रक ग्रामविकास विभागाने निर्गमित केले आहे.

पाठ्यपुस्तकाच्या वितरणास प्रारंभ

समग्र शिक्षा अभियानातंर्गत पाठ्यपुस्तकाच्या वितरणाचा प्रारंभ शालेय शिक्षण मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांच्या हस्ते बालभारतीच्या गोरेगाव भांडारात करण्यात आला. या वेळी शिक्षण विभागातील संचालक कैलास पगारे, बालभारतीचे नियंत्रक विवेक गोसावी, मुंबई शिक्षण उपसंचालक संदीप संगवे, मुंबई महानगरपालिकेचे शिक्षण अधिकारी इंदरसिंग गडाकोटी, शिक्षण निरीक्षक देविदास महाजन आदी उपस्थित होते.

समग्र शिक्षा अभियानांतर्गत राज्यातील जिल्हा परिषदा, नगरपालिका, महानगरपालिका, कटक मंडळे तसेच अनुदानित शाळांना राज्य शासनातर्फे इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येते. येत्या शैक्षणिक वर्षापासून म्हणजे जून २०२२ पासून राज्यातील शाळा नियमितपणे सुरू होत आहेत. त्यामुळे राज्यातील सर्वच विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके मिळण्याच्या दृष्टीने योग्य ते नियोजन करण्यात आले असून ही पाठ्यपुस्तके शाळेत वेळेत पोहोचण्यासाठी आजपासून मोफत पाठ्यपुस्तक वितरणाला सुरुवात करण्यात आली. पाठ्यपुस्तक मंडळाच्या अन्य विभागीय भांडारातूनही या

प्रा. वर्षा गायकवाड
शालेय शिक्षण मंत्री

मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण सुरू करण्यात आले आहे.

शालेय वर्ष २०२२-२०२३ करिता एकूण ५ कोटी ४० लाख प्रतींचा पुरवठा करण्यात येणार असून शाळेच्या पहिल्याच दिवशी ही सर्व पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांच्या हाती पोहोचवण्याचे निर्देश मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी शिक्षण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. समग्र शिक्षा अभियानाव्यतिरिक्त इयत्ता पहिली ते बारावीची सर्व पाठ्यपुस्तके खुल्या बाजारात विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

शेळ्यांचे वितरण

नागपूर जिल्ह्यातील ५०० महिलांना सहभागी करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी महामंडळाच्या प्रक्षेत्र बोंद्री येथे गोट बँकेची स्थापना करण्यात

सुनील केदार
पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास,
क्रीडा व युवक कल्याण मंत्री

येणार आहे. या अंतर्गत महामंडळाच्या निधीतून ५०० महिलांना शेळ्यांचे वितरण करण्यात येणार आहे. कारखेडा गोट प्रोड्युसर कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने गोट बँकेचे संकल्पनेतून हा उपक्रम राबवण्यात येणार असल्याचे पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय मंत्री सुनील केदार यांनी सांगितले.

मंत्रालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या वेळेस पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव जे. पी. गुप्ता, आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह,अतिरिक्त आयुक्त धनंजय परकाळे, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शशांक कांबळे यांच्यासह प्रक्षेत्र व्यवस्थापक उपस्थित होते.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली नवीन शासन आल्यानंतर महामंडळाच्या आर्थिक स्थिती सुधारली आहे. आता अधिकृत भागभांडवल १०० कोटी रुपये झाले आहे. तसेच महामंडळाची सरासरी वार्षिक आर्थिक उलाढाल ४० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. पूर्वी राज्यात १० प्रक्षेत्रे होती, ती आता १६ झाली आहेत. मांडग्याळ या मेंढीच्या जातीस केंद्र शासनाचे मानांकन प्राप्त झाले आहे. मांडग्याळ ही मेंढीची जात महाराष्ट्रात प्रसिद्ध जात म्हणून ओळखली जात आहे, असे श्री. केदार यांनी सांगितले.

मान्सूनपूर्व आढावा बैठक

सर्व प्रशासकीय यंत्रणांनी मान्सूनपूर्व कामे गतीने करावीत. त्याचबरोबर अचानक येणारी वादळे व पूर यामुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी, या आपत्तीमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना तत्काळ मदत व पुनर्वसन करण्यासाठी राज्यात आपत्ती प्रतिसाद यंत्रणेची अंमलबजावणी करण्यात येणार असून याचे सर्व जिल्हास्तरीय यंत्रणांना प्रशिक्षण द्यावे, असे निर्देश आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिले.

कोकण व पुणे महसुली विभागातील जिल्ह्यांची मान्सूनपूर्व आढावा बैठक दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून झाली. या वेळी मंत्रालय दालनातून आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री श्री. वडेट्टीवार बोलत होते. या बैठकीला मदत व पुनर्वसनचे प्रधान सचिव असिमकुमार गुप्ता, आपत्ती व्यवस्थापन संचालक संजय धारूरकर यांच्यासह दूरदृश्यप्रणालीद्वारे कोकण, पुणे विभागातील विभागीय आयुक्त, उपायुक्त व सर्व जिल्हाधिकारी उपस्थित होते.

नवीन वेबपोर्टलचे उद्घाटन

इतर मागास बहुजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत तयार करण्यात आलेल्या www.msobcfdc.org या वेबपोर्टलचे

विजय वडेट्टीवार
आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री

उद्घाटन करण्यात आले. या वेळी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रफुल्ल ठाकूर, कौशल्य विकास अधिकारी विजय काटोलकर या वेळी उपस्थित होते.

सामंजस्य करार

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील बदलामुळे नवनवीन रोजगाराच्या, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. या सेवा क्षेत्रात व्यावसायिक कौशल्येदेखील तितकेच महत्त्वाची आहेत. उदयोन्मुख माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. कुशल

उदय सामंत
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध व्हावे आणि विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळावे, यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि नॅसकॉम (नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर ॲण्ड सर्व्हिस कंपनिज) यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

या वेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उच्च शिक्षण संचालक धनराज माने, तंत्रशिक्षण संचालक अभय वाघ, नॅसकॉमचे संचालक डॉ. चेतन सामंत, विजय चौघुले, सचिन म्हस्के, श्रीदेवी सिरा उपस्थित होते.

बीजोत्पादनाचा आढावा

राज्यातील शेतकरी बांधवांना खरीप हंगाम-२०२२ मध्ये दर्जेदार, प्रमाणित बियाण्यांचा पुरवठा करावा, बियाण्यांची उपलब्धता, पुरवठा सुरळीत व्हावा, सोयाबीनचा पेरा वाढण्याची शक्यता गृहित धरून सोयाबीनच्या बियाण्यांच्या उपलब्धतेबाबत नियोजन करावे, तेलबियांच्या बियाणांची उपलब्धता वाढवावी, योजनांच्या माध्यमातून उभ्या केलेल्या बीज प्रकल्पांना गती द्यावी,

दादाजी भुसे
कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री

कोणत्याही शेतकरी बांधवांची तक्रार येऊ नये यासाठी काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी दिले.

खरीप हंगाम २०२२ मधील बियाणे उपलब्धता व पुरवठा, बीजोत्पादनाची आढावा बैठक कृषिमंत्री श्री. भुसे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. या वेळी कृषी राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम, कृषी आयुक्त धीरज कुमार, महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक रूचेश जयवंशी, कृषी संचालक दिलीप झेंडे, कृषी विद्यापीठ, महाबीज, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर

भाजी आणि फलोत्पादन निर्यातीत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असल्याचा अभिमान आहे. अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकरी बांधवांना आम्ही अन्नदाता संबोधतो. कर्नाटक राज्याप्रमाणे 'ई-पिक पाहणी' ॲप राज्यात कार्यरत असून, त्याचा लाभ शेतकऱ्यांना होणार असल्याचे कृषिमंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथिगृहात कर्नाटकचे कृषी मंत्री बी.सी. पाटील यांच्यासमवेत शिष्टमंडळाने कृषी मंत्री दादाजी भुसे यांची भेट घेतली. भेटीदरम्यान दोन्ही राज्यांच्या कृषीविषयक योजना, त्यांना देण्यात येणाऱ्या सवलती, जास्तीत जास्त उत्पादन वाढवणे, कृषी उत्पादकांना थेट बाजार उपलब्ध करून देणे याबाबत विस्तृत चर्चा झाली.

कर्नाटकचे कृषिमंत्री श्री. पाटील यांनी राज्याच्या कृषी धोरणाबाबत माहिती जाणून आनंद व्यक्त केला. महाराष्ट्र राज्याप्रमाणे कृषीविषयक योजना राबवणार असल्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. कर्नाटक राज्यातील विविध योजनांचीही त्यांनी या वेळी माहिती दिली.

राष्ट्रीय सागरमालाची शिखर बैठक

महाराष्ट्रात बंदरे विकासाची प्रचंड क्षमता असून यासाठी केंद्र शासनाच्या सहकार्याची आवश्यकता असल्याची भूमिका राज्याचे वस्त्रोद्योग, मत्स्य व्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री अस्लम शेख यांनी मांडली.

दिल्ली येथील विज्ञान भवनात राष्ट्रीय सागरमालाची ३ री शिखर बैठक पार पडली. या वेळी मंत्री श्री. शेख बोलत होते. या बैठकीची अध्यक्षता केंद्रीय बंदरे, जहाज बांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी केली. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते.

'महामत्स्य अभियाना'चा शुभारंभ

मुंबईतील तारापोरवाला मत्स्यालयात स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त 'महामत्स्य अभियाना'चा मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. या वेळी मत्स्यव्यवसाय आयुक्त डॉ. अतुल पाटणे, सहआयुक्त राजेंद्र जाधव यांचेसह मत्स्यव्यवसाय विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

अस्लम शेख
मत्स्यव्यवसाय मंत्री

या वेळी मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या हस्ते 'मत्स्य अभियान' पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले, तर विभागाच्या अद्ययावत संकेतस्थळाचा आणि ट्विटर, फेसबुक, इन्स्टाग्राम, यु-ट्यूब या समाजमाध्यमांवरील खात्यांचा शुभारंभ करण्यात आला. २५ मे ते ७ ऑगस्ट या कालावधीत राज्यात 'महामत्स्य अभियान' राबवण्यात येत आहे.

प्रतिपालकत्वासाठी नोंदणी करावी

अनाथ बालकांना दत्तक घेणाऱ्या पालकांची संख्या महाराष्ट्रात दिवसेंदिवस वाढत आहे. महिला व बालविकास विभागाने प्रतिपालकत्व पोर्टल तयार केले आहे. आजपर्यंत या पोर्टलवर दहापेक्षा अधिक पालकांनी नोंदणी केली असून याबाबत विभागामार्फत पुढील प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रतिपालकत्वासाठी इच्छुक असणारे अनेक पालक जिल्हास्तरावर माहिती घेत आहेत. या पोर्टलला सकारात्मक प्रतिसाद मिळतो आहे, ही आनंददायी बाब आहे. प्रतिपालकत्व नोंदणीसाठी या पोर्टलवर जास्तीत जास्त नोंदणी करावी, असे आवाहन राज्याच्या महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती

ॲड. यशोमती ठाकूर
महिला व बालविकास मंत्री

ठाकूर यांनी केले आहे.

महिला व बालविकास विभागाने अतिशय सुरक्षित आणि पारदर्शी असे Foster Care Registration Portal विकसित केले आहे. इच्छुक पालक या पोर्टलवर प्रतिपालक म्हणून नोंदणी करू शकतात. काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना आपुलकीने कुटुंबात समाविष्ट करून त्यांना प्रेमळ वातावरणात वाढण्याची संधी द्या आणि https://fc.wcdcommpune.com या संकेतस्थळाला भेट देऊन प्रतिपालक म्हणून नोंदणी करावी, असे आवाहन मंत्री ॲड. ठाकूर यांनी केले आहे.

लाइटहाऊस लर्निंगसोबत करार

राज्यातील आदर्श व स्मार्ट अंगणवाड्या आता अधिक स्मार्ट, बोलक्या आणि दर्जेदार होणार आहेत. त्यांचा कायापालट होण्यासाठी आणि आदर्श अंगणवाड्यांच्या विकासासाठी महिला व बालविकास विभागाने लाइटहाऊस लर्निंगसोबत सामंजस्य करार केला आहे. त्यामुळे आदर्श अंगणवाड्यांना अद्ययावत करून त्या अधिक-अधिक स्मार्ट, बोलक्या आणि दर्जेदार करण्याचे महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी सांगितले.

महिला आणि बालविकास विभाग व लाईटहाऊस लर्निंग या संस्थेसोबत आदर्श अंगणवाड्यांच्या विकासासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या वेळी महिला व बालविकास विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन, एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्त रूबल अग्रवाल, एकात्मिक बालविकास सेवा योजना उपायुक्त राजेश क्षीरसागर, लाईटहाऊस लर्निंग संस्थेचे सहसंस्थापक प्रजोद राजन, लाईटहाऊस लर्निंग संस्थेचे के व्ही एस. शेषशाही, तुषार श्रोत्री, अनिता मदान, शैलेश सिंह आदी उपस्थित होते.

सर्वेक्षणासाठी निधी

अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील मुळा धरणाच्या जलाशय/नदीवरील आणि निळवंडे धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्यावरील एकूण १७ उपसासिंचन योजनांचे प्राथमिक सर्वेक्षण करण्यात येणार असून, यासाठी २ कोटी

शंकरराव गडाख
मृद् व जलसंधारण मंत्री

३७ लाखांहून अधिक निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे मृद् व जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांनी सांगितले. १०१ ते ६०० हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या १७ योजनांसाठी एकूण ३,९०० हेक्टरचे सर्वेक्षण करण्यासाठी २ कोटी ३७ लाख ३१ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली.

चार्जिंग स्टेशन लोकार्पण

मुंबई महानगराच्या पर्यावरण संवर्धनासाठी आणि 'स्वच्छ - सुंदर मुंबई'साठी एका पाठोपाठ उपक्रम सुरू करताना बृहन्मुंबई महानगरपालिकेने आणखी एका अभिनव उपक्रमाचा शुभारंभ केला आहे. 'डी' विभागातील केशवराव खाड्ये मार्गावर अन्न कचऱ्यापासून वीजनिर्मिती करणाऱ्या प्रकल्पाला इलेक्ट्रिक व्हेईकल फास्ट चार्जिंग स्टेशनची जोड देण्यात आली आहे. अशा स्वरूपाचे भारतातील हे पहिलेच चार्जिंग स्टेशन असून त्याचे लोकार्पण पर्यावरण मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्हा पालकमंत्री आदित्य ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी उप आयुक्त (पर्यावरण) सुनील गोडसे, 'डी' विभागाचे सहायक आयुक्त प्रशांत गायकवाड, एरोकेअर क्लीन एनर्जीचे संस्थापक अंकीत झवेरी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

दर्जेदार निवास सुविधासाठी करार

कोविड-१९चा प्रादुर्भाव संपल्यानंतर सेवा आणि आदरातिथ्य क्षेत्राच्या वाढीसाठी मोठा वाव आहे. हे लक्षात घेऊन राज्यातील पाच पर्यटनस्थळांवर पर्यटकांना दर्जेदार निवास सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खासगी उद्योजकांबरोबर करार करण्यात आला असल्याची माहिती पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी दिली.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या ताब्यातील शासकीय जमिनीचा खासगीकरणाच्या माध्यमातून पर्यटनदृष्ट्या विकास करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. याअंतर्गत महाबळेश्वर, माथेरान, मिठबाव, हरिहरेश्वर आणि ताडोबा येथे निवास सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी खासगी

आदित्य ठाकरे
पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री

विकासकांना सवलतीचे करारपत्र देण्यात आले. या वेळी पर्यटन राज्यमंत्री कु. आदिती तटकरे, प्रधान सचिव वल्सा नायर सिंह, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक जयश्री भोज, वरिष्ठ व्यवस्थापक संजय ढेकणे आदी उपस्थित होते.

टीम लोकराज्य

राज्य मंत्रिमंडळाच्या ११ आणि २६ मे २०२२ रोजीच्या बैठकीत वित्त, नगरविकास, कृषी, ऊर्जा, मदत व पुनर्वसन आदी विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती..

मंत्रिमंडळात ठरले

वैयक्तिक लाभाच्या योजना आधार कार्डशी जोडणार

राज्य शासनाचे विविध लाभ, सवलती व शिष्यवृत्तीच्या योजना राबवताना राज्यातील एकही पात्र लाभार्थी या योजनांच्या लाभापासून वंचित राहू नये, म्हणून सर्व लाभार्थींची नावे ३० डिसेंबर २०२२ पर्यंत आधार कार्डशी जोडण्याची प्रक्रिया अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या संदर्भात राज्याच्या नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थसंकल्पीय भाषणात या योजना लाभार्थींच्या आधार क्रमांकाशी जोडण्यात येतील असे नमूद करण्यात आले होते. पोषण आहार योजनेंतर्गत महिला व बालविकास, शालेय शिक्षण, सामाजिक न्याय, आदिवासी आणि इतर बहुजन कल्याण विभागांनी पोषण आहाराशी संबंधित सर्व लाभार्थींची नावे आधार कार्डशी जोडण्याची प्रक्रिया पूर्ण करायची आहे. सर्व संबंधित विभागाच्या सचिवांनी आपल्या शिक्षक तसेच विद्यार्थी, लाभार्थी यांचा डेटाबेस तयार करताना आधार कार्डशी संलग्न करून कोणताही पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यायची आहे. ज्या विभागांमध्ये पोषण आहार व तत्सम बाबींचा धान्य पुरवठा होत असतो त्याकरिता वाहनांच्या जीपीएस ट्रॅकिंग व्यवस्था ३० डिसेंबर, २०२२ पर्यंत कार्यान्वित करण्यात येणार आहे. १ जून २०२२ पासून सर्व संबंधित विभागाच्या सचिवांनी आपापल्या विभागातील मास्टर डेटाबेसदेखील अद्ययावत ठेवायचा आहे.

शिष्यवृत्तीसाठी कोणताही पात्र विद्यार्थी लाभापासून वंचित राहू नये म्हणून उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण, शालेय शिक्षण, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, इतर मागास बहुजन कल्याण आणि अल्पसंख्याक विकास विभागाच्या योजना आधारशी लिंक करूनच २ जानेवारी २०२३ पासून डीबीटीमार्फत विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्ती जमा करण्यात यावी, असेही ठरले.

क्रीडांगणावरील आरक्षणातून रस्ता

पुणे येथील लोहगाव विमानतळाकडे पर्यायी रस्ता आखणे गरजेचे असल्याने येथील क्रीडांगणाच्या काही क्षेत्रातून रस्ता प्रस्तावित करण्यासाठी आरक्षण बदलास मान्यता देण्यात आली. लोहगाव विमानतळाकडे जाण्यासाठी संरक्षण दलाच्या हद्दीमधून १२ मीटर रुंदीचा रस्ता उपलब्ध आहे. मात्र विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी हा रस्ता बंद करावा लागत असल्याने पर्यायी रस्ता आखणे गरजेचे असल्याने शेजारील खेळाच्या मैदानातील काही भागातून रस्ता करण्याच्या अनुषंगाने आरक्षण बदलास मान्यता देण्यात आली.

फेरबदलास मान्यता

सांगली महापालिकेच्या मंजूर विकास योजनेमध्ये बालक्रीडांगणावरील आरक्षणातून बांधकाम झालेले क्षेत्र वगळून फेरबदल करण्यास मान्यता देण्यात आली. आरक्षण क्र.२२० या बालक्रीडांगण आरक्षणाचे एकूण क्षेत्र ५०० चौरस मीटर असून, त्यापैकी फक्त ६३ चौरस मीटर बांधकाम झालेले क्षेत्र वगळण्यात येणार आहे. या ६३ चौरस मीटर जागेत शौचालय, बाथरूम व पाण्याचा हौद असून या ठिकाणी निवासी वापरही सुरू आहे. हे क्षेत्र आरक्षणातून वगळले, तरी ४३७ चौरस मीटर क्षेत्र बालक्रीडांगणासाठी शिल्लक राहणार आहे.

विशेष कृती योजना

कापूस आणि सोयाबीनची उत्पादकता वाढवण्याच्या विशेष कृती योजनेस तीन वर्षात एक हजार कोटी निधी देण्यास मान्यता देण्यात आली. या विशेष कृती योजनेच्या अंमलबजावणीसाठी कृषी मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन करण्यात येणार आहे.

राज्यातील कापूस पिकाखाली ४२ लाख हेक्टर व सोयाबीन पिकाखाली ४६ लाख हेक्टर असे एकूण ८८ लाख हेक्टर क्षेत्र लागवडीखाली असून या प्रमुख पिकांची उत्पादकता विविध कारणांमुळे देशाच्या उत्पादकतेपेक्षा कमी आहे. त्याचप्रमाणे, या दोन्ही पिकांच्या बाबतीत असेही आढळून आले आहे की, योग्य तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या तालुक्यातील काही शेतकऱ्यांची उत्पादकता खूप अधिक आहे. परंतु त्याच तालुक्यातील व त्याच कृषी-हवामान क्षेत्रात राहणाऱ्या अन्य शेतकऱ्यांची उत्पादकता मात्र त्या तुलनेत अत्यंत कमी आहे.

या पार्श्वभूमीवर, शासनाने अर्थसंकल्पामध्ये कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची उत्पादकता प्रगतशील शेतकऱ्यांच्या बरोबरीने आणण्यासाठी आणि मूल्य साखळी विकासासाठी राबवावयाच्या विशेष कृती योजनेसाठी येत्या तीन वर्षांत

रुपये १००० कोटी निधी देण्यात येईल, अशी घोषणा केली होती. त्या अनुषंगाने, कापूस, सोयाबीन तसेच, भुईमुग, सुर्यफुल, करडई, मोहरी, तीळ व जवस या अन्य तेलबिया या पिकांच्या उत्पादकता वाढी बरोबरच मूल्य साखळी विकासासाठी आगामी ३ वर्षांसाठी विशेष कृती योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यातील सुमारे ६० टक्के निधी हा कापूस व सोयाबीन पिकांच्या उत्पादकता वाढीचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याकामी व विविध खते अनुदान स्वरूपात देण्यासाठी तसेच कृषी विद्यापिठांमार्फत बियाणे साखळी बळकटीकरणासाठी वापरला जाईल. उर्वरित ४० टक्के निधी हा मूल्य साखळी विकासासाठी, विविध पायाभूत सुविधांच्या विकासासाठी (उदा. साठवणूक सुविधा, प्रक्रिया संच, क्लिनिंग ग्रेडिंग युनिट, जैविक निविष्ठा निर्मिती, बीज प्रक्रिया युनिट इ.) वापरात आणला जाईल. ज्या तालुक्यांची कापूस व सोयाबीन पिकांची उत्पादकता राज्याच्या सरासरी उत्पादकतेपेक्षा कमी आहे अशा तालुक्यांची प्राधान्याने निवड करण्यात येईल. प्रत्येक तालुक्यातील अधिक उत्पादकता असलेले प्रगतशील संसाधन शेतकरी (Resource Farmers) वापरत असलेले तंत्रज्ञान तसेच, कृषी विद्यापीठांनी शिफारस केलेल्या तंत्रज्ञानाचा तालुक्यातील अन्य शेतकऱ्यांपर्यंत विस्तार करण्यात येईल. त्याकरिता गावनिहाय शेतकऱ्यांचे गट तयार करण्यात येतील, या गटांतील शेतकऱ्यांपर्यंत पीक प्रात्यक्षिकांद्वारे तसेच शेती शाळा, क्षेत्रीय भेटी व प्रशिक्षणाद्वारे पिक उत्पादन तंत्रज्ञान पोहोचवण्यात येईल, त्यांची क्षमता बांधणी करण्यात येईल तसेच, पीक उत्पादन तंत्रज्ञानाची प्रचार प्रसिद्धी करण्यात येईल.

एक वर्षाची मुदतवाढ

महाऊर्जाकडील नोंदणीकृत ४१८ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पांना कार्यान्वित करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्याच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्रोतांपासून वीज निर्मितीचे धोरण २०१५ व धोरण २०१६ नुसार महाऊर्जाकडे नोंदणी करण्यासाठी २ वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर मुदतवाढ न मिळालेल्या महाऊर्जाकडील नोंदणीकृत ४१८ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पांना कार्यान्वित करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

अपारंपरिक ऊर्जा निर्मिती प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक व रोजगार निर्माण होईल. तसेच राज्यास महसूलही मिळेल. त्याचप्रमाणे हवेच्या प्रदुषणातही घट होईल.

धरणांमध्ये ४१ टक्के पाणीसाठा

राज्यातील पिण्याच्या पाण्याची सद्यस्थिती आणि टंचाई निवारणाच्या उपाययोजनांबाबतही मंत्रिमंडळ आढावा घेण्यात आला. राज्यातील मोठे, मध्यम व लघू पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत यंदा उपलब्ध असलेल्या पाणीसाठ्याची माहिती देण्यात आली. यंदा राज्यातील सर्व प्रकल्पांमधील पाणीसाठा ४१.१९ टक्के आहे. गतवर्षी याच कालावधीत हा पाणीसाठा ३९.९२ टक्के इतके होता. राज्यातील २८१ गावे, ७३८ वाड्यांना २७० टँकर्सने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

राज्यातील मोठे, मध्यम व लघू पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयातील पाणीसाठ्याची टक्केवारी महसूल विभागनिहाय पुढीलप्रमाणे (कंसात गतवर्षीची २०२१ मधील टक्केवारी) : अमरावती - ५०.०८ टक्के (४७.२५). औरंगाबाद - ५०.१५ (४२.६०). कोकण - ४७.९६ (४७.६२). नागपूर -३७.३९ (४४.२७). नाशिक - ४१.०४ (४३.५९). पुणे - ३४.११ (३२.१२टक्के).

टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या गावे, वाड्या आणि टँकर्सची संख्या महसूल विभागनिहाय पुढीलप्रमाणे: अमरावती - गावे ४१, वाड्या - निरंक, टँकर्स - ४१. औरंगाबाद - गावे १४, वाड्या - १, टँकर्स - २४. कोकण - गावे १११, वाड्या - ३६६, टँकर्स - ७८. नाशिक - गावे ७३, वाड्या - ८६, टँकर्स - ७२. पुणे - गावे ४२, वाड्या - २८५, टँकर्स - ५५. नागपूर विभागात कोणतेही गाव, किंवा वाडी-वस्ती यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत नाही. अशा रितीने राज्यातील २८१ गावे, ७३८ वाड्यांना २७० टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या आठवड्यामध्ये गावांच्या संख्येमध्ये ६८ ने, तर वाड्या-वस्त्यांच्या संख्येमध्ये १७५ ने वाढ झाली आहे. टँकर्सच्या संख्येमध्येही ८३ ने वाढ झाली आहे. त्यामध्ये ५७ शासकीय व २१३ खासगी अशा एकूण २७० टँकर्सद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. गतवर्षी आजच्या स्थितीला राज्यात ३५६ गावे, ७३४ गावांना संख्या २७७ टँकर्सने पाणीपुरवठा करण्यात येत होता.

सारथी संस्थेस खारघरमध्ये भूखंड

छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेस नियोजन विभागामार्फत नवी मुंबईतील खारघर सेक्टर ३७, मधील ३ हजार ५०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड देण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्य शासनाने मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी यांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी या संस्थेची स्थापना केलेली आहे. सारथी संस्थेमार्फत राज्यातील पुणे, कोल्हापूर, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती व मुंबई येथे विभागीय कार्यालय, वसतिगृहे, अभ्यासिका व ग्रंथालय, कौशल्य विकास केंद्र, सैन्य व पोलीस भरती पूर्वप्रशिक्षण केंद्र, जेष्ठ नागरिक समुपदेशन कक्ष, महिला सक्षमीकरण केंद्र इ. सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांसाठी ५०० मुलांचे व ५०० मुलींचे स्वतंत्र निवासी वसतिगृहदेखील विकसित करण्यात येईल.

या अंतर्गत नवी मुंबई येथील केंद्रासाठी सिडकोच्या माध्यमातून खारघर सेक्टर ३७, मधील ३५००.०० चौ.मी.क्षेत्रफळाचा हा भूखंड विशेष बाब म्हणून नाममात्र दराने भाडेपट्ट्याने शासनाच्या नियोजन विभागास देण्यात येणार आहे.

टीम लोकराज्य

आदिवासी भागातील नवजात बालमृत्यू कमी करण्यासाठी त्वरित संदर्भ सेवा उपलब्ध करून देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. बालकांना प्रवासादरम्यान प्रशिक्षित व्यक्तीकडून वैद्यकीय सेवा मिळाव्यात व प्रवासादरम्यान होणारे अर्भक मृत्यू कमी करण्याच्या दृष्टीने राज्यात १३व्या वित्त आयोगांतर्गत मंजूर अनुदानातून वैद्यकीयदृष्ट्या संसाधनांनी युक्त शिशू रुग्णवाहिका सुरू करण्यात येत आहे.

शिशू रुग्णवाहिकेचे लोकार्पण

रवींद्र राऊत

राज्याच्या आदिवासी भागातील भौगोलिक कार्यक्षेत्र विचारात घेता संदर्भ सेवा संस्थेपर्यंत पोहोचण्यास वेळ लागू शकतो. आदिवासी भागातील आरोग्य संस्थेमधील अंतर जास्त असते तसेच दळणवळणाच्या सेवा अपुऱ्या असतात. अशा परिस्थितीमध्ये अर्भकांचा प्रवासादरम्यान मृत्यू होण्याची शक्यता वाढते. मुदतपूर्व प्रसूती, प्रसुतीदरम्यान गुंतागुंत झालेली बालके, जन्मजात व्यंग असणारी बालके यांना पुढील स्तरावर उपचाराकरिता आवश्यकता असते. या बालकांना तसेच आशांमार्फत संदर्भीत करण्यात येणाऱ्या अर्भकांना पुढील आरोग्य संस्थेत पाठवण्याकरिता वाहतूक व्यवस्थेची आवश्यकता असते. या सर्व गोष्टींचा विचार करून अशा बालकांना प्रवासादरम्यान प्रशिक्षित व्यक्तीकडून वैद्यकीय सेवा मिळाव्यात व प्रवासादरम्यान होणारे अर्भक मृत्यू कमी करण्याच्या दृष्टीने राज्यात १३व्या वित्त आयोगांतर्गत मंजूर अनुदानातून वैद्यकीयदृष्ट्या संसाधनांनीयुक्त शिशू रुग्णवाहिका (Neonatal Ambulance) सुरू करण्यात येत आहे.

रुग्णवाहिकेची वैशिष्ट्ये

राज्यातील नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा व धडगाव, अमरावती जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा तसेच नाशिक जिल्ह्यातील पेठ या भागातील शासकीय रुग्णालयांना पाच नवजात शिशू रुग्णवाहिका खरेदी करून पुरवठा करण्यासाठी २३७.४६ लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आलेले होते. या रुग्णवाहिका नवजात शिशू यांना आरोग्य सुविधा पुरवणारी प्रथमच तयार होणारी रुग्णवाहिका आहे. यामध्ये नियमित वैद्यकीय उपकरणांसहित बालकांसाठी विशेष वैद्यकीय उपकरणे रुग्णवाहिकेमध्ये बसवण्यात आलेली आहेत.

नवजात शिशुसाठी ईएन१७८९ या जागतिक मानांकनाची उच्च दर्जाची वैद्यकीय उपकरणे रुग्णवाहिकेमध्ये बसवण्यात आलेली आहेत. या रुग्णवाहिकेला पाच वर्षे आणि त्यातील वैद्यकीय उपकरणांना तीन वर्षे हमी कालावधी देण्यात आलेला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाची राज्यातील पहिली नवजात शिशू रुग्णवाहिका सेवेत दाखल झाली आहे. या रुग्णवाहिकेचे लोकार्पण आरोग्य मंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते मुंबईत करण्यात आले.

रुग्णवाहिकेचे फायदे

वेळेत आणि वेळीच उपचार देऊन इतर आरोग्य संस्थेमध्ये संदर्भित करेपर्यंत शिशुचे आरोग्य स्थिर राखण्यास या रुग्णवाहिकेमार्फत मदत होईल. नवजात शिशुंमधील श्वसनाचे व फुफ्फुसाचे आजार, सेप्सीस, न्युमोनिया, जलशुष्कता, हायपोथर्मिया, जंतूसंसर्ग यांसारख्या गंभीर आजारांपासून मृत्यू टाळण्यासाठी मदत होईल. नवजात शिशुला संदर्भ सेवा देताना कंगारू मदर केअर (केएमसी) सारख्या उपचार पद्धतीचा उपयोग करून नवजात शिशू रुग्णवाहिकेमध्ये Transport Baby Warmer/ Kangaroo Bag उपलब्ध असल्याने Hypothermiaमुळे होणाऱ्या अर्भक मृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. नवजात शिशू रुग्णवाहिकमध्ये ऑक्सिजन सुविधा पुरवण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रसामग्री व उपकरणे, औषधसाठा व प्रशिक्षित मनुष्यबळ असल्याने राज्यामध्ये दरवर्षी श्वसनाचे व फुफ्फुसाचे आजारांमुळे अर्भक मृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

> शिशू रुग्णवाहिकेमुळे आदिवासी भागात नवजात बालकांना संदर्भ सेवा देण्यासाठी चांगली पायाभूत सुविधा विकसित झाली आहे. यामुळे बालमृत्यू प्रमाणात निश्चितच घट होईल. प्राथमिक टप्प्यात पाच रुग्णवाहिका घेण्यात आल्या आहेत. भविष्यात आणखी रुग्णवाहिका आदिवासी भागात उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे.
>
> **- राजेश टोपे, आरोग्यमंत्री**

रुग्णवाहिकेची कार्यपद्धती

रुग्णवाहिका आदिवासी जिल्ह्यातील तालुक्याच्या उप जिल्हा रुग्णालय किंवा ग्रामीण रुग्णालयाच्या ठिकाणी कार्यरत असतील. सद्य:स्थितीत जिल्ह्यातील उपलब्ध असलेल्या मनुष्यबळामधील रुग्णवाहिका ठेवण्याकरिता नियुक्त करण्यात येईल. तसेच या रुग्णवाहिकांसाठी १५ वैद्यकीय अधिकारी व १० वाहन चालकांच्या पदाची मागणी करण्यात आलेली आहे. तालुक्यातील कोणत्याही प्राथमिक आरोग्य केंद्रातून मागणी आल्यास या नवजात शिशू रुग्णवाहिकेच्या माध्यमातून अर्भकांना संदर्भ सेवा पुरवण्यात येईल. त्याकरिता १०२ किंवा १०८ या टोल-फ्री क्रमांकाचा उपयोग करण्यात येईल.

विभागीय संपर्क अधिकारी

नवी मुंबईत ‘माहिती भवन’

पूर्वीच्या आणि आताच्या माध्यमांमध्ये झालेला बदल लक्षात घेता माहिती व जनसंपर्क विभागाचे ‘माहिती भवन’ प्रसारमाध्यमांसाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.

नवी मुंबईतील नेरुळ येथे माहिती भवन इमारत हस्तांतरणाचा सामंजस्य करार माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि सिडको यांच्यात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. माहिती व जनसंपर्कचे प्रधान सचिव तथा महासंचालक दीपक कपूर आणि सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्यात सामंजस्य कराराचे हस्तांतरण करण्यात आले. सह्याद्री अतिथिगृहात आयोजित या कार्यक्रमास माहिती व जनसंपर्क राज्यमंत्री कु. आदिती तटकरे, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे आदी मान्यवर उपस्थित होते.

दैनिक सामनाचा मी देखील काही काळ संपादक होतो, त्यामुळे पत्रकारितेशी माझे कायम ऋणानुबंध आहेत. पूर्वीच्या आणि आताच्या माध्यमांमध्ये बराच बदल झाला असून खिळ्यांच्या ब्लॉकच्या टाईपसेटिंगपासून मोबाईलपर्यंतचा पत्रकारितेचा प्रवास थक्क करणारा आहे. आता एका क्षणात जगभरात माहिती पाठवता येते आणि हे काम करण्यासाठी पत्रकारांना एका ठिकाणी बसता यावे, याकरिता माहितीभवन निश्चितच उपयुक्त ठरेल. चुकीच्या माहितीवर आधारित अनेक बातम्या प्रसारित किंवा प्रसिद्ध होत असतात, त्या बातम्यांची वस्तुस्थिती वेळोवेळी जनतेसमोर मांडण्याबरोबरच चुकीच्या बातम्यांचे खुलासे होणे आवश्यक आहे. माहिती भवनची संकल्पना महत्त्वपूर्ण असून येथे सुरू करायच्या उपक्रमांचा सविस्तर आराखडा तयार करण्याचे निर्देशही या वेळी मुख्यमंत्र्यांनी दिले.

नवी मुंबईतील नेरुळ येथील माहिती भवन इमारत हस्तांतरणाचा सामंजस्य करार माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि सिडको यांच्यात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

नवी मुंबईतील नेरूळ येथील माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माहिती भवनाची अत्याधुनिक इमारत विभागाच्या कामकाजास उपयुक्त ठरणार आहे. या माहिती भवनामध्ये पत्रकार संघटनांच्या कार्यक्रमांबरोबरच महासंचालनालयाकडील असलेल्या ग्रंथांचे डिजिटायझेशन करून डिजिटल ग्रंथालय लवकरच सुरू होईल, असा विश्वास राज्यमंत्री कु. आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.

माहिती व जनसंपर्कचे प्रधान सचिव तथा महासंचालक दीपक कपूर यांनी मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय वृत्तसंकलनाबरोबरच माहितीचे विश्लेषणदेखील करत असते. अलीकडच्या काळात नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार विभागाने केल्यामुळे कामाच्या पद्धती बदलल्या आहेत. या बदललेल्या कामाच्या पद्धतीसाठी माहिती भवनाची संकल्पना उपयुक्त ठरेल. माहिती भवनसाठी केलेल्या सहकार्याबद्दल नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, राज्यमंत्री कु. आदिती तटकरे यांचे आणि सिडकोचे श्री. कपूर यांनी आभार मानले. या माहिती भवनामध्ये माध्यम प्रतिसाद केंद्र, डिजिटल ग्रंथालय, माध्यम प्रशिक्षण केंद्र आणि पत्रकार कक्ष सुरू करण्यात येणार असल्याचेही श्री. कपूर यांनी सांगितले.

या वेळी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास संचालक (वृत्त-जनसंपर्क) दयानंद कांबळे, कोकण विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, उपसंचालक (प्रकाशने) अनिल आलुरकर, सिडकोच्या जनसंपर्क अधिकारी प्रिया रातांबे यांचेसह माहिती व जनसंपर्कचे आणि सिडकोचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वरिष्ठ सहायक संचालक मीनल जोगळेकर यांनी, तर संचालक (प्रशासन) गोविंद अहंकारी यांनी आभार मानले.

असे आहे माहिती भवन...

- नवी मुंबईतील नेरुळ येथे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे माहिती भवन.
- सिडको इमारतीच्या सुमारे ६ हजार ८८३ चौरस फूट क्षेत्रफळाच्या भव्य जागेत माहिती भवन सुरू होणार.
- तळमजला आणि पहिला मजला असे स्वरूप असलेल्या या इमारतीत कॉन्फरन्स रूम, कार्यालये, बहुद्देशीय सभागृह, अतिथी कक्ष, प्रतीक्षा कक्ष, स्वयंपाकघर, वाहनतळ आदी सुविधा.
- इमारतीच्या बांधकामासाठी सुमारे २.५८ कोटी रुपये खर्च.
- अद्ययावत स्टुडिओ, लाईव्ह स्ट्रिमिंग सुविधा, राज्यस्तरीय माध्यम प्रशिक्षण केंद्र, पत्रकार कक्ष, ग्रंथालय, डिजिटल ग्रंथालय, विविध प्रकाशनांचे दालन, प्रदर्शन दालन, दुर्मीळ छायाचित्रांचे दालन, दुर्मीळ दृकश्राव्य दालन, समाजमाध्यम कक्ष, पत्रकार परिषद कक्ष, माध्यम प्रतिसाद केंद्र आदींचा माहिती भवनात समावेश.

स्वित्झर्लंडमधील दावोस येथे २२ ते २५ मे दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राला आपली औद्योगिक आघाडीची छाप कायम ठेवण्यात यश आले. राज्यात ऊर्जा क्षेत्रातील अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात ५० हजार कोटींची गुंतवणूक झाली. या परिषदेदरम्यान ८० हजार कोटींहून अधिक गुंतवणुकीचे करार करण्यात आले. यामुळे विकासासोबतच सुमारे एक लाख जणांना रोजगार मिळणार आहे.

दावोस आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषद : राज्यात भक्कम गुंतवणूक

राज्याची अर्थव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली 'मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०' या उपक्रमाची संकल्पना मांडण्यात आली. या उपक्रमांतर्गत एकूण १० आवृत्त्या आयोजित करण्यात आल्या असून, त्या माध्यमातून आजतागायत १२२ सामंजस्य करार झाले. त्यातून राज्यात एकूण २.७ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक प्राप्त झाली आहे. याद्वारे सुमारे ४ लाख रोजगार निर्माण होणार आहे.

महाराष्ट्र दालन

जागतिक आर्थिक परिषदेच्या पहिल्या दिवशी उद्योगमंत्री सुभाष देसाई, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे तसेच ऊर्जा मंत्री नितीन राऊत या मान्यवरांच्या उपस्थितीत महाराष्ट्र दालनाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच विविध कंपन्यांसोबत गुंतवणुकीसाठी सामंजस्य करार करण्यात आले. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंग, अतिरिक्त मुख्य सचिव (उद्योग) बलदेव सिंग, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. अनबलगन, सह मुख्य कार्यकारी अधिकारी पी. डी. मलिकनेर आदी उपस्थित होते.

देशाच्या ५ ट्रिलीयन डॉलर अर्थव्यवस्था उभारण्याच्या प्रयत्नात महाराष्ट्र अग्रणी असून राज्याने एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था उभारण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक परिषदेच्या निमित्ताने जगभरातून राजकीय नेते, धोरणकर्ते, उद्योगपती व तज्ज्ञ मंडळी या परिषदेत एकत्र आली होती.

शिष्टमंडळाने इंडिया पॅव्हेलियनला भेट दिली. राज्य पॅव्हेलियनमध्ये भेट घेतलेल्या प्रमुख गुंतवणूकदारांमध्ये पॅकेजिंग क्षेत्रात आघाडीवर असलेल्या जपानच्या पर्यावरणस्नेही सनटोरी कंपनीच्या प्रतिनिधींसोबत महाराष्ट्राच्या शिष्ठमंडळाने चर्चा केली, तर रसायन क्षेत्रातील बहुराष्ट्रीय यूपीएल या कंपनीने रायगड जिल्ह्यात २५० एकर भूखंडावर गुंतवणूक करण्यास पसंती दिली असून त्यासंबंधी चर्चा केली. दरम्यान पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी ग्लोबल प्लास्टिक ऍक्शन पार्टनरशिप यांच्यासमवेत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

पहिल्या दिवशी ३० हजार कोटींची गुंतवणूक

या जागतिक आर्थिक परिषदेदरम्यान २३ मे रोजी महाराष्ट्र लाऊंजमध्ये विविध देशातील

जागतिक आर्थिक परिषदेत दावोस येथे महाराष्ट्र दालनाचे उद्घाटन करताना उद्योगमंत्री सुभाष देसाई, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे व ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत.

भरीव गुंतवणूक

या परिषदेद्वारे राज्याच्या आर्थिक विकासाला गती मिळेल. या जागतिक आर्थिक परिषदेदरम्यान विविध देशातील २४ कंपन्यांसोबत ८०,३७९ कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. याद्वारे सुमारे एक लाख जणांना रोजगार मिळेल. ऊर्जा निर्मिती क्षेत्रात ५० हजार कोटींचे करार करण्यात आल्याने रोजगार निर्मितीसोबतच अपारंपरिक ऊर्जा निर्मितीला चालना मिळणार आहे. याद्वारे राज्यात दहा ते १२ हजार मेगा वॅट ऊर्जा निर्माण होणार आहे.

- सुभाष देसाई, उद्योगमंत्री

शाश्वत विकासाचा स्वीकार

'शाश्वत विकास' या महाराष्ट्र शासनाच्या ध्येयाचा जागतिक पातळीवर स्वीकार झाल्याचे दिसून येत आहे. राज्यातील ऑटोमोटिव्ह क्षेत्र आता ई-ऑटोमोटिव्हकडे वाटचाल करीत आहे. यासाठी लागणारे तंत्रज्ञान, साधनसंपत्ती आणि मनुष्यबळ आपल्याकडे उपलब्ध आहे. यामुळे उत्पादक महाराष्ट्राला पसंती देत असल्याचे दिसून येत असून ई-मोबिलिटी, रिन्युएबल एनर्जी, बॅटरी उत्पादन, डेटा सेंटर्स, माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रात मोठी गुंतवणूक होत आहे. राज्यात सुमारे ८० हजार कोटींची गुंतवणूक या परिषदेत झाली.

- आदित्य ठाकरे,
पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री

२४ कंपन्यांसोबत एकूण ३०,३७९ कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले. याद्वारे सुमारे ६६ हजार जणांना रोजगार मिळेल. २३ मे रोजी झालेल्या या विविध गुंतवणूक करारांमध्ये ५५ टक्क्यांहून अधिक गुंतवणूक सिंगापूर, इंडोनेशिया, अमेरिका आणि जपान आदी देशांतील आहे. यामध्ये प्रामुख्याने औषध निर्माण, वस्त्रोद्योग, अभियांत्रिकी, पॅकेजिंग, पेपर पल्प व अन्न प्रक्रिया, स्टिल, माहिती तंत्रज्ञान, डेटा सेंटर, लॉजिस्टिक इ. क्षेत्रांचा समावेश आहे.

२३ मे रोजीचे महत्त्वाचे सामंजस्य करार

- इंडोरामा कॉर्पोरेशन आणि इंडोकाऊंट इंडस्ट्रिज लिमिटेड यांसारख्या प्रमुख वस्त्रोद्योग कंपन्या अनुक्रमे नागपूर आणि कोल्हापूरमधील वस्त्रोद्योग केंद्रांमध्ये गुंतवणूक करणार आहे.
- जगातील सर्वात मोठी सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर आयटी कंपनींपैकी एक मायक्रोसॉफ्ट पुण्यात डेटा सेंटर स्थापन करण्यासाठी ३२०० कोटी रुपये गुंतवणूक करणार आहे.
- इंडोनेशियातील एक अग्रगण्य लगदा आणि कागद उत्पादक कंपनी आशिया पल्प ॲण्ड पेपर (एपीपी) ची संस्था सिनर्मास पल्प ॲण्ड पेपर प्रायव्हेट लिमिटेड रायगडमध्ये कागद आणि लगदा उत्पादनासाठी १०,५०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे.
- हॅवमोर आइसक्रीम्स प्रायव्हेट लिमिटेड पुण्यात आइस्क्रीम तयार करण्यासाठी युनिट सुरू करत असल्याने फूड ॲण्ड ॲग्रो प्रोसेसिंगलाही वाव मिळणार आहे. सोनई इटेबल आणि गोयल प्रोटिन्स तेल कंपन्यांचा समावेश आहे.

५० हजार कोटींचे करार

दावोस परिषदेत सलग तिसऱ्या दिवशी महाराष्ट्राची कामगिरी सरस ठरली. ऊर्जा निर्मिती क्षेत्रात ५० हजार कोटींचे करार करण्यात आले. यानिमित्ताने तीन दिवसांत सुमारे ८० हजार कोटींचे करार पूर्ण झाले.

ऊर्जा निर्मितीसाठी ५० हजार कोटी गुंतवणूक करण्यासाठी 'रि न्यू पॉवर कंपनी'ने राज्य शासनासोबत करार केला. याद्वारे राज्यात दहा ते १२ हजार मेगा वॅट ऊर्जा निर्माण होणार आहे. या करारामुळे भविष्यात राज्याला दररोज २०० मेगावॅट वीज मिळणार आहे. २०२२ ते २०२८ या ७ वर्षांच्या कालावधीत ही गुंतवणूक केली जाणार आहे. या करारानुसार सौर, वायू, हायब्रीड, विजेची साठवणूक, हायड्रोजन आदी पर्यायांच्या माध्यमातून रिन्यू पॉवर लिमिटेड कंपनी राज्याला वीज पुरवठा करेल.

याशिवाय तिसऱ्या दिवशी इंडोनेशियाच्या एशिया पल्प ॲण्ड पेपर कंपनीने रायगड जिल्ह्यात सुमारे १.५ बिलियन युएसडी गुंतवणुकीसाठी करार केला. दरम्यान राज्य सरकारने राज्यातील दुर्गम भागातील शाळांमध्ये आणि मुंबईतील महापालिका शाळांमध्ये डिजिटल सामग्री सादर करण्यासाठी बायजूस यांच्यासोबत सामंजस्य करार केला. शिवाय राज्याने जागतिक ग्रीन बिल्डिंग कौन्सिलसोबत ज्ञानाची देवाणघेवाण करण्यासाठी, राज्याला शून्य उत्सर्जन लक्ष्य साध्य करण्यास मदत करण्यासाठी सहकार्य करारावर स्वाक्षरी केली.

उद्योगमंत्री सुभाष देसाई, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री आदित्य ठाकरे तसेच ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या उपस्थितीत ऊर्जा निर्मितीसाठी ५० हजार कोटी रुपये गुंतवणूक करण्यासाठी 'रि न्यू पॉवर कंपनी'सोबत राज्य शासनाचा करार.

'ऊर्जा' विकासाला गती

दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात ५० हजार कोटींचे गुंतवणूक करार करण्यात आले. राज्यातील अपारंपरिक ऊर्जा क्षेत्राच्या विकासाला यामुळे गती मिळणार असून २०० मेगावॅट वीजनिर्मिती आणि ३० हजारांहून अधिक नवे रोजगार या गुंतवणुकीतून उपलब्ध होणार आहेत. हा करार राज्य व महावितरणसाठी मोठी उपलब्धी आहे. राज्यात हजारो कोटींची गुंतवणूक खेचून आणण्यात आम्ही यशस्वी झालो, याचा आनंद आहे.

- डॉ. नितीन राऊत, ऊर्जामंत्री

पर्यावरणाबाबत परिसंवाद

दावोस परिषदेत पर्यावरणाबाबतच्या परिसंवादाचेही आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादामध्ये पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री आदित्य ठाकरे यांनी आपले विचार व्यक्त केले. शाश्वत विकासासाठी शासनामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. मुंबई शहरात आज 'बेस्ट'च्या ३८६ इलेक्ट्रिक बसेस धावत असून २०२६ पर्यंत मुंबईत १० हजार, तर राज्यात २० हजार इलेक्ट्रिक बसेस असतील असे प्रयत्न सुरू आहेत. राज्यात पाणथळ जागांचे संरक्षण, अभयारण्ये आणि जलाशयांची निर्मिती, जंगल आणि कांदळवनांचे संरक्षण करण्यात येत आहे. कल्याणकारी राज्य आणि शाश्वत विकास यांची सांगड घालून राज्य शासन विविध माध्यमांतून दमदार वाटचाल करत आहे.

संकलन : टीम लोकराज्य

दावोस आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेतील क्षणचित्रे

स्वित्झर्लंडमधील दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत उद्योगमंत्री सुभाष देसाई, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री आदित्य ठाकरे तसेच ऊर्जा मंत्री डॉ. नितीन राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध औद्योगिक व सामंजस्य करार तसेच चर्चासत्रे पार पडली. तेथील ही काही क्षणचित्रे...

जागतिक आर्थिक परिषदेत इंडिया लाऊंजसमोर राज्यातील सहभागी मंत्रिगण व अधिकारी.

राज्य, राज्यातील नागरिक आणि अर्थातच राष्ट्राच्या उन्नतीच्या दृष्टीने महाराष्ट्र व तेलंगणा राज्य कसे परस्परपूरक चांगले काम करू शकतील, याबाबत झालेल्या चर्चेदरम्यान पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांचा सत्कार करताना तेलंगणाचे उद्योग तथा नगरविकास मंत्री केटी रामा राव.

इलेक्ट्रिक वाहनांसाठी लागणाऱ्या बॅटरीसंबंधी, राज्यात इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधांबाबत अमरा राजा ग्रुपसोबत चर्चा.

राज्याच्या ७२० कि.मी. समुद्रकिनाऱ्यालगत बंदरांवरील पायाभूत सुविधांच्या विकासाबाबत 'डीपी वर्ल्ड यूएई'च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसोबत चर्चा.

राज्यात खाणकाम क्षेत्रात पायाभूत सुविधांच्या भरभराटीबाबत देशातील या क्षेत्रातील आघाडीची कंपनी वेदांता लिमिटेडच्या प्रतिनिधींसोबत चर्चा करताना उद्योगमंत्री सुभाष देसाई.

राज्यात उद्योग उभा करण्याबाबत जेमिनी कॉर्पोरेशनच्या शिष्टमंडळासोबत चर्चा.

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

If undelivered, please return to:

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंट प्लस प्रा.लि., ई-१, जय जलाराम इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१ ३११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: दीपक कपूर